अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

व्याकरणकार
मोरो केशव दामले
व्यक्ती आणि कार्य

कृष्ण श्री. अर्जुनवाडकर

राज्य मराठी विकास संस्था

अनुक्रमणिका

अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

व्याकरणकार

मोरो केशव दामले

व्यक्ती आणि कार्य

कृष्ण श्री. अर्जुनवाडकर

राज्य मराठी विकास संस्था

अनुक्रमणिका

पहिली आवृत्ती : १ मे १९९७

दुसरी आवृत्ती : एप्रिल २००५

© राज्य मराठी विकास संस्था

प्रकाशक :
प्रशासकीय अधिकारी
राज्य मराठी विकास संस्था
३, महानगरपालिका मार्ग
मुंबई — ४०० ००१
दूरध्वनी : २६५ ३९६६

मुद्रक :
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई

अक्षरजुळणी :
राज्य मराठी विकास संस्था

ISBN 18 — 87889 — 22 — 5

मूल्य : १०० रुपये

अनुक्रमणिका

शास्त्रविमुख समाजात राहून ज्यांनी

केवळ विद्येविषयीच्या आस्थेपोटी,

प्रसंगी अर्धापोटीही राहून

शास्त्राची ज्योत तेवत ठेवली

त्या सर्व पूर्वसूरींना...

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

जडणघडण मालिकेविषयी ६
दामले कुटुंब : इतिवृत्त आणि व्यक्तिमत्व १०
दामल्यांच्या लेखनाची व्याप्ती २१
व्याकरण ३८
टीकाकार ५६
त्यांचे श्रेय ६३
परिशिष्ट १....सूची ७६
परिशिष्ट २....चरित्रपट ७८
संदर्भ ७९

जडणघडण मालिकेविषयी ...

'अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण' या पुस्तकमालेची आखणी राज्य मराठी विकास संस्थेने एक विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेऊन केली आहे. ज्यांच्या कर्तृत्वातून, प्रयत्नांतून आणि प्रभावांतून आजचा महाराष्ट्र सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात आकाराला आला आहे अशा व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह यांचा परिचय या मालिकेतून सर्वसामान्य शिक्षित वाचकांना करून दिला जाईल. त्यासाठी निश्चित केलेल्या विषयांवर मान्यवर लेखकांकडून जसजशी पुस्तके लिहून हाती येतील तसतशी ती प्रसिद्ध केली जातील.

'माले'तील दुसरे पुस्तक आज आम्ही प्रकाशित करीत आहोत. पहिले पुस्तक म. श्री. दीक्षितकृत 'महाराष्ट्र साहित्य परिषद' या विख्यात संस्थेच्या वाङ्मय क्षेत्रातील कार्याविषयी आहे. ते 'परिषदे'च्या नव्वदाव्या वाढदिवशी आम्ही समारंभपूर्वक प्रकाशित केले.

आता हे दुसरे पुस्तक मान्यवर वैयाकरण प्रा. कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांनी लिहिलेले 'मोरो केशव दामले : व्यक्ती व कार्य' असे आहे. मराठी विषयाचा विशेष अभ्यास करणारे विद्यार्थी, शिक्षक आणि प्राध्यापक कै. दामले यांनी लिहिलेल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरण' या बृहद्ग्रंथाचा अभ्यासासाठी नेहमी उपयोग करीत असतात. त्याचे प्रचंड आकारमान पाहून बिचकूनही जातात. परंतु या अभ्यासकांना आणि इतरांनाही सर्वसाधारणपणे दामले यांच्या जीवनाची आणि त्यांनी व्याकरणक्षेत्रात केलेल्या कार्याची नेमकी कल्पना नसते. प्रा. अर्जुनवाडकर यांनी आमच्या विनंतीला मान देऊन हे छोटेसे, दामल्यांच्या कार्याची ओळख करून देणारे, चरित्र लिहून दिले आहे. आधुनिक महाराष्ट्रातील पूर्वकालीन व उत्तरकालीन व्याकरणकारांच्या कामगिरीचा परामर्श घेत अर्जुनवाडकर यांनी दामले यांच्या व्याकरणक्षेत्रातील कार्याचे नेटकेपणाने मूल्यमापन केले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनाने मराठी व्याकरणविचारांत जे विविध वादविषय आहेत. त्यांचीही वाचकाला थोडक्यात कल्पना येऊ शकेल.

प्रा. अर्जुनवाडकरांची या विषयाशी संबंधित असणारी अशी दोन पुस्तके पूवा मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाने प्रसिद्ध केलेली आहेत. 'मराठी व्याकरण : वाद आणि प्रवाद' (१९८७) आणि 'मराठी व्याकरणाचा इतिहास' (१९९१). ज्यांना सदर विषयाचा अधिक परिचय करून घेण्याची इच्छा त्यांना वरील दोन्ही पुस्तकांचाही परिचय करून घ्यावा लागेल.

प्रा. अर्जुनवाडकरांच्या प्रस्तुत लेखनातून मराठी व्याकरण - विचाराची आजवर झालेली जडणघडण कळते. त्यातील काही त्रुटी कळतात. यापुढे शास्त्रीयतेच्या कसोटीवर कसा विचार व्हावयास हवा त्याची दिशाही सुचविली जाते.

'जडणघडण' मालेतील सर्व पुस्तकांचे बाह्यांग सारखेच राहणार आहे. तथापि या पुस्तकांचे व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह असे तीन गट असतील आणि त्यानुसार मुखपृष्ठांचे तीन वेगवेगळे रंग राहतील.

प्रा. अर्जुनवाडकरांच्या सहकार्याबद्दल आम्हा त्यांचे विशेष आभारी आहोत.

सरोजिनी वैद्य
वसंत आबाजी डहाके

अनुक्रमणिका

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

व्याकरण हा भाषेचा मूलाधार असतो. परंतु तरीही व्याकरण या विषयाबद्दल सार्वत्रिक अनास्था आणि नावड दिसून येते. या पार्श्वभूमीवर व्याकरणकार मोरो केशव दामले यांचे कार्य विशेष मोलाचे ठरते. म्हणूनच अर्वाचीन महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्याची नोंद घेतली आहे. 'शास्त्रीय मराठी व्याकरण' या ग्रंथाची निर्मिती करताना दामले यांना घ्यावे लागलेले परिश्रम आणि त्यांच्या कार्याचे मोठेपण प्रा. कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांनी नेमकेपणाने 'मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य' या पुस्तकातून वाचकांपुढे मांडले आहे. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती निघणे ही संस्थेसाठी अतिशय आनंदाची घटना आहे. मराठी भाषेबद्दल आस्था असणाऱ्या सर्वांनीच वाचावे असे हे पुस्तक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचावे हीच अपेक्षा आहे.

वसुंधरा पेंडसे-नाईक

अनुक्रमणिका

मोरो केशव दामले

अनुक्रमणिका





Stamped

ती. रा. रा. चिंतो केशव दामले यांस

रा. रा. एम. डी. बाळ, स्कूलमास्तर,

शाळा बेलापुर यांचे बिराडीं.

बेलापुर Belapur

ता. साष्टी Dist Thana

जि. ठाणें.

१

दामले कुटुंब : इतिवृत्त आणि व्यक्तिमत्व

दामले घराणे

अठराव्या शतकाच्या प्रारंभाच्या सुमाराला दामले मंडळी गुहागरहून रत्नागिरीजवळच्या कोळंबे गावी येऊन राहू लागली, तेव्हापासून कोळंबे हे दामल्यांचे मूळ गाव मानले जाऊ लागले. पेशवाईचा अस्त झाल्यावर या भगत पेंढाऱ्यांचा उपद्रव सुरू झाला, तेव्हा इतर काही कुटुंबांप्रमाणे सर्व दामले कुटुंबे कोळंब्यातून बाहेर पडली. त्यांतले एक चिपळूणजवळ स्थायिक झाले. या कुटुंबात १८२६ च्या सुमारास जन्मलेल्या केसो (अर्थात केशव) विठ्ठल यांचे मोरो केशव हे चिरंजीव. मोरो केशवांची आई अन्नपूर्णाबाई. केसो विठ्ठल हे लोकल बोर्डाच्या प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून दरमहा तीन रुपये पगारावर लागले; आणि तीस वर्षे नोकरी करून तीस रुपये पगारापर्यंत चढून हेडमास्तर म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांची नोकरी रत्नागिरी जिल्ह्यात उत्तरेस दाभोळपासून दक्षिणेस मालगुंडपर्यंत दहाबारा ठिकाणी झाली. त्यांची शिस्त आणि दरारा यांनी अजूनही कोकणात जुन्या लोकांच्या तोंडी असलेल्या 'केसो विठ्ठली कायदा' या वाक्प्रचाराला जन्म दिला.ते दाभोळला असताना शाळेतला एक विद्यार्थी उठसूट 'जीव देतो,' अशी धमकी देत असे. ती पुष्कळ वेळा ऐकल्यावर त्यांनी त्याला खरोखरच एका विहिरीत नेऊन आत फेकले; आणि जीव देणे सोपे नाही हे त्याला कळल्यावर स्वत: उडी टाकून बाहेर काढले!

पेन्शन घेतल्यावर केसोपंत हे रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांच्या वळणे या गावी जाऊन त्यांचे खोतीचे काम पाहू लागले. मंडलिकांशी त्यांचा लहानपणापासून स्नेह होता. दाभोळची एक 'दामली' मंडलिकांची बहिण होती, असा त्यांच्या चरित्रात उल्लेख आहे. म्हणजे दामले घराण्याशी मंडलिकांचे नातेही होते. वळण्याहून खेडला आल्यावर केसोपंत थोडी सावकारीही करीत. ते १८९३ साली वयाच्या ६६-६७ व्या वर्षी खेड येथे निवर्तले.

दामले भावंडे

केसोपंतांना एकूण मुले बारा – सात मुलगे आणि पाच मुली. मुलग्यांपैकी एक अल्पवयी असतानाच गेला, आणि एक आठ-दहा वर्षांचा असतानाच होडी उलटून झालेल्या अपघातात मृत्यू पावला. राहिलेले पाच जण अनुक्रमे श्रीधर, चिंतामणी, कृष्ण, मोरेश्वर आणि सीताराम. थोरले श्रीधरपंत उर्फ तात्या (जन्म : १८५७) हे रत्नागिरी हायस्कूलमधून (या शाळेत १८७०-७५ च्या दरम्यान स्व. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे शिक्षक होते.) १८७८ मध्ये पहिली जगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ती मिळवून मॅट्रिक झाले; आणि पुढे मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजातून १८८१-८२ मध्ये बी.ए. झाले. भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य, प्रा. नारायण दासो बनहट्टी, सर मोरोपंत जोशी हे त्यांचे प्राय: समकालीन आणि सहाध्यायी होते; आणि त्यांनी कॉलेजात एक हुशार विद्यार्थी म्हणून चांगले नाव मिळवले होते. बी. ए. झाल्यावर श्रीधरपंत बडोद्याला नवीनच निघालेल्या बडोदा कॉलेजात प्रोफेसर म्हणून लागले; आणि तेथे सुमारे वर्ष-दीड वर्ष काम केल्यावर १८८३ च्या मार्च-एप्रिलमध्ये विषमज्वरासारख्या आजाराचे निमित्त होऊन आकस्मिकपणे निधन पावले. हातातोंडाशी आलेल्या आणि कुटुंबाला आधारभूत झालेल्या या कर्तबगार मुलाचा मृत्यू ही केसोपंतांवर आणि दामले कुटुंबावर कोसळलेली दारुण आपत्ती होती. या आपत्तीतून डोके वर काढण्यास दामले कुटुंबाला फार प्रयास पडले.

चिंतो केशावांचे उर्फ भाऊंचे (१८६४-१९३०) शिक्षण फारसे झाले नाही. त्यांनी वडिलांच्या मागे बरीच वर्षे (१९०७-८ पर्यंत) मंडलिकांची वळणे आणि सोनगाव येथील खोती संभाळली; आणि पुढे बेलापूर येथे शेतीचा व्यवसाय केला.

कृष्णाजी केशव

तिसरे कृष्णाजी केशव उर्फ आप्पा उर्फ कवी 'केशवसुत' (१८६६-१९०५). त्यांचे जन्मस्थान त्यांनीच आपल्या एका कवितेत उल्लेखिलेले 'माल्यकूट' अर्थात मालगुंड असले तरी अगदी लहानपणीची चार-पाच वर्षे सोडल्यास त्यांचा या गावाशी पुन्हा कधी संबंध आला नाही. त्यांचे शालेय शिक्षण थोडे कोकणात, पुढे श्रीधरपंतांच्या मृत्यूपर्यंत बडोद्यात, त्यानंतर काही दिवस नागपूरला आणि शेवटी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये असे होऊन ते १८८९ साली तिसऱ्या प्रयत्नात मॅट्रिक झाले. या सर्व काळात त्यांची कवितेच्या क्षेत्रातली उमेदवारी चालूच होती; किंबहुना त्यांना मॅट्रिकमध्ये दोनदा अपयश येण्याचे प्रबल कारण कवितेचे वेड हेच होते. याच वेडातून पुढे त्यांच्या हातून युगप्रवर्तक कविता जन्माला येऊन 'आधुनिक मराठी कवितेचे जनक' म्हणून त्यांचे नाव मराठी सारस्वताच्या इतिहासात अजरामर झाले. मॅट्रिकनंतर सुमारे चार वर्षे मुंबईत शिक्षक, तारमास्तर, कारकून इत्यादी निरनिराळ्या पेशांतल्या नोकऱ्या करून पाहत त्यांनी अखेर शिक्षकाचा पेशा कायम केला. १८९३ मध्ये प्लेगला कंटाळून त्यांनी मुंबई सोडली, तेव्हापासून सुमारे १२ वर्षे त्यांनी भडगाव, फैजपूर आणि धारवाड या गावी शिक्षकाची नोकरी करण्यात घालवली. अखेर मुंबईस चुकवलेल्या प्लेगने त्यांना १९०५ साली ते हुबळीस दिवाळीनिमित्त आपल्या नातेवाईकांकडे गेले असता गाठले; आणि प्रथम ते आणि नंतर त्यांची पत्नी दोघांचाही सुमारे आठ-दहा दिवसांच्या अंतराने त्यातच अंत झाला.

मोरो केशव

मोरो केशव उर्फ अण्णा यांचा जन्म मालगुंडलाच केशवसुतांमागून दोन वर्षांनी झाला (कार्तिक वद्य ७, शके १७९०; शनिवार, दि. ७ नोव्हेंबर, १८६८). १८८२ मध्ये श्रीधरपंतांनी बडोद्याला नोकरी लागल्यावर केशवसुत आणि मोरोपंत या दोघांनाही शिक्षणासाठी तिकडे नेले होते. त्या योजनेची त्यांच्या आकस्मिक मृत्यूनंतर वाताहत होऊन ही मुले कोकणात परत आली होती. ती वर्ध्यास राहणाऱ्या त्यांच्या मामांच्या - श्री. रामभाऊ करंदीकर, वकील, यांच्या सहाय्याने शिक्षणासाठी नागपुरास जाऊन राहिली. तेथून केशवसुत पुण्याला आले आणि मोरोपंत उमरावतीला गेले. तेथील हायस्कूल मधून १८८७ साली मॅट्रिक परिक्षेत उत्तीर्ण होऊन त्यांनी वऱ्हाडात संस्कृतमध्ये सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल 'सिंक्लेअर पारितोषिक' मिळवले. या काळात त्यांना श्रीधरपंतांचे मित्र सर मोरोपंत जोशी (हे त्या काळात उमरावती येथे वकिली करीत.) त्यांनी दरमहा दहा रुपये अशी वर्षभर मदत केली. ही रक्कम पुढे मिळवते झाल्यावर मोरोपंतांनी परत केली. श्रीधरपंतांच्या मृत्यूनंतर बडोद्याचे श्रीमंत संपतराव (श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे धाकटे बंधू; यांना श्रीधरपंतांची शिकवणी होती.) यांनीही या मुलांना दरमहा पंधरा रुपयांप्रमाणे दोन वर्षे मदत केल्याचे नमूद आहे.

मॅट्रिक झाल्यावर मोरोपंत पुण्याला आले. तेथे प्रथम वर्षभर फर्गसन कॉलेज आणि नंतर डेक्कन कॉलेज येथे शिक्षण घेऊन त्यांनी १८९१ साली बी. ए. आणि पुढे दोन वर्षे दक्षिणा फेलोशिप मिळवून १८९३ साली एम. ए. या पदव्या संपादिल्या. बी. ए. ला त्यांचा ऐच्छिक विषय तर्कशास्त्र हा होता; एम्. ए. ला त्यांनी प्रिन्सिपल सेल्बींच्या आग्रहाने तत्त्वज्ञान हा मुख्य आणि इतिहास हा दुय्यम विषय घेतला होता.

डेक्कन कॉलेजात त्यांनी आपल्या सर्व गुरुजनांची, विशेषतः प्रिन्सिपल सेल्बी यांची, प्रीती संपादन केली होती. एम्. ए. होण्याच्या सुमारास प्रिन्सिपल सेल्बी आणि डॉ. भांडारकर यांच्याच शिफारशीने ते उज्ञयिनीच्या माधव कॉलेजात प्रोफेसर झाले. हे कॉलेज १९०२ च्या सुमारास बंद होऊन त्याच्या जागेत 'माधव हायस्कूल' आले.त्यात सुमारे सहा वर्षे काम करून १९०८ मध्ये मोरोपंत नागपूरच्या 'नील सिटी हायस्कूल' चे मुख्याध्यापक झाले; आणि त्या जागेवर असतानाच सुटीनिमित्त नागपूर-भुसावळ पॅसेंजरने पुण्याकडे येत असता अकोल्याजवळच्या बोरगाव स्टेशनजवळ उभ्या असलेल्या एका मालगाडीशी पॅसेंजरची टक्कर होऊन झालेल्या अपघातात ३० एप्रिल १९१३ या दिवशी पहाटे ५ च्या सुमारास झोपेत असतानाच निधन पावले. याच अपघातात त्यांच्या पत्नी सौ. सीताबाई यांचेही निधन झाले. या वेळी त्यांच्याबरोबर असलेली त्यांची सहा वर्षांची सर्वांत धाकटी मुलगी रत्नप्रभा ही मात्र धक्क्याने डब्याबाहेर फेकली गेल्यामुळे वाचली.

सीताराम केशव

मोरोपंतांच्या पश्चात त्यांच्या पोरक्या, अल्पवयी तिघां मुलांचे पालन, तसेच त्यांच्या हिताची आणि मालमत्तेची व्यवस्था आणि जपणूक या गोष्टी मोरोपंतांचे सर्वात धाकटे बंधू सीतारामपंत उर्फ बापू यांनी केल्या. (मोरोपंतांच्या थोरल्या मुलीचे लग्न त्यांच्या हयातीतच १९१२ साली होऊन ती सासरी गेली होती.) सीतारामपंत ११ मार्च १८७८ साली रत्नागिरीला जन्मले. मोरोपंतांनी बी. ए. झाल्यावर डेक्कन कॉलेजात फेलोशिप मिळाल्यानंतर पुण्याला बिऱ्हाड केले, तेव्हा सीतारामपंतांना पुण्याला आणून न्यू इंग्लिश स्कूलमध्ये घातले.पुढे एम. ए. झाल्यावर उज्ञयिनीला जाताना त्यांनी सीतारामपंतांनाही आपल्याबरोबर तिकडे नेले. तेथे ते १८९६ मध्ये अलाहाबाद युनिव्हर्सिटीची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांना मोरोपंतांनी पुढच्या शिक्षणासाठी पुण्याला डेक्कन कॉलेजात पाठवले. तेथे १९०० साली बी. ए. होऊन त्यांनी इंग्रजी विषयाचे 'एलिस प्राइझ' आणि 'एलिस स्कॉलरशिप' दोन्ही मिळवली. पुढे ते मुंबईला गेले; आणि १९०४ मध्ये एलएल. बी. झाले.

मोरोपंतांनी दिलेल्या या शिक्षणाबद्दल सीतारामपंतांना फार कृतज्ञता वाटे. ती त्यांनी मोरोपंतांच्या पश्चात त्यांच्या मुलांचे अपत्यवत पालन करून आणि आपली एक कादंबरी त्यांच्या स्मृतीला अर्पण करून प्रकट केली. यानंतर पुण्याला येऊन त्यांनी 'मराठा' आणि 'केसरी' या पत्रांतून लेख लिहिण्यास सुरवात केली. ते लेख वाचून संतुष्ट होऊन ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांना फर्गसन कॉलेजमध्ये इंग्रजीच्या अध्यापनासाठी बोलावून घेतले.या काळात त्यांनी 'ज्ञानप्रकाश' पत्रात काही लेखन केले. सुमारे वर्षभर हे अध्यापनाचे काम केल्यावर (या काळात ते 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्येही काही तास घेत.) नेमस्त गट न मानवल्याने या नोकरीचा राजिनामा देऊन ते टिळकांच्या पक्षाच्या बाजूने राजकारणात भाग घेऊ लागले.
१९०८ च्या सुमारास मुंबईला टिळक पक्षाचे 'राष्ट्रमत' हे दैनिक (हे सुमारे दीड वर्ष चालून बंद पडले.) सुरू झाले; त्याचे संपादक म्हणून सीतारामपंतांची नियुक्ती झाली. या जगी ते सुमारे वर्षभर होते. पुढे त्यांनी 'राष्ट्रोदय' मासिक (हे पाच महिने चालले.) आणि 'राजकारण' साप्ताहिक (हे सुमारे साडेचार वर्षे चालले.) या स्वतःच्या, आणि 'मेसेज' (अच्युत बळवंत कोल्हटकर), 'नवा काळ' (कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर) इत्यादी अन्य कालिकांतून लेखन केले. या वृत्तपत्रीय लिखाणाव्यतिरिक्त त्यांनी काही कादंबऱ्या, चरित्रे, कायद्यावरील पुस्तके इत्यादी विविध आणि पुष्कळ लेखन केले. काही वर्षे वकिलीही केली. याच काळात (१९१३) त्यांनी मोरोपंतांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अज्ञान मुलांच्या वतीने रेल्वेला नोटीस देऊन, नुकसानभरपाईदाखल वीस हजार रुपये मिळवून ते या मुलांसाठी सरकारी कर्जरोख्यांत गुंतवले. असहकारिता, सत्याग्रह इत्यादी गांधीप्रणीत तत्त्वे महाराष्ट्रात रुजवण्याचे काम करणारे 'राजकारण' हे

पहिलेच कलिक होय. असहकारितेतून स्थापन झालेल्या टिळक महाविद्यालयाच्या संस्थापकांपैकी एक सीतारामपंत होते. १९२२ मध्ये मुळशीच्या सत्याग्रहात सीतारामपंतांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटून आल्यावर 'राजकारणा' चा खर्च झेपेनासा होऊन सीतारामपंतांनी हे पत्र बंद केले.

१९२३ पासून पुढे सीतारामपंतांनी कॉंग्रेसच्या चौकटीत राहून काही वर्षे काम केले. १९२३ साली त्यांनी पुन्हा वकिली सुरू करण्याचा यत्न केला; पण त्यांची घसरलेली गाडी पुन्हा रुळावर आली नाही. म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीला उभे राहून तेथेही त्यांनी एकवार आपले दैव पारखून पाहिले; पण ते प्रतिकूलच गेले. (यापूर्वीही एकदा १९१६-१७ साली ते म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीला उभे राहून पडले होते.) त्यांचे शेवटचे दिवस आर्थिक दृष्टीने फार हलाखीचे गेले. या आणि काही अन्य कौटुंबिक परिस्थितीचा एकत्रित परिणाम होऊन त्यांना जीवन नकोसे झाले; आत्महत्येचेही विचार मनात घोळू लागले. अखेर एक प्रकारच्या विषण्ण, विमनस्क अवस्थेतच त्यांना वयाच्या पन्नासाव्या वर्षी पंडूरोगाने मृत्यू आला. (१५ ऑक्टोबर, १९२७.) सीतारामपंत निपुत्रिक गेले. त्यांच्या पत्नी सौ. जानकीबाई ह्या त्यांच्या आधी सुमारे दहा वर्षे १९१७ च्या सुमारास दिवंगत झाल्या.त्यांच्या मृत्यूनंतर सीतारामपंतांनी विवाहयोग्य वय असूनही पुन्हा विवाह केला नाही.या दोघांनी मोरोपंतांच्या मुलांवर अपत्यवत प्रेम केले. विवाहित मुलीचे माहेरपण केले; अविवाहित मुलांचे विवाह करून दिले. त्यांची शिक्षणे करून त्यांना मार्गी लावले. मृत्यूपूर्वी केलेल्या इच्छापत्रान्वये त्यांनी आपली शिल्लक मालमत्ता आपल्या दोघां बंधूंच्या मुलांमध्ये वाटून टाकली. आपले पुण्यातील राहते घर त्यांनी मोरोपंतांच्या मुलाला दिले.

शापित कर्तृत्व

केसो विठ्ठलांच्या सर्व मुलांची - म्हणजे मुलग्यांची - माहिती वाचल्यावर एक गोष्ट जाणवते ती ही की, एका चिंतोपंतांचा अपवाद करता बाकीची मुले एकंदरीने अल्पायुषी निघाली. एक अगदी लहानपणीच गेला; दोघे (बाळकृष्ण, मोरोपंत) अपघाताने गेले; दोघे अपघाताइतक्याच आकस्मिकपणे विषमज्वराने (श्रीधरपंत) आणि प्लेगने (केशवसुत) गेले. जे राहिले त्यांपैकी एक (सीतारामपंत) पन्नाशीच्या घरातच अनेकविध तापांनी आणि वैफल्यामुळे जीवनाला इतके विटले, की त्यांना मृत्यू बरा वाटू लागला; आणि दुसरे (चिंतोपंत) त्यांच्या लहानपणी होडी उलटून झालेल्या अपघातात अर्धवट बुडालेले योगायोगानेच वाचले, पण दारिद्र्याच्या रेट्याखाली वाकून अखेर 'बहुत पिडिले बंधो मरण बरे वाटते - परंतु ते येणे ईश्वराधीन आहे' असे उद्गार काढीत सहासष्ठीपर्यंत कष्टानेच जगले.

एकंदरीने असे दिसते की, केसो विठ्ठलांच्या मुलांच्या बाबतीत कर्तृत्वाला अल्पायुषीपणाचा, दीर्घायुष्याला दारिद्र्याचा आणि नाकर्तेपणाचा, तसेच कर्तृत्व आणि सुखवस्तुपणा यांना अपघाती मृत्यूचा शाप आहे. या मुलांच्या बाबतीत विद्यासंपादन आणि आजारपण असा आणखी एक चमत्कारिक योग दिसतो. श्रीधरपंत एम्. ए. होऊन आपला जीवनलेख लिहू लागतात, तोच ते आजारी पडले, आणि त्या लेखाला तडकाफडकी मध्येच पूर्णविराम मिळाला. मोरोपंतही बी. ए. झाल्यावर असेच फार आजारी पडले. तेव्हा श्रीधरपंतांच्या मृत्यूचा धक्का अजून ताजा असल्यामुळे केसोपंतांच्या मनाने घेतले की, 'आपल्याला शिकलेला मुलगा लाभत नाही'; आणि त्यांना आजारी मोरोपंतांना त्यांच्या सासरी - म्हणजे गुडघे गावी दांडेकरांकडे - नेऊन पोचवले. सुदैवाने ते या आजारातून हातीपायी धड उठले. सीतारामपंतही १९०१ च्या सुमारास सपाटून आजारी पडले होते. ते त्यातून हरिहरबुवा उदासी या साधुमहाराजांच्या (हे मोरोपंतांचे अध्यात्मिक गुरु) कृपेने आणि औषधाने बरे झाले, अशी समजूत आहे. अशा चमत्कारिक आणि न उलगडणाऱ्या दैवयोगाच्या फेऱ्यात सापडले असतानाही - (मोरोपंतांच्या जीवनात पुढे देवधर्म, बुवा-बाबा

इत्यादींना अतिरिक्त महत्व मिळालेले दिसते, तो या दैवचक्राचाच परिणाम असेल काय?) - मोरोपंत आणि त्यांची भावंडे-केशवसुत आणि सीतारामपंत - यांनी मिळालेल्या आयुष्याच्या मर्यादेत आपापल्या क्षेत्रांमध्ये जे कार्य करून दाखवले ते त्यांना खचितच भूषणावह आहे. सीतारामपंतांच्या निधनानंतर दामले मंडळींना लिहिलेल्या पत्रात महामहोपाध्याय पोतदारांनी या तिघांचा 'सरस्वतीचे लाडके पुत्र' असा गौरवाने निर्देश करून म्हटले आहे, 'दामले घराणे या त्रिवर्ग बंधूंनी अजरामर केले. ही कीर्ती त्यांच्या वंशजांनी सतत संभाळली पाहिजे.'

मुक्काम उज्ञयिनी

या 'त्रिवर्ग बंधूं' पैकी मोरोपंतांवर आता दृष्टी केंद्रित करावयाची आहे. श्रीधरपंतांच्या मृत्यूने ओढवलेल्या आपत्तीतून धैर्याने वाट काढून मोरोपंतांनी आपले शिक्षण पूर्ण केले. या त्यांच्या चिकाटीचे, उद्योगाचे फळ त्यांना लवकरच मिळाले. त्यांनी एम. ए. ची परीक्षा देण्यापूर्वीच एकदोन महिने त्यांची उज्ञयिनीच्या माधव कॉलेजमध्ये दरमहा १२५ रुपयांवर 'प्रोफेसर ऑफ लॉजिक अँड मॉरल फिलॉसफी' म्हणून नेमणूक झाली; आणि ते लगेच कामावर रुजू झाले (१८९३). तेथे अध्यापन करीत असताना त्यांनी अभ्यासही चालू ठेवला; आणि जवळच आलेली एम. ए.- ची परीक्षा देऊन त्यांनी तीत चांगले यश मिळवले. उज्ञयिनी हे शहर प्राचीन काळी विक्रमादित्य राजाची राजधानी होते. ते पेशवाईच्या काळात शिंदे घराण्याच्या ताब्यात आले. जुन्या ग्वाल्हेर संस्थानात उज्ञयिनी हा त्या संस्थानाचा दक्षिणेकडील मोठा सुभा होता.

या संस्थानात माधवराव शिंदे अधिकारावर आल्यानंतर माधव कॉलेज सुरू झाले. त्या काळी इंदूर आणि उज्ञयिनी येथील कॉलेजात शिक्षण नि:शुल्क आणि चंगले मिळत असे; आणि तेथील राहणीही स्वस्ताईची होती. त्यामुळे केव्हा केव्हा महाराष्ट्रातूनही गरीब विद्यार्थी शिक्षणासाठी तिकडे जात. माधव कोलेजच्या प्रमुखपदी प्रिन्सिपल ढेकणे असून अध्यापकवर्गात महाराष्टीयांचा भरणा मोठा होता. ही सर्व मंडळी कॉलेजपासून जवळच स्टेशनाच्या बाजूला असलेल्या एका चाळीसारख्या इमारतीत शेजारी शेजारी एका कुटुंबाचे घटक असल्यासारखी राहत. माधव कॉलेज हे १९०२ च्या सुमारास कॉलेज म्हणून बंद होऊन हायस्कूल या स्वरुपात चालू राहिले. या वेळी ग्वाल्हेरच्या शिक्षणाधिकाऱ्यांना ग्वाल्हेरच्या कॉलेजात इतिहासाचे प्रोफेसर म्हणून मोरोपंतांची बदली केली. तेव्हा मोरोपंतांनी तीन पर्याय त्यांच्यापुढे ठेवले : (१) ग्वाल्हेर कॉलेजमध्ये इतिहासाऐवजी तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान हे पूर्वीचेच विषय शिकवण्यास द्यावे. (२) इतिहास हा विषय द्यावयाचा असल्यास त्याच्या अभ्यासासाठी वर्षभर रजा द्यावी. (३) हे दोन्ही पर्याय स्वीकार्य नसल्यास उज्ञयिनीतच हायस्कूलच्या मुख्याध्यापकपदी राहू द्यावे. यांतला शेवटचा पर्याय मान्य होऊन मोरोपंत उज्ञयिनीसच राहिले. अशी पाच वर्षे गेल्यावर नागपूरच्या 'नील सिटी हायस्कूल'ची 'मुख्याध्यापक पाहिजे' असल्याची जाहिरात वृत्तपत्रांत आली. या जागेला चालकांनी पगारही दरमहा चांगला ३०० रुपये देऊ केला होता. मोरोपंतांनी या जागेसाठी अर्ज केला; तो मान्य होऊन १९०८ पासून ते नागपूरला जाऊन स्थायिक झाले. या जागेसाठी पुण्याहून सीतारामपंतांनीही अर्ज केला होता; पण मोरोपंतांचाही अर्ज गेलेला कळल्यावर त्यांनी तो मागे घेतला.

अनुक्रमणिका

मुक्काम नागपूर

नागपूरच्या 'नील सिटी हायस्कूल' ची स्थापना १ एप्रिल, १८६९ या दिवशी The Grant-in-aid Anglo-vernacular School या नावाने १२७ विद्यार्थ्यांनिशी झाली. १८७० मध्ये या शाळेला 'सिटी स्कूल' हे नाव मिळाले. पुढे नागपूरचे चीफ कमिशनर नील (Neil) साहेब यांच्या कृपेने शाळेला १८८३ साली सध्याची इमारत - मुळचा नागपूरकर भोसल्यांचा वाडा - मिळाली; तेव्हा शाळेच्या चालकांनी कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून नीलचे नाव शाळेला दिले, आणि 'सिटी स्कूल' हे 'नील सिटी हायस्कूल' झाले. १९५० च्या सुमारास नागपूरच्या 'शिवराज लिथो प्रेस' चे मालक श्री. दादासाहेब धनवटे यांनी शाळेला ६०,००० रुपयांची देणगी दिली; तेव्हापासून शाळेला सध्याचे 'श्री दादासाहेब धनवटे नगर विद्यालय' हे नाव मिळाले. या शाळेत आता (१९६७) सुमारे २५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेच्या चालकांनी १८८५ मध्ये 'मॉरिस कॉलेज' काढले; पण ते प्रतिकूल परिस्थितीमुळे सरकारच्या स्वाधीन करावे लागले. पुढे १९३२ मध्ये या शाळेचे चालक आणि 'नागपूर कॉलेज'चे चालक यांनी एकत्र येऊन दोन्ही शिक्षणसंस्थांचे मिळून एक 'नागपूर शिक्षण मंडळ' स्थापन केले.

या शिक्षण मंडळाच्या मार्गदर्शनाने आज नागपूरमध्ये अनेक शाळा आणि 'बिंझाणी सिटी कॉलेज' इत्यादी महाविद्यालये चालत आहेत. गेल्या सुमारे शंभर वर्षांत या शाळेत शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनी सरकारी खाती, न्यायालये, कायदा, शिक्षण, राजकारण, समाजसेवा, सेनादल, क्रीडा, कला, वैद्यक, वृत्तविद्या इत्यादी अनेक व्यवसायक्षेत्रांत नावाजण्याजोगे कार्य केले.अशा नामवंत माजी विद्यार्थ्यांची एक सविस्तर यादी प्रस्तुत शाळेच्या 'हीरक महोत्सव स्मृतीग्रंथा'त दिली असून तीत न्या. मंगलमूर्ती, डॉ. मा. श्री. अणे, म.म. कृष्णशास्त्री घुले, विद्वद्रत्न डॉ. दप्तरी, बॅ. अभ्यंकर, डॉ. हेडगेवार, श्री. माधवराव गोळवलकर गुरुजी, प्राचार्य वा. ब. पटवर्धन इत्यादी अनेक विख्यात नावे समाविष्ट आहेत.

मोरोपंतांनी 'नील सिटी हायस्कूल' ची सूत्रे हाती घेतली, तेव्हा ही शाळा असमाधानकारक आर्थिक स्थिती आणि अन्य प्रासंगिक कारणे यांमुळे काहीशी आणीबाणीला आली होती. वंगभंगप्रकरणातून फोफावलेल्या स्वदेशीच्या आंदोलनामुळे आणि विशेषत: टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर देशात सर्वत्र, तशीच नागपुरातही, अपूर्व जागृती झाली होती; आणि ती विद्यार्थीवर्गातही झपाट्याने पसरत होती. अशी परिस्थिती विद्यार्थांना सभामिरवणुकांत भाग घेण्यास बंदी करणारे कुप्रसिध्द 'रिस्ले सर्क्युलर' हे परिपत्रक शाळांतून फिरवले गेले; आणि त्यातून 'नील सिटी हायस्कूल' मध्ये काही अनपेक्षित घटना घडल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक स्व. डॉ. केशव बळिराम हेडगेवार हे त्या काळी या शाळेत विद्यार्थी होते. त्यांच्या नेतृत्वाने शाळेतील विद्यार्थ्यांनी या परिपत्रकाचा निषेध करण्यासाठी निदर्शने म्हणून शाळातपासणीसाठी सरकारी अधिकारी आले असताना 'वंदे मातरम्' या सामुदायिक घोषणेने त्यांचे स्वागत करावयाचे ठरवले. तपासणीच्या दिवशी अधिकारी एका वर्गात जाताच मुलांनी ठरल्याप्रमाणे घोषणा केली;- ती मुख्याध्यापकांनाही अनपेक्षित होती. त्यांनी अधिकाऱ्यांना दुसऱ्या वर्गाकडे नेले, तर तेथेही तोच प्रकार! संतापून अधिकारी निघून गेले. या निदर्शनाच्या मुळाशी कोण आहे, हे शोधून काढण्यासाठी मुलांना छेडण्यात आले; पण कोणीही नाव सांगितले नाही. तेव्हा ह्या दोन वर्गातल्या मुलांना शाळेत येण्यास बंदी केली असता मुलांनी निरोधन करून सगळीच शाळा बंद पाडली. असे दीडदोन महिने गेल्यावर त्या वेळचे मुख्याध्यापक श्री. जनार्दन विनायक ओक यांनी सगळ्या मुलांना चुकीच्या जुजबी कबुलीवर शाळेत पुन्हा प्रवेश दिला. अशी जुजबी चुकीची कबुली देण्याला देखील दोन मुले तयार झाली नाहीत. (त्यांतले एक हेडगेवार.) त्यांची नावे शाळेच्या पटावरून कमी झाली. सरकारकडून येणारी अन्याय्य परिपत्रके मुलांवर

बजावण्याचा वीट येऊन मुख्याध्यापक ओक राजिनामा देऊन गेले; आणि पुढे विजापूरकरांच्या समर्थ विद्यालयाला मिळाले.

या पार्श्वभूमीवर दामले 'नील सिटी हायस्कूल'च्या मुख्याध्यापकपदावर आले. ते आले तेव्हा त्यांना या परिस्थितीची कल्पना असावी; म्हणून ते उज्जयिनीच्या नोकरीवरचा हक्क वर्षापुरता राखून ठेऊन नागपूरला आले. वर्षभरानंतर परिस्थिती आपल्या आटोक्यात आल्याचा भरवसा वाटू लागल्यावर त्यांनी तिकडच्या नोकरीचा राजिनामा दिला.

मुख्याध्यापक दामले

सरकारची मर्जी, लोकमत, तरुण विद्यार्थ्यांची देशभक्तीची भावना आणि शाळेची शिस्त या सर्व गोष्टींचा व्यवहार्य मेळ घालून दामल्यांनी शाळेचे तारू कुशलतेने हाकले. 'राष्ट्रीय चळवळीमुळे विद्यार्थ्यांत जी अव्यवस्थितपणाची व बेबंद वृत्ती निर्माण झाली होती तिला आळा घालून शाळेत पुन्हा सर्व वातावरण स्थिर केले.' (हीर ३३). स्वत:च्या उदाहरणाने त्यांनी शाळेत कडक शिस्त रुळवली. तेथला शिक्षकवर्ग चांगला होता.त्यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडून मोरोपंतांनी अध्यापनाचा दर्जा सुधारला. ते स्वत: तेथे इंग्रजी शिकवीत; पण याशिवाय गणित, मराठी, संस्कृत इत्यादी अन्यही विषय चांगले शिकवू शकत. विद्यार्थ्यांच्या शंकेचे निरसन ते त्या शंकेच्या मुळात जाऊन साद्यंत, स्वच्छ करीत असत. खेळांच्या सामन्यांना जातीने उपस्थित राहून शाळेच्या खेळाडूंना उत्तेजन देत असत. या सर्व गोष्टींचा चांगला परिणाम होऊन शाळा सुधारत चालली. मोरोपंतांनी शाळेचे संचालक (सर बिपीन कृष्ण बोस, सर गंगाधरराव चिटणवीस इत्यादी) आणि सरकारी अधिकारी या दोहोंचाही संतोष संपादन केला. १९१३ च्या सुमारास शाळेच्या विद्यार्थ्यांची संख्या पुष्कळच वाढून ६०० च्या घरात गेली. आर्थिक बाजू बरी झाली. शाळेचा एक विद्यार्थी श्री. परशुराम चिंतामण दामले (मोरोपंतांचा पुतण्या) मॅट्रिकमध्ये मध्यप्रांतात पहिला आला. मोरोपंतांनी शाळेचा असा कायापालट केला की, ती मध्यप्रांतात पहिल्या क्रमांकाची खासगी शाळा म्हणून ओळखली जाऊ लागली. शाळेचे चालक पुन्हा कॉलेज काढण्याची स्वप्ने पाहू लागली.

अशा वेळी दामल्यांचा आकस्मिकपणे रेल्वे अपघातात अंत झाला. शाळेला फार मोठा धक्का बसला. या प्रसंगी शाळेच्या चालकांना पाठवलेल्या दुखवट्याच्या पत्रात त्या वेळचे शाळातपासणी अधिकारी (Inspector of Schools, Nagpur Circle) श्री. एव्हान्स (J.C. Evans) दामल्यांच्याविषयी लिहितात :

"He was one of the pleasantest men I have ever worked with, and I shall miss him very much personally and officially. He worked for the School with great devotion and singlemindedness and had attained conspicuous success. You will find it verry difficult to replace him."

दामल्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शाळेने श्री. अण्णासाहेब फाटे यांच्या देणगीतून 'दामले स्मारक बक्षीस' सुरू केले आहे. हे बक्षीस जो मुलगा नील सिटी हायस्कूलमधून मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांत पहिला येतो त्याला देण्यात येते.

डेक्कन कॉलेजातील दिवस

दामले डेक्कन कॉलेजात होते,त्या वेळी त्यांचे आचारविचार प्राय: सुधारकी वळणाचे होते. कॉलेजातील एकंदर वातावरण, त्यांचे प्राध्यापक, त्यांचे सहाध्यायी इत्यादींचा हा प्रभाव असणे संभवनीय आहे. त्यांच्या प्राध्यापकांमध्ये ऑक्सनम, सेल्बी, भांडारकर, करकरे, दसनूर इत्यादिकांचे, आणि सहाध्यायांमध्ये नरसिंह चिंतामण केळकर, मंगेश शिवाजी तेलंग, शंकर श्रीकृष्ण देव, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बळवंत बाबाजी देशपांडे, बेळवी, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, शिवराम महादेव परांजपे, नीलकंठ पांडुरंग पाटणकर इत्यादींचे निर्देश सापडतात. १८९१ साली कॉलेजात संस्कृत 'मृच्छकटिक'' नाटकाचा प्रयोग झाला, त्यात यांपैकी दामल्यांसकट बऱ्याच मंडळींनी कामे केली होती. उज्ञयिनीला असताना सुरुवातीची काही वर्षे दामले टेनिस खेळत आणि धोतराऐवजी पँट वापरीत; हा त्यांच्या कॉलेजजीवनाचा वारसा समजावयास हरकत नाही.

दामल्यांचे अध्यात्मिक गुरु

यानंतर एकदोन वर्षांनी त्यांचा उज्ञयिनी गावाच्या जवळ राहणाऱ्या शीलनाथ महाराज नावाच्या एका सत्पुरुषाशी प्रिन्सिपल ढेकणे, प्रो. परचुरे इत्यादिकांच्या द्वारे संबंध येऊन हळूहळू त्यांची वृत्ती अधिकाधिक धर्मप्रवण, श्रद्धाळू बनत गेली; आणि त्यांच्या जीवनात उत्तरोत्तर देवाधर्माचे, दत्तभक्तीचे तसेच बुवा-बाबांचे महत्त्व वाढत गेले. १८९९ च्या सुमारास दामल्यांचा दुसऱ्या एका साधूमहाराजांशी संबंध आला. हे महाराज दामल्यांच्या वयाचे होते, असे दामल्यांनीच लिहिलेल्या या महाराजांच्या चरित्रावरून दिसते. या महाराजांचे नाव हरिहरबुवा उदासी. दामल्यांनी यांचे शिष्यत्व पत्करल्यानंतर त्यांचा उज्ञयिनीला दामल्यांकडे वारंवार मुक्काम पडू लागला. अशा एका मुक्कामाच्या वेळी दामल्यांचे बंधू सीतारामपंत बरेच आजारी पडले असता बुवांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांची औषधयोजना झाली, आणि सीतारामपंत बरे झाले. मग १९०३ मध्ये दामल्यांना चार मुलींच्या पाठीवर जो मुलगा - दत्तात्रेय उर्फ 'दत्तू'- झाला, तोही बुवांच्याच आशीर्वादाने झाला. याच्या आधीचे अपत्य म्हणजे १९०० साली जन्मलेली शकुंतला. वस्तुत: तीच पुत्ररूपाने जन्मावयाची अशी अपेक्षा होती. तदनुसार दत्तात्रेय हे नावही निश्चित झाले असावे. ती 'मुलगी' जन्मल्यामुळे या बेताला मुरड घालावी लागली; तरी तिचे टोपणनाव 'दत्ती' असेच पडले. दत्तूच्या पाठीवर दामल्यांना तीन मुलीच झाल्या; आणि त्यानंतर जो 'श्रीपाद' म्हणून मुलगा झाला तो दोन वर्षांचा होऊन घटसर्पाने गेला. 'दत्ती' च्या आधी झालेल्या दामल्यांच्या तीन मुलीही गेल्या, आणि 'श्रीपादा' च्या पाठीवरचेही दामल्यांचे अपत्य जगले नाही.

दामल्यांची गुरुभक्ती

दामल्यांची गुरुभक्ती फार प्रखर होती. गुरूची प्रत्येक इच्छा पूर्ण झालीच पाहिजे, यासाठी ते फार झटत असत; बुवांसाठी खर्चही पुष्कळ करीत. याच बुवांची 'हरिहर महाराज उदासी यांची कविता' पुढे दामल्यांनी पुस्तकरूपाने शेठ दामोदर सावळाराम यंदे यांच्याकडून प्रकाशित करवली. या पुस्तकात दामल्यांनी स्वत: आपल्या गुरुचे चरित्र लिहिले आहे. त्यांनी 'शास्त्रीय मराठी व्याकरणा'बद्दल एवढाच काय तो मोबदला प्रकाशकांकडून मिळाला.

दामल्यांची धार्मिकता

या बुवांखेरीज अकोल्याजवळ शेगाव या ठिकाणचे श्रीगजानन महाराज यांच्याशी आणि इतरही काही बुवांशी थोडाफार संबंध दामल्यांचा आला होता; आणि त्यांच्या दैननदिन पूजाकृतींमध्ये दत्तात्रेयाव्यतिरिक्त अक्कलकोटकर स्वामी आणि मौनी स्वामी यांच्याही तसबिरी होत्या.दामल्यांची दत्तभक्ती ते धर्मप्रवण होऊ

लागले त्याच सुमारास सुरू झाली असावी. रोजच्या पूजेव्यतिरिक्त त्यांचे 'गुरुचरित्रा'चेही पठन चालत असे.गुरुचरित्राचे वर्षातून तीनचार साप्ताह घरी होत.मुलगा जरा मोठा झाल्यावर चातुर्मास्यात ते या ग्रंथाचा रोज एक अध्याय त्याच्याकडून वाचवून घेत. रविवार, गुरुवार या दिवशी रात्री तास दीड तास भजन होत असे. दत्तजयंती थाटाने साजरी होई. सेवानिवृत्तीनंतरचा काळ शेती करीत दत्तात्रेयाच्या भक्तीत व्यतीत करण्याची त्यांची इच्छा होती. या धोरणाने त्यांनी बेलापूरजवळ आठदहा हजार रुपये खर्चून काही शेतजमीन घेण्याची बोलणी १९१२ च्या आगेमागे केली होती; आणि १९१३ मध्ये ते पुण्याकडे हा व्यवहार पूर्ण करण्याच्याच तयारीने निघाले होते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. दामल्यांनी बरीच वर्षे घरी गाय पाळून तिचीही सेवा केली. पुढे नागपूरला आल्यावर त्यांनी पाळलेली काळी कपिला गाय मारकी निघाली, म्हणून त्यांनी ती दान देऊन टाकली. ही त्यांनी पाळलेली शेवटची गाय. दत्तभक्ती, गुरुभक्ती आणी गोसेवा यांव्यतिरिक्त दामल्यांच्या धार्मिक जीवनात रामनवमी, कृष्णाष्टमी, गणेशचतुर्थी, श्राध्द,श्रावणी इत्यादी उत्सव आणि संस्कारधर्म यांनाही उचित स्थान मिळाले होते. बडोदे संस्थानात दत्तात्रेयाची अनसूया माता हिचे एक पुण्यक्षेत्र नर्मदेच्या काठी आहे. तेथेही ते अधुनमधून जात असत. अन्यही काही लहानसहान पुण्यक्षेत्रे त्यांनी प्रसंगप्रसंगाने पाहिली. १९०१ च्या सुमारास त्यांनी उत्तर भारतातील काशी, गया इत्यादी तीर्थक्षेत्रांची मोठी यात्रा आपल्या गुरुसमवेत केली; त्या वेळी त्यांची वृद्ध आई, पत्नी आणि लहान मुलगी यांनाही त्यांनी बरोबर नेले होते. उज्ञयिनीत राहत असताना ते महाकालाच्या दर्शनाला वारंवार जात. दानधर्मही यथाशक्ती करीत. साधू, वारकरी, भिकारी यांना त्यांनी विमुख पाठवले नाही. उज्ञयिनीला कुंभमेळा वगैरे निमित्ताने अनेक साधू बैरागी येत. त्यांतल्या एका कौपिनधारी साधूला ते नियमाने रोज तांब्याभर दूध देत.

दामल्यांचा दिनक्रम

दामल्यांच्या दिनचर्येचा प्रारंभ देवपूजेने होत असे. पहाटे साडेचारला उठून स्नानादी विधी आटपल्यावर स्वत:चे कपडे स्वत:च धुऊन, वाळत घालून ते सुमारे तासभर संध्या, देवपूजा इत्यादी करीत; आणि मग दूध घेऊन सातच्या सुमारास वृत्तपत्रे वाचून कामाला लागत. दहा वाजता सोवळे नेसून जेवल्यावर थोडी विश्रांती घेऊन ते व्यवसायस्थानी (उज्ञयिनीमध्ये कॉलेजात, नागपूरमध्ये शाळेत) जात. परत आल्यावर संध्याकाळी थोडेसे खाणेपिणे करून अंगणात फेऱ्या मारीत आणि मुलांना शिकवीत. साडेसात-आठच्या सुमाराला जेवण, शतपावली. मग भजन (रविवार, गुरुवार), चातुर्मास्यात गुरुचरित्रश्रवण, पुढे वाचन-लेखन, साडेनऊ वाजता झोप. सर्व कार्यक्रम घड्याळाच्या साक्षीने ठरल्या वेळी होत असे. त्यामुळे नागपुरात त्यांच्या मित्रमंडळीत त्यांचे टोपणनाव 'घड्याळ' असे प्रचलित झाले होते. असा नियमितपणा आणि निर्व्यसनीपणा यांमुळे त्यांना उत्तम आरोग्य लाभले होते.

दामल्यांची जरब

साडेपाच फूट उंचीची सशक्त, थोराड देहयष्टी, सदाचरणाने तेजस्वी दिसणारी गौरवर्ण, रुबाबदार मुद्रा, भरघोस मिशा, रुंद कपाळ, त्यावर उभे टळटळीत गंध, डोक्यावर पुणेरी पगडी, अंगात शर्ट, त्यावर पारशी पद्धतीचा बंद गळ्याचा कोट, त्यावर उपरणे, खाली टिळक पद्धतीने नेसलेले पांढरे शुभ्र धोतर, पायांत मोजे आणि बंदांचे लॉंग बूट अशी त्यांची रुबाबदार मूर्ती संबंधितांच्या मनात आदरयुक्त भिती उत्पन्न करीत असे. घरात काय, व्यवसायात काय, ते स्वत: अतिशय शिस्तीने वागत, आणि इतरांना वागायला लावीत. त्यांना बहुधा हातात छडी घ्यावी लागत नसे; घ्यावी लागल्यास ते कठोर शासन करीत. असे शासन ते आपल्या स्वत:च्या आणि केव्हा केव्हा आपल्याकडे आश्रयार्थ असलेल्या अशा मुलांनाही करीत. यामुळे आणि त्यांच्या काहीशा तापट स्वभावामुळे कुटुंबीयांवर आणि विद्यार्थ्यांवर त्यांची फार जरब होती.

त्यांच्या रागाची, माराची त्यांच्या चिरंजिवांनी - दत्तोपंतांनी - इतकी धास्ती घेतली होती की, पुढे मोठेपणीही ‘लहानमोठ्या महत्वाच्या गोष्टी करताना…अण्णा आभाळातून…माझ्या…वर्तणुकीवर नजर ठेवीत आहेत, अशी स्पष्टअस्पष्ट जाणीव होत’ असल्याचे त्यांनी लिहिले आहे.

दामल्यांची मुले

मोरोपंतांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाची आणि विकासाची आपल्या परीने शक्य ती सर्व काळजी घेतली. मुलींच्या शिक्षणाचा त्या काळी फारसा प्रघात नव्हताच. मराठी शाळेत थोडेफार शिक्षण होत असे तेवढेच. एवढे शिक्षण होताच त्यांनी १९१२ मध्ये आपल्या थोरल्या मुलीचा विवाह पुढे वर्ध्याचे एक नामवंत वकील म्हणून प्रसिद्धी मिळवलेले श्री. दामोदरपंत घारपुरे यांच्याशी करून दिला. पुढे वर्षभाराने मोरोपंतांचा मृत्यू घडल्यावर त्यांच्या बाकीच्या मुलांचे शिक्षण सीतारामपंतांच्या मार्गदर्शनाने झाले. दत्तोपंत बी. ए., बी. टी. झाले. ते प्रारंभी काही वर्षे हिंगण्याच्या स्त्रीशिक्षणसंस्थेत होते. नंतर ते सोलापूरच्या ‘सरस्वती मंदिर’ या मुलींच्या शाळेत बावीस वर्षे अध्यापन करून १९६४ साली त्या संस्थेचे प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांची एक बहिण शशिकला हिचे शाळेत मराठी आणि घरी थोडेफार इंग्रजी शिक्षण झाल्यावर पुण्यातील प्रसिद्ध रानडे कॉंट्रॅक्टर्स मंडळींपैकी श्री. शिवरामपंत रानडे यांच्याशी सीतारामपंतांनी १९१८ मध्ये तिचा विवाह करून दिला. धाकटी बहीण रत्नप्रभा तेवढी बी. ए. (इंग्लिश ऑनर्स) आणि पुढे एम्. ए., बी. टी., विशारद (हिंदी) येथपर्यंत शिकली. तिचा विवाह सीतारामपंतांच्या मृत्यूनंतर दामोदरपंत घारपुऱ्यांशी झाला. पुढे नागपूर-वर्धा या भागात बरीच वर्षे सरकारी शिक्षणखात्यात नोकरी केल्यावर १९६१ साली आय्. जी. एस्. नागपूर या स्थानावर असताना श्रीमती रत्नप्रभा घारपुरे या सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी भारतसेवक समाज, स्काउटिंग, रेड क्रॉस सोसायटी इत्यादी संस्थांच्या अखिल भारतीय समित्यांवरही सदस्य म्हणून काही काळ काम केले.

आप्तेष्टांना साहाय्य

मोरोपंतांच्या अपघाती निधनामुळे त्यांच्या स्वत:च्या छत्राची सावली त्यांच्या स्वत:च्या मुलांना फार काळ लाभली नाही, हे खरे; तथापि त्यांनी आपल्या हयातीत आपल्या आप्तसंबंधितांना जितकी मदत करणे शक्य होते, तितकी केली. बी. ए. झाल्यावर डेक्कन कॉलेजात फेलोशिप मिळताच त्यांनी आपल्या पत्नीला आणवून पुण्यात बिऱ्हाड केले. आणि धाकटे बंधू सीतारामपंत आणि मेहुणे भास्कर नाना दांडेकर यांच्या शिक्षणाची सोय केली.हे दांडेकर त्या वेळी वकिलीच्या अभ्यासासाठी लो. टिळकांच्या लॉ क्लासमध्ये जात. सीतारामपंत न्यू इंग्लिश स्कूलमध्ये होते. त्या वेळी मोरोपंतांना डेक्कन कोलेजवर राहावे लागे. त्यामुळे प्रत्येक शनिवारी गावात येऊन ते या मंडळींना काय हवे-नको ते पाहून जात. त्यांनी उज्ञयिनीला बिऱ्हाड केल्यावर १८९६ मध्ये कोकणातून आपली आई अन्नपूर्णाबाई (मोरोपंतांचे वडील १८९३ मध्ये निधन पावले.) आणि एक अनाथ विधवा बहीण काशीताई दांडेकर यांना आपल्याकडे नेले. अन्नपूर्णाबाई पुढे १९०२ मध्ये समाधानात दिवंगत झाल्या. काशीताई या मोरोपंतांच्या मृत्यूपर्यंत त्यांच्याकडे, त्यांच्या पश्चात सीतारामपंतांकडे आणि त्यांच्या निधनानंतर मोरोपंतांच्या मुलामुलींकडे राहिल्या.

मोरोपंत उज्ञयिनीत असताना त्यांच्याच पुढाकाराने सीतारामपंतांचा भारताचार्य चीं. वि. वैद्य यांच्या मुलीशी १८९९ साली विवाह झाला. मोरोपंतांकडे उज्ञयिनीस राहून मॅट्रिक झालेला पांडुरंग हा त्यांच्या चिंतोपंत या थोरल्या बंधूंचा मुलगा. त्याचा भाऊ परशुराम हाही मोरोपंतांकडे नागपुरास राहून शिकला. मोरोपंतांचे याच्यावर विशेष प्रेम असे. हा १९१३ मध्ये मॅट्रिक होऊन मध्यप्रांतामध्ये एकुणांत आणि इंग्रजी विषयात पहिला येऊन त्याला इंग्रजीची स्कॉलरशिपही मिळाली. मोरोपंतांच्या पश्चात परशुरामपंतांचे

एलएल. बी. पर्यंत शिक्षण सीतारामपंतांकडे झाले; पुढे ते राहुरी येथे वकिली करू लागले. नागपूरला मोरोपंतांकडे याव्यतिरिक्त चार आप्त राहिले होते : परसूमामा आणि विष्णू दांडेकर हे मेहुणे (म्हणजे पत्नीचे भाऊ), तसेच विष्णू परांजपे आणि आत्माराम आपटे हे भाचे. यांपैकी परसूमामा शिवणकामाचा व्यवसाय करीत; विष्णू दांडेकर (अर्थात 'मोठा' विष्णू) हिस्लॉप कॉलेजात शिकत असे; विष्णू परांजपे ('धाकटा' विष्णू) परसूमामाकडे शिवणकाम शिके; आत्माराम शाळेत होता. मोरोपंतांनी याव्यतिरिक्त पांडुरंग हा चिंतोपंतांचा मुलगा, आणि वत्सला, मानू या केशवसुतांच्या मुली यांच्या विवाहप्रसंगी मोकळ्या हाताने आर्थिक मदत केली. एकंदरीने मोरोपंतांनी आपल्या सुस्थितीचा लाभ आपल्या गरजू आप्तांनाही देऊन आपला गृहस्थाश्रम विशेषकरून सफल केला.

सौ. सीताबाई दामले

त्यांच्या गृहस्थाश्रमाच्या साफल्यात त्यांच्या बरोबरीने वाटा त्यांच्या पत्नी सौ. सीताबाई यांचा आहे. सीताबाई या दाभोळजवळच्या गुडघे गावचे श्री. विठ्ठलपंत दांडेकर यांच्या कन्या. (यांचे बंधू नीलकंठपंत. 'शितू' या प्रसिध्द मराठी कादंबरीचे लेखक श्री. गो. नी. दांडेकर हे यांचे चरंजीव, आणि या कादंबरीतली 'शितू' ही त्यांची आत्या, सीताबांईची बहीण.) वयाच्या सातव्या-आठव्या वर्षी त्यांचा चौदा-पंधरा वर्षे वयाच्या मोरोपंतांशी विवाह झाला. त्यांच्याविषयी त्यांच्या चिरंजिवांनी लिहिले आहे : 'माझी आई दिसावयास सुंदर होती, गोरी होती. उंची पाच फुटांचे आसपास. शिक्षण शाळेतील नसले तरी मन फार सुसंस्कृत झालेले. धार्मिक ग्रंथ घरात चांगल्या प्रकारे वाचता येत असत. घरचे हिशेब ठेवण्याइतपत लिहिणे व गणित येत होते. मोरोपंत त्यांच्याकडे दरमहा पगार झाल्यावर घरखर्चासाठी शंभर रुपये देत. महिनाअखेर हिशेब दिल्यावर त्यांना पुढल्या महिन्यासाठी रक्कम मिळत असे.' मोरोपंत स्वभावाने तापट होते; पण 'आई व अण्णा यांचे स्वर एकमेकांवर चढलेले - विशेषत: ती. अण्णा आईवर रागावलेले - मी कधीच पाहिले नाहीत,' असेही त्यांनी म्हटले आहे. १९१२ साली सीताबाईंच्या डाव्या पायाला काही दुखणे होऊन त्या बऱ्याच आजारी पडल्या होत्या; आणि त्यांच्यावर पाच वेळा शस्त्रक्रिया करावी लागली होती. या आजारातून बरे होण्यास त्यांना जवळजवळ वर्ष लागले; सहा-सात महिने तर झोपूनच राहावे लागले. या काळात मोरोपंतांनी त्यांची बेडपॅन स्वच्छ करण्यापर्यंत सर्व सेवाशुश्रूषा स्वत: केली.

या दुखण्यातून उठल्यावर १९१३ च्या गुढीपाडव्याच्या दिवशी सीताबाईंनी अजून बरा न झालेला पाय आडवा पसरून पुरणपोळ्या करून सर्वांना वाढल्या. त्यानंतर एप्रिलच्या अखेरीला हवापालट करण्यासाठी पुण्याला जायचा दिवस जवळ आला. २९ एप्रिलला दिवसभर त्या दू:खीकष्टी होत्या, अश्रू गाळीत होत्या. दुसऱ्याच दिवशी पहाटे होऊ घातलेल्या भीषण भवितव्यतेची तर त्यांना अजाणता चाहूल लागली नसेल ना? रात्रीच्या गाडीने प्रवासी मंडळी निघाली; आणि ३० तारखेच्या पहाटे त्या गाडीला अपघात होऊन मोरोपंत आणि सीताबाई यांना जोडीनेच मरण आले. 'नातिचरामि' ही विवाहात घेतलेली शपथ त्यांनी अक्षरश: खरी केली.

अनुक्रमणिका

२

दामल्यांच्या लेखनाची व्याप्ती

दामल्यांच्या सर्व प्रकारच्या लेखनाची व्याप्ती साधारणपणे डेमी किंवा क्राउन आकाराची २१७६ मुद्रित पृष्ठे इतकी आहे. यांपैकी स्वतंत्र ग्रंथ १६४२ पृष्ठे; स्फुट लेख २६५ पृष्ठे; आणि भाषांतरे २६९ पृष्ठे. त्यांनी संपादिलेली 'श्रीहरिहरमहाराज उदासी यांची कविता' आणि तिला त्यांनी लिहून जोडलेले हरिहरमहाराजांचे ६ पृष्ठांचे चरित्र यांचा वरील पृष्ठसंख्येत समावेश केलेला नाही. या सर्व लेखनसंपादनांचा कालानुक्रम असा :

१. एडमंड बर्कचे व्याख्यान : 'वसाहतींशी सख्य' (भाषांतर) : जून, जुलई १८९४.
२. एडमंड बर्कचे व्याख्यान : 'अमेरिकेवरील कर' (भाषांतर) : मार्च, एप्रिल, में १८९६.
३. न्यायशास्त्र : निगमन (स्वतंत्र ग्रंथ) : १८९६.
४. आधुनिक असंतोष : (एडमंड बर्कच्या 'प्रेझेंट डिस्कंटेंट्स' चे भाषांतर) : १८९९ (?).
५. न्यायशास्त्र : विगमन (स्वतंत्र ग्रंथ) : १९०२.
६. विचारभ्रमण (तीन स्फुट लेख) : १९०३.
७. शुध्दलेखनसुधारणा अथवा सरकारी बंडावा (विस्तृत लेख) : १९०५.
८. श्रीहरिहरमहाराज उदासी यांची कविता (संपादित) : १९११.
९. शास्त्रीय मराठी व्याकरण (स्वतंत्र ग्रंथ) : १९११.
१०.सरस्वतीस्तोत्र (प्रासंगिक लेख) : १९१२.

या दहा लेख-पुस्तकांखेरीज 'शिशुगीता' या नावाचे एक पुस्तक लहान मुलांसाठी त्यांनी लिहिले, पण ते प्रकाशित झाले नाही, असा निर्देश त्यांच्या एका मृत्युलेखात आढळतो.

भाषांतरे

या सर्व लेखनाचा सविस्तर परामर्श पुढे येईल. सध्या या यादीवरून असे दिसते की, दामल्यांनी लेखनाचा आरंभ भाषांतराने केला. त्यांनी भाषांतर फक्त एडमंड बर्कच्या तीन व्याख्यान-लेखांचे केले. हे तिन्ही लेख अर्थातच राजकीय विषयांवरील आहेत;आणि दामल्यांच्या भाषांतराच्या वेळी जरी हे विषय शंभर-सव्वाशे वर्षांचे शिळे झालेले असले तरी त्यात परामर्शिलेल्या प्रसंग-घटना-परिस्थितीचे दामलेकालीन भारतीय परिस्थितीशी साम्य सहज दृष्टीत भरण्याजोगे आहे. अर्थातच हे लेख भाषांतरित करण्यातला हेतू मराठीभाषी भारतीय जनतेत राजकीय जागृती आणि राज्यकर्त्यांवर टीका असा उभयविध असला पाहिजे; मग हे लेख भाषांतरासाठी दामल्यांनी स्वत: निवडलेले असोत किंवा 'भाषांतर' आणि 'ग्रंथमाला' या कालिकांच्या संपादकांनी त्यांना नेमून दिलेले असोत. हे लेख निवडण्यात किंवा भाषांतरासाठी स्वीकारण्यात दामल्यांचा एक गौण हेतू, 'राजकीय लेखन आपल्याला कितपत जमते, मानवते' यांचा अंदाज घेण्याचा असू शकेल. बर्कच्या व्याख्यानलेखांचे भाषांतर हातावेगळे केल्यावरही राजकीय विषयांचा परामर्श त्यांनी आपल्या एकदोन स्वतंत्र लेखांत ('विचारभ्रमण') केला आहे. त्यांच्या स्वतंत्र लेखांत विचाराच्या किंवा मांडणीच्या दृष्टीने नवे असे काही नाही; त्यांतली सामग्री प्राय: निबंधमाला, केसरी इत्यादी त्या काळातल्या प्रभावी कालिकांतून संकलित केल्यासारखी वाटते. त्यांचे भाषांतर एकंदरीने बोजडच आहे.

दामल्यांच्या भाषांतरातले सर्व शब्द, वाक्ये व्याकरणशुद्ध आणि प्रयत्नपूर्वक जुळवलेली असूनही लेखकाचा अभिप्राय पदरी पडण्यास यातायात इतकी पडते, की याहून मूळ इंग्रजी लेखच सोपा वाटावा.

भाषांतरकाराच्या म्हणून काही अडचणी असतात हे मान्य केले, आणि 'बर्कचे लेख आधी मुळातच समजण्यास कठिण आहेत' अशी त्यांनी आपली सोडवणूक करून घेतली असली, तरी दामल्यांच्या भाषांतरांतले हे न्यून दुर्लक्षणीय ठरत नाही. यापेक्षा दामल्यांनी स्वतः त्याज्य ठरवलेला आधारित लेखाचा - 'चित्रा' चा ('आधुनिक असंतोष' पहा) - मार्ग अवलंबिला असता तर त्यांचा हेतू अधिक फलद्रूप झाला असता; कारण शेवाळलेल्या पाण्यात पडलेले प्रतिबिंबापेक्षा वस्तूचे नीटस चित्रच तिची अधिक चांगली कल्पना देऊ शकते. त्यांनी स्वतंत्रपणे किंवा आधारित असे जे अन्य लेखन केले आहे त्यात पाल्हाळ पुनरुक्ती इत्यादी अन्य दोष असले तरी दुर्बोधता नाही, हे येथे मुद्दाम सांगितले पाहिजे. दामल्यांना भाषांतरात इंग्रजी शब्दांचे परिचित पर्याय सोडून नवे, प्रायः संस्कृत शब्द योजण्याची ओढ बरीच आहे, असे दिसते. नियामक सत्ता (Legislature), विधायक सत्ता (Executive Government), नियोजन (Election), नियोजक (Electors), मतदार (Constituents या अर्थी), चौकडी (Cabal : Political clique) असे शब्दप्रयोग संबद्ध विषयावरील समकालीन मराठी वाङ् मयात कोठे आढळत नाहीत. त्यांनी योजलेला 'आधुनिक (असंतोष)' हा शब्दही मराठीत 'modern' याचा पर्याय म्हणून येतो; त्यांना विवक्षित असलेल्या 'present' (म्हणजे 'वर्तमान, सद्यःकालीन') याचा पर्याय म्हणून येत नाही. 'ह्या मताचा पुढाकारी मी नाही,' या वाक्यात त्यांनी बहुधा 'champion, supporter' अशा एखाद्या शब्दाचा पर्याय म्हणून योजलेला 'पुढाकारी' हा शब्द मराठीत प्रचारात नाही. 'हाऊस-ऑफ-कामन्सचे सर्व बीज, तेज आणी सत्त्व काय ते त्याचे राष्ट्रमनोविकार प्रतिबिंबित्वातच आहे,' हे वाक्य संस्कृतज्ञांनाच अनायासाने कळण्यासारखे आहे. 'कायद्याचा मान्य व गुणावह दरारा नाहीसा झाला आहे, त्याची शिथिलता हास्यास्पद झाली आहे, व त्याचा उपयोग तिरस्कारास्पद झाला आहे,' या वाक्यांतले सर्व शब्द मराठी असूनही वाक्यांची वळणे त्यांतल्या विशेषण-विशेष्यांच्या अस्वाभाविक जुळणीमुळे मराठी वाटत नाहीत; याचे कारण ही इंग्रजी वाक्यांची शब्दशः भाषांतरे असावी, याशिवाय अन्य दिसत नाही. 'बलाचा उपयोग अनिश्चित आहे', 'आपण निरुपाय होऊ', 'सरकारची प्रत्येक भ्रष्टता व चुकी', न्यायाधीशांवर दक्षतेने व हेव्याने लक्ष ठेवणे' असे मराठी पेहराव केलेले इंग्रजी प्रयोग दामल्यांच्या भाषांतरलेखांत पुष्कळ आहेत. दामल्यांच्या भाषांतरात खटकणाऱ्या गोष्टींची ही केवळ वानगी होय. या सर्व गोष्टींमुळे दामल्यांच्या भाषांतरलेखांत शब्दरूप कलेवरच काय ते हाती लागते; अर्थरूप आत्मा कोठे गवसत नाही. कदाचित स्वतः दामल्यांनाही ही गोष्ट जाणवली असेल; कारण बर्कच्या या तीन लेखांनंतर ते कशाचे भाषांतर करण्याच्या भानगडीत पडले नाहीत.

स्वतंत्र ग्रंथ

बर्कच्या तिसऱ्या लेखाचे भाषांतर करण्याच्या आगेमागे त्यांनी न्यायशास्त्रावर आपले पहिले स्वतंत्र पुस्तक (निगमन) लिहिले.हे पुस्तक क्राउन आकाराहून जरासे लहानच असे १७६ पृष्ठांचे, म्हणजे छोटेच आहे. पण ते स्वतंत्र पुस्तक आहे, आणि शिवाय शास्त्रीय विषयावरचे आहे. न्यायशास्त्र (=तर्कशास्त्र) हा दामल्यांचा विशेष अभ्यासाचा आणि अध्यापनाचाही विषय होता; तेव्हा ग्रंथलेखनाला आरंभ करताना त्यांनी या विषयावर लेखणी चालवावी हे स्वाभाविक होते. पाश्चात्त्य तर्कशास्त्र अशा रीतीने मराठी वेशभूषेत सादर करताना त्यांना परिभाषा काही अंशी संस्कृत न्यायग्रंथांतून उचलता आली तरी बऱ्याच अंशी नव्याने तयार करावी लागली; याचे कारण 'न्यायावर मराठीत ग्रंथ नाहीत,' हे त्यांनीच नमूद केले आहे. निगमन (deduction) आणि विगमन (induction) हे आणि या शास्त्रावरील मराठी ग्रंथांतील अन्य कित्येक पारिभाषिक शब्द रूढ करण्याचे श्रेय बहुधा दामल्यांनाच द्यावे लागेल. हे पुस्तक लिहिल्यावर दामल्यांना शास्त्रीय विषयावर लेखन करण्याविषयी आत्मविश्वास वाटू लागला असावा; किंबहुना आपले लेखनक्षेत्र हेच आहे, असे जाणवू लागले असावे. कारण या पुस्तकाच्या जन्मानंतर त्यांनी केलेले लेखन एका

‘विचारभ्रमणा’चा (आणि अन्य किरकोळ लेखनाचा) अपवाद करता शास्त्रीय विषांवरच आहे - खरे म्हणजे न्याय आणि व्याकरण (यात शुद्धलेखनाचा समावेश समजावा.) या दोनच विषयांवर आहे. यांपैकी न्यायावरचे दुसरे पुस्तक - ‘विगमन’ - पहिल्या पुस्तकानंतर सहा वर्षांनी आणि पहिल्याच्या सुमारे अडीच-तीनपट पृष्ठसंख्येत अवतरले. याच्यामागून नऊ वर्षांनी दामल्यांचे वयाने सर्वात धाकटे पण आकाराने - पृष्ठसंख्येने - सर्वांत मोठे ग्रंथापत्य ‘शास्त्रीय मराठी व्याकरण’ हे जन्माला आले. दामल्यांचे शास्त्रग्रंथ याप्रमाणे आकारदृष्ट्या उत्तरोत्तर चढत्या श्रेणीत आहेत. यांपैकी ‘निगमना’ नंतर ‘विगामना’ चा अवतार अपेक्षितच होता.

दामले न्यायाकडून व्याकरणाकडे कसे वळले, याचा मात्र नक्की उलगडा होत नाही. कदाचित त्यांनी शुद्धलेखनावर १९०५ मध्ये प्रसंगवशात लिहिलेला लेख त्यांना व्याकरणाकडे आकृष्ट करण्यास कारणीभूत झाला असेल. कदाचित ‘निगमना’ तील वाक्यविषयक भाग त्यांना वाक्याचा व्याकरदृष्टीने अभ्यास करण्याकडे आणि मग समग्रच व्याकरणाकडे वळण्यास प्रेरक झाला असेल.

लेखनपरिचय : भाषांतारे

१. एडमंड बर्कचे व्याख्यान : 'वसाहतींशी सख्य'

'भाषांतर' मासिक (संपादक – विश्वनाथ काशीनाथ राजवाडे), कोल्हापूर, जून-जुलई १८८४, मग्रं. पृ. १-७८.

या लेखाच्या आरंभी मूळ व्याख्यानाचा (Speech on Conciliation) दिनांक २२ मार्च सन १७७५' हा नमूद केला आहे. या व्याख्यानात बर्क म्हणतो: 'अमेरिकेचा व्यापार व अमेरिकेचे जीवन हाणून पाडण्यासाठी, जे मोठे बिल आपण पसार केले होते ते शासन बिल बड्या लोकांच्या सभेकडून आपणाकडे परत यायचे आहे...हा एक शुभ शकुनच आहे...कारण जे कृत्य जात्याच संशययुक्त आहे व ज्याचे परिणामही आज आपणास सांगता येत नाहीत त्या कृत्याचा आणखी एकवार विचार करण्याची संधी त्यायोगे आपणास मिळत आहे...वादाचे मूळ खणून काढून, व वसाहतींचा आपल्या मायदेशावरील नि:शंक विश्वास पुनरपि स्थापित करून सर्व लोकांस चिरकाल संतुष्ट राखावे; आणि ब्रिटिश सरकारशी त्यांचे सख्य ज्या युक्त्यांनी घडवून आणायचे त्याच युक्त्यांनी व त्याच वेळी त्यांचे आपआपसातही सख्य घडवून आणावे अशी माझी सूचना आहे. प्रजेतील निरनिराळ्या पक्षांत कलह उत्पन्न करून राज्य करण्याची जी पद्धती तिजपासून अर्थातच माझी सूचना भिन्न आहे...महाराज, प्रथम, बलाचा उपयोग केवळ क्षणिक आहे असे माझ्या अल्प मतीस वाटते. ते काही काळपर्यंत जिंकील; परंतु पुनरपि जिंकण्याची आवश्यकता त्याने दूर होत नाही; आणि ज्या राष्ट्रास पुन: पुन: एकसारखे जिंकावे लागत आहे त्यावर आपले राज्य आहे असे म्हणता येत नाही. माझा दुसरा आक्षेप असा आहे की, बलाचा उपयोग अनिश्चित आहे, बलापासून भिती सदोदित उत्पन्न होतेच असे नाही; आणि युद्धसामग्रीने जय मिळतोच असे नाही; जर आपणास यश आले नाही तर आपण निरुपाय होऊ; कारण सामोपचार निष्फल झाला असता बलोपाय शिल्लक राहतो; परन्तु बलोपाय निष्फल झाला म्हणजे नंतर सामोपचाराची आशा करणे नलगे...बलाचे उपायावर माझा आणखी एक आक्षेप असा आहे की, तो विषय आपले स्वाधीन राखण्यासाठी आपण ह्या रीतीने जे प्रयत्न कराल त्या प्रयत्नांनीच तो नि:सत्त्व होऊन जाईल...माझा शेवटचा आक्षेप असा आहे की, वसाहतींवर राज्य करण्याचे कामी बलाचा उपयोग चांगला होतो असा आम्हास मुदलीच अनुभव नाही.'

या उताऱ्यावरून बर्कचे प्रतिपादनसूत्र आणि दामल्यांची भाषांतरपद्धती यांविषयी पुरेशी कल्पना येईल. राजकीय विषयांवर दामल्यांनी लेखन केले, ते प्राय: बर्कच्या व्याख्यानांच्या भाषांतरांतच सीमित आहे. आणि ते एकंदरीने अल्प आहे. प्रस्तुत व्याख्यानाचे भाषांतर निर्दिष्ट दुसऱ्या अंकाच्या अखेरी ७२ व्या पृष्ठावर अपुरे राहिले आहे; आणि या अंकातील काही फॉर्मही चुकीचे लागले आहेत असे दिसते. मागच्या वेष्टन-पृष्ठावर प्रस्तुत लेखातील 'सहा पृष्ठे राहिली आहेत' असा उल्लेख आहे; वेष्टनपृष्ठ १ वर या लेखाची पृष्ठे '५५-७८' अशी दाखवली आहेत. म्हणजे ७३-७८ ही पृष्ठे राहिली,असा अर्थ होतो. ती ऑगस्ट १८९४ च्या अंकात दिली असावी; पण हा अंक मला उपलब्ध झाला नाही. या लेखावर भाषांतरकार म्हणून दामल्यांचे नाव निर्दिष्ट नाही; किंबहुना 'भाषांतर' मासिकाच्या सुरवातीच्या काही अंकांवर कोणत्याच भाषांतरकर्त्याचे नाव निर्दिष्ट नाही. पण प्रस्तुत भाषांतर दामल्यांनी केलेले आहे, हे 'बालबोध' मासिकात आलेल्या दामल्यांवरील मृत्युलेखातील त्यांच्या लिखाणाच्या यादीवरून कळते.

अनुक्रमणिका

२. एडमंड बर्कचे व्याख्यान : 'अमेरिकेवरील कर'

'भाषांतर' मासिक; मार्च-एप्रिल-में १८९६, पृ. १-८९, मग्र.

प्रस्तुत व्याख्यानाचा मूळ दिनांक – तारीख १९ एप्रिल सन १७७४ - भाषांतराच्या आरंभी निर्देशिलेला आहे. १७६७ साली इंग्लंडच्या लोकसभेने – पार्लमेंटने – एक कायदा करून अमेरिकेतील ' राज्यव्यास्वस्थेचा व न्यायाच्या खात्याचा खर्च भागण्याकरिता आणि तसेच ह्या प्रांतांचे भरण, पोषण व रक्षण नीट होण्याकरिता लागणारा पैसा वसूल करण्यासाठी...अमेरिकेतील प्रांतांवर कर बसविणे योग्य आहे,' असे ठरवून निरनिराळे सहा कर बसवले. पुढे दोन वर्षांनी त्यांपैकी पाच कर रद्द केले. राहिलेला चहावरील कर - 'दर पौंड वजन चहावरील तीन पेन्स जकात' रद्द करण्याचा प्रश्न सभेपुढे आला असता हा कर रद्द करू नये, असे काहींनी प्रतिपादन केले. यावर बर्कने हा कर रद्द करण्याला अनुकूल असे जे भाषण केले, तेच प्रस्तुत भाषण होय.

आधुनिक असंतोष

३. एडमंड बर्कच्या 'प्रेझेंट डिस्कंटेंट्स' चे भाषांतर

'ग्रंथमला' मासिक (संपादक - विष्णू गोविंद विजापूरकर), कोल्हापूर, १८९९ चा सुमार, म.ग्रं., १३.५ x २०.५ सें., पृ. ६+४०+१०२.

हे बर्कच्या 'Thoughts on the Cause of Present Discontent' (१७७०) या पुस्तकाचे भाषांतर आहे. प्रस्तावनेत दामल्यांनी आरंभीच 'बर्कचे लेख आधी मुळातच समजण्यास कठीण आहेत,' असा इशारा आणि 'तथापि भाषांतर जितके सुलभ करवेल तितके करण्याचा प्रयत्न केला आहे,' असा दिलासा दिला आहे. मूळ व्याख्यानाच्या आधाराने स्वतंत्र लेख न लिहिण्याचे कारण त्यांनी असे सांगितले आहे की, 'मूळ पदार्थ, त्याचे प्रतिबिंब व त्याचे चित्र ह्यांमध्ये जो भेद तोच भेद भाषेतील मूळ लेख, त्याचे भाषांतर व त्याचे आधाराने लिहिलेला लेख ह्यांमध्येही आहे.' अर्थात 'आधारभूत (आधारित?) लेखापेक्षा भाषांतराने मूळ लेखाची कल्पना अधिक व्यक्त होते.' प्रस्तुत पुस्तकाचा प्रकाशनकाल त्यावर निर्दिष्ट नाही; तो ग्रंथमाले'तल्या त्यापुढील दुसऱ्या 'अशोक' या पुस्तकावरील १८९९ या कालनिर्देशावरून अंदाजाने काढून प्रारंभीच्या नोंदीत मी दिला आहे. या पुस्तकाला दामल्यांनी ४० पृष्ठांचा एक 'उपोद्घात' जोडला असून त्यात प्रस्तुत लेख कळण्यासाठी आवश्यक असलेली 'ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या साधारण स्वरूपाची ओळख' वाचकांस करून दिली आहे. या उपोद्घाताच्या अलीकडे 'महत्वाच्या ऐतिहासिक शब्दांस योजिलेले मराठी शब्द' ('ऐतिहासिक शब्द' म्हणजे इंग्लंडच्या इतिहासावरील ग्रंथात येणारे शब्द, असा अभिप्राय दिसतो.) ही २० शब्दांची यादी मूळ इंग्रजी शब्दांसह जोडली आहे. हे पुस्तक भाषांतरकर्त्याने 'बर्कने वर्णिलेला असंतोष ज्या लोकांत उत्पन्न होण्याचा संभव नाही त्यांस प्रेमपूर्वक अर्पण' केले आहे!

या भाषांतराच्या उपोद्घातात दामल्यांनी 'ब्रिटिश राज्यव्यवस्थेचे मुख्य तीन अवयव' मानसन्मानाच्या उतरत्या क्रमाने राजा, बडे लोकांची सभा किंवा ज्येष्ठ सभा (House of Lords) आणि मध्यस्थितीतील लोकांची सभा किंव्र३६६ कनिष्ठ सभा (House of Commons) असे असल्याचे सांगून 'राज्यव्यवस्थेतील महत्वाचे दृष्टीने शेवटच्यासच पहिला नंबर दिला आहे. या तीन अवयवांची घटना, अधिकार आणि कार्यपद्धती यांची माहिती सांगून 'हाउस ऑफ कॉमन्सचे सर्व बीज, तेज आणि सत्व काय ते त्याचे राष्ट्रमनोविकार प्रतीबिंबित्वातच' असल्याचे बर्कच्या शब्दांचा अनुवाद करून सांगितले आहे. यानंतर बर्कच्या भाषणाचा मुख्य विषय असलेला जो 'आधुनिक असंतोष', त्याची कारणे निदर्शनास आणण्यासाठी दुसऱ्या जेम्स राजापासून (१६८५-१६८८) इंग्लंडमधील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

अनुक्रमणिका

दुसरा जेम्स परागंदा झाल्यापासून (१६८८) दुसरा जॉर्ज मृत्यू पावेपर्यंत (१७६०) सुमारे पाऊणशे वर्षे व्हिग पक्षाने 'जांकोवाइट्स' आणि टोरी यांच्यावर सरशी करून राजसत्ता अखंड आपल्या हाती ठेवली. पुढे तिसऱ्या जॉर्जने 'राजमित्र' नाव धारण करून त्याला मिळालेले टोरी पक्षातील तसेच जाकोबाइट्स लोक आणि व्हिग पक्षातून फुटलेले काही लोक यांच्या सहाय्याने 'मंत्रिमंडळात निरनिराळ्या पक्षांचे लोक नेमण्याचे' तंत्र अवलंबून आपले गमावलेले स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी हालचाली सुरू केल्या. परिणामतः या काळात सर्व सत्ता 'कोर्ट' म्हणजे दरबार आणि 'जन्टो' म्हणजे 'चौकडी' यांच्या हाती केंद्रित होऊन प्रधानमंडळ आणि मुख्यप्रधान यांचे स्थान नाममात्रच राहिले. या काळात राजपक्षावर टीका करणाऱ्यांना भराभर शासन करण्याचे सत्ताधाऱ्यांनी सुरू केलेले सत्र आणि अन्य काही प्रासंगिक कारणे यांमुळे लोकांमध्ये असंतोष वाढू लागला. राजाच्या मर्जीप्रमाणे मुख्य प्रधान येऊ आणि जाऊ लागले, आणि 'रॉकिंगहॅम' (Rockingham) मुख्य प्रधान होण्यापूर्वीचे सुमारे दोन महिने तर 'झोटिंग पादशाहीच' होती. रॉकिंगहॅमच्याच कारकिर्दीत आणि त्याच्याच वजनाने बर्क (हा प्रथम रॉकिंगहॅमचा 'प्रायव्हेट सेक्रेटरी' होता) लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आला (१७६६); आणि तेंव्हापासून सुमारे पाव शतक बर्क हा पुनरुज्जीवित व्हिग पक्षाचा एक प्रमुख मार्गदर्शक आणि प्रेरक म्हणून कार्य करीत राहिला. त्याचा प्रस्तुत लेख या कार्याचाच एक भाग होय.

स्वतंत्र स्फुट लेख

४. विचारभ्रमण (तीन स्फुट लेख)

'ग्रंथमाला' मासिक, कोल्हापूर, १९०३ चा सुमार;
श्री. द. मो. दामले यांच्या संग्रही, १३.५ x २०.५ सें.,
पृ. ३२ + ४३ +७८.

प्रस्तुत लेख 'ग्रंथमाले'त केव्हा प्रसिद्ध झाले, याचा संबद्ध अंकांवर किंवा या लेखांसाठी छापलेल्या मुखपृष्ठावर निर्देश नाही. तथापि हे लेख ३० मे १९०३ च्या सुमाराला प्रसिद्ध झाले असावे; कारण यांपैकी तिसऱ्या लेखात 'सयाजीविजय' या नियतकालिकाच्या प्रस्तुत दिनांकाला निघालेल्या अंकाचा निर्देश आहे. दामल्यांचे लेखन ज्यात प्रसिद्ध झाले आहे अशा विजापूरकरांचे 'ग्रंथमला' आणि राजवाड्यांचे 'भाषांतर' या मासिकांच्या सुरुवातीच्या पुष्कळशा अंकांत लेखकांची नावे, प्रकाशनाचा काळ यांची नोंद आढळत नाही. यांपैकी लेखकाचा अनुल्लेख सप्रयोजन असणे शक्य आहे; कालाच्या अनुल्लेखाचे प्रयोजन काय असावे याची अटकळ होत नाही.

'सुखदुःख'

या लेखात दामल्यांनी सुख आणि दु:ख यांचे स्वरूप, सुखाच्या विविध पातळ्या, सुखाची साधने, सुखाविषयीची पाश्चात्त्यांची दृष्टी, अक्षय सुखाची शक्यता इत्यादी विविध मुद्द्यांचा परामर्श केला आहे. मुळात हा विचार करण्याचे कारण हे की, 'सुखाकरिता मनुष्याची सर्व धडपड चालली आहे.' उष्णतामापक यंत्राप्रमाणे सुखदु:खमापक यंत्र तयार करावयाचे झाल्यास त्यात सुख ही धनसंख्या आणि दु:ख ही ऋणसंख्या दाखवावी लागेल; 'आणि ज्याप्रमाणे जमेतून खर्च वजा करून शिल्लक काढावयाची त्याप्रमाणे सुखाचे अंशातून दु:खाचे अंश वजा करून जी बाकी राहील ती सुखाची होय... अर्थात जितके जितके दु:ख नाहीसे होईल तितके तितके सुख अधिक होईल हे उघड आहे.'

अनुक्रमणिका

सुखाचे शारिरिक किंवा इंद्रियजन्य, आणि मानसिक असे मुख्य प्रकार होतात; आणि बुद्धी, विकार आणि प्रवृत्ती या ज्या मनाच्या तीन बाजू आहेत तदनुसार मानसिक सुखाचे तीन प्रकार होतात. या सर्व सुखप्रकारांत सुखाचे 'साधन ज्या मानाने कमीजास्त चिरस्थायी असते त्याच मानाने त्यापासून निष्पन्न होणारे सुखही कमीजास्त चिरस्थायी असते.' या दृष्टीने आणि एकाच वेळी अनेकांना सुखानुभव येण्याच्या दृष्टीने दामल्यांनी घ्राणेंद्रिय, रसनेंद्रिय आणि त्वगिंद्रिय यांच्या द्वारा होणाऱ्या सुखातून चक्षुरिंद्रिय आणि कर्णेद्रिय यांच्या द्वारा होणाऱ्या सुखाचा क्रमांक वरचा ठरवला आहे. याहून वरचा क्रमांक बौद्धिक सुखाचा, आणि त्याहून वरचा क्रमांक 'दया, क्षमा, शांती, प्रीती, इत्यादी मनोवृत्तींचा अनुभव व सद्वर्तन व धर्माचरण' यांपासून होणाऱ्या सुखाचा लागतो; कारण या शेवटच्या प्रकारांत बौद्धिक प्रकारांतल्याप्रमाणे बाह्य साधनांची गरज नसते. या सुखप्रकारांच्या बाबतीत दामल्यांचे अवलोकन असे आहे की, 'उच्च मनोवृत्तींची, नीतीची व धर्माची हेळसांड होत आहे.' आणि 'इंद्रियसुख व बुद्धिसुख ह्यांच्या प्राप्त्यार्थ च पाश्चिमात्य राष्ट्रांची व त्यांनी पादाक्रांत केलेल्या व त्यांचे अंधपणे एकजात अनुकरण करणाऱ्या जगावरील बहुतेक सर्व राष्ट्रांची सतत धडपड चालली आहे.' या धडपडीच्या मुळाशी अशी अज्ञानमूलक समजूत आहे की, 'बाह्य साधनांबरोबर सुखाचीही वाढ होते.'

या लेखाच्या शेवटी दामल्यांनी 'अक्षय सुख शक्य आहे का?' असा प्रश्न उपन्यस्त करून, 'सुख आणि दु:ख ही एका काठीची दोन टोके आहेत,' अर्थात सुख आणि दु:ख यांची 'सांगड अभेद्य आहे' असे मत पूर्वपक्ष म्हणून मांडून अक्षय्य सुखाची शक्यता सिद्धांतरूपाने मांडली आहे. 'अंधारावाचून प्रकाशाची कल्पना होत नाही किंवा व्हावयाची नाही. ...परंतु तेवढ्यावरून अंधाराच्या अडथळ्याशिवाय प्रकाशाचे सतत अस्तित्व अशक्य होय असे सिद्ध होत नाही. ...खुद्द सूर्य ह्या गोलावर सदोदित प्रकाशच असला पाहिजे.'

'स्वातंत्र्यास्वातंत्र्य'

'मनुष्य हा स्वभावत:च स्वातंत्र्यप्रिय प्राणी आहे,' असे म्हणतात; आणि 'दुसऱ्याचे हाताने पाणी पिणे' या गर्हणार्थक म्हणीनेही हेच सूचित होते. 'समाजस्वातंत्र्य 'आणि 'व्यक्तिस्वातंत्र्य' असे स्वातंत्र्याचे जे दोन प्रकार आहेत त्यांपैकी पहिला प्रकार एखाद्या समाजावर परराज्य असताना संभवतच नसल्यामुळे त्याचा विचार करण्याचे वस्तुत: काही कारण नाही. तथापि राजकीय क्षेत्र सोडल्यास सामाजिक, धार्मिक इत्यादी अन्य क्षेत्रांत समाजस्वातंत्र्य भारतीय जनतेला मिळत असल्याचा भ्रम कोणाला राहू नये, यासाठी दामल्यांनी या क्षेत्रांचा स्वातंत्र्यदृष्टीने परामर्श करून आपला मूळ नकारात्मक निष्कर्ष दृढ केला आहे. राहिले व्यक्तिस्वातंत्र्य. या बाबतीत स्वराज्यातील स्थिती आणि इंग्रजी राज्यातील स्थिती यांची तुलना करून दामले म्हणतात की, याही दृष्टीने वर्तमान परिस्थितीला स्वातंत्र्ययुग म्हणणे फार अतिशयोक्तीचे आणि म्हणून असत्यप्राय आहे. इंग्रजी राज्यातील व्यक्तिस्वातंत्र्य तकलुपी असल्याचे उपरोधपूर्ण शैलीने दाखून दामल्यांनी म्हटले आहे कि, 'ह्यापेक्षा आमच्या मनगटात ताकद असताना आमच्यावर कोणी हात टाकीला तरी पुरवेल; परंतु आम्हांस जिवंत मुडद्याचे स्वातंत्र्य नको; तसेच आमच्यापाशी काही माया असली पाहिजे, मग आम्ही चोराच्या भितीस जुमानणार नाही. ...असल्या पुळपुळित सौभाग्यापेक्षा झळझळित वैधव्य पत्करले...'

पण स्वराज्यात तरी व्यक्तीला 'कोणत्या ठिकाणी कोणत्या अवस्थेत स्वातंत्र्य आहे की ज्याच्या प्राप्तीने मनुष्याचे पूर्ण समाधान होईल?' या दृष्टीने दामल्यांनी यापुढे 'स्वातंत्र्याचा शोध' केला असून 'एका मित्रा'च्या सविस्तार आत्मनिवेदनाच्या आधाराने या प्रश्नाच्या उलटसुलट बाजू मांडल्या आहेत; आणि

असा उपसंहार केला आहे की, 'मला स्वातंत्र्याचा शोध लागण्याची अद्याप अशा आहे. ...मनुष्यास पारतंत्र्य का प्राप्त झाले आहे? त्याच्या पारतंत्र्याची कारणे काय? अथवा त्याच्या स्वातंत्र्यास ज्या मर्यादा उत्पन्न झाल्या आहेत त्या कोठून? ह्याचा खल करावा; आणि ती कारणे अथवा त्या मर्यादा दूर करिता येण्यासारख्या असल्यास पूर्ण स्वातंत्र्याची प्राप्ती होण्याचा संभव आहे. ...खरे स्वातंत्र्य हे वंध्यापुत्राप्रमाणे अशक्य नसून मेरूपर्वताप्रमाणे... जरी आपणास उपलब्ध नसले तरी शक्य आहे. तात्पर्य ते केवळ चौकोनी वर्तुळ खास नाही.'

'सुशिक्षण व सुधारणा'

'स्वातंत्र्यास्वातंत्र्य' या लेखात दामल्यांनी ज्या एका 'विक्षिप्त मित्रा'ची रुजवात करून दिली आहे, त्याला याही लेखात पुन्हा पकडून आणले आहे. एकंदरीत दामल्यांना काही विचार मांडण्याला मित्रमुख सोयीचे वाटते असे दिसते. प्रस्तुत लेखात तर उपक्रमोपसंहारात्मक काही थोडा भाग सोडल्यास बाकी सर्व या मित्राचेच आत्मनिवेदन आहे. या मित्रामुळे दामल्यांना आणखी एक फायदा झाला आहे. तो हा की, त्यांना लेखनात टाळता न येण्यासारख्या 'थोडासा पाल्हाळ, गौरव, अतिशयोक्ती, फाजील उल्लास व जोर इत्यादी गोष्टी' मित्राच्या 'विचारांचे विशेषत्व कायम ठेवण्यासाठी' राजरोसपणे, 'छाटाछाट न करता' ठेवता आल्या आहेत. 'व्यसने मित्रपरीक्षा' म्हणतात, ते काही खोटे नाही!

दामल्यांचा हा मित्र एक पदवीधर असून 'सुशिक्षणाचे ...साधारण बहुतेक बरे-वाईट सर्व परिणाम' आपल्या ठिकाणी वास करीत असल्याचे त्याने आपल्या निवेदनाच्या आरंभीच सांगून टाकले आहे. 'पाश्चात्त्यांच्या आगमनाने ज्या ज्या अर्वाचीन विद्याविषयक नूतन संस्था व नूतन क्रियामार्ग आमच्या लोकांच्या नजरेस आले आहेत व येत आहेत,' त्यांच्या संस्कारांत हा मित्र वाढलेला आहे; आणि त्याची वेशभूषा, करमणूक, व्यसने, राहणी, सवयी, घराची सजावट, वस्तुसंग्रह इत्यादी लहानमोठ्या सर्व गोष्टींतून हे संस्कार प्रकट होत आले आहेत. तथापि पुढे पुढे ह्या मित्राला '(आधुनिक) शिक्षणाचा पोचटपणा व नकलीपणा' दिसू लागल्यामुळे खिन्नतेने ग्रासले आहे, आणि या खिन्नतेचेच कढ त्याच्या सर्व निवेदनाला व्यापून राहिले आहेत.

आपल्या मित्राच्या निवदानावर दामल्यांनी आपण असे उत्तर दिल्याचे नमूद केले आहे की, 'अर्वाचीन इंग्रजी शिक्षण तुम्ही म्हटल्याप्रमाणे कितीही नादान असो, त्याचे योगाने आमच्यात चौकसपणा, विचारजागृती व शोधक बुद्धी उत्पन्न होऊन आमचे पुरातन आचारविचार जे अज्ञानाने, रूढीने व परम्परेने दुषित झाले होते त्यांतील दोषांचे आविष्करण करण्यास तरी त्याची आम्हास बरीच मदत झाली आहे. ...शिवाय सुधारणेला प्रथम पश्चिम दिशेचा सोसाट्याचा वारा लागून ती जी भडकली होती तिची दिशा बदलली पाहिजे, असे अर्वाचीन सुशिक्षितांपैकीच एका खऱ्या सुशिक्षिताने - कै. विष्णूशास्त्री चिपळूणकर ह्यांनी - लोकांच्या निदर्शनास अणिल्यापासून तिला योग्य वळण लागू लागले आहे. तसेच आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता ठरवून तिला आपले तनुमनधन अर्पण करणारे लोक आमच्यात फारसे नाहीत हे जरी खरे आहे तरी राजकीय चळवळीस वाहिलेले टिळक, इतिहाससंशोधनास वाहिलेले राजवाडे अशा प्रकारची मंडळी थोडथोडी चमकू लागली आहे. आपण जो अर्वाचीन सुशिक्षणावर व सुधारणेवर कडाक्याचा ताशेरा झाडला आहे तो थोडासा फाजिल व अस्थानी झाला आहे असे आमचे मत आहे. तथापि आपले म्हणणे मनन करण्यासारखे आहे...'

५. सरस्वतीस्तोत्र

'सातव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा रिपोर्ट' मध्ये मुद्रित,
पृ. ४९-५४, मुंबई, १९१४

हा निबंध दामल्यांनी अकोले येथे ऑक्टोबर १९९२ मध्ये भरलेल्या सातव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या निमित्ताने लिहिला आहे. निबंध सर्वस्वी प्रासंगिक स्वरूपाचा असून त्यात विशेष लक्षणीय असे काही नाही.

६. शुद्धलेखनसुधारणा अथवा सरकारी बंडावा

'ग्रंथमला' मासिक, कोल्हापूर, १९०५ पृ. १०६.

हा 'निबंध' मुळात 'ग्रंथमाला' मासिकातून आणि नंतर स्वतंत्र पुस्तक म्हणून प्रसिद्ध झाला. १९०४ मध्ये मराठी शुद्धलेखनाविषयी फार मोठा झाला.त्यात पारंपरिक लेखन पद्धतीचे (या पद्धतीला अडीचशे-तीनशे वर्षांची परंपरा असल्याचे दामल्यांनी निदर्शनास आणले आहे.) समर्थन करण्यासाठी प्रस्तुत निबंध लिहिलेला असून त्यात 'ह्रस्वदीर्घप्रकरण' 'व्यंजनान्त शब्द' आणि 'अनुस्वार' हे प्रमाणलेखनविषयक चर्चेतील तीन नित्याचे मुद्दे दामल्यांनी सविस्तर चर्चिले आहेत; आणि साने-गोडबोले-हातवळणे या तिघांचे - 'मुनित्रया'चे- 'मराठी भाषेची लेखनपध्दती' हे पुस्तक पूर्वपक्षस्थानी कल्पून, पृष्ठांकनिर्देशपूर्वक त्यातली अवतरणे उद्धृत करून या विषयातला आपला उत्तरपक्ष मांडला आहे. वर उल्लेखिलेल्या वादाच्या संदर्भात १९०४ मध्ये पुण्यात जी एक विद्वत्परिषद सरकारने बोलावली होती, ती होऊन गेल्यावर दामल्यांनी प्रस्तुत निबंध लिहिला, हे या निबंधातील 'पुण्यातील कान्फरंस' मधल्या चर्चेच्या उल्लेखांवरून आणि निबंधाअखेर दिलेल्या दिनांकावरून (ता. १०-११-०४) दिसून येते.

या वादात दामल्यांची भूमिका अशी आहे : 'शुद्धलेखनसुधारणा ही एक नसती उठाठेव होय. ...शुद्धलेखनासारख्या केवळ वैज्ञानिक विषयात पक्षाभिमानाने अंध होऊन जाऊन रणे माजणे व या विषयाचा अखेर निकाल वाडीची तरफदारी करणाऱ्या सरकारने लावणे हे तर फारच विलक्षण होय.' सरकारची या वादातली ही पक्षाभिनिविष्ठ दृष्टी पाहूनच दामल्यांनी प्रस्तुत निबंधाला 'सरकारी बंडावा' असे चमत्कृतिपूर्ण पर्यायी नाव देऊन 'भाषेत बंद! आणि बंदास सरकारचा आश्रय! सर्वच विचित्र!' असे एका ठिकाणी उद्गार काढले आहेत. दामल्यांना स्वत:ला असे वाटते की, 'एकंदर भाषेसंबंधाने सुशिक्षित लोकांचा बोलण्याचा व लिहिण्याचा प्रचार प्रधान होय. त्याचे पुढे इतर गोष्टी रद्द होत. ...सुशिक्षित प्रघात हेच जर शुद्ध व प्रौढ भाषेचे खरे लक्षण होय...तर सुशिक्षित प्रघाताबरोबर शुद्ध भाषाही बदलावी हे साहजिक आहे. ...अशा रीतीने जे जे ज्या ज्या काळी प्रचलित ते ते त्या त्या काळी खरेच व शुद्धच होय. ...तथापि जे जे फरक करण्यात येत आहेत ते ते व्युत्पत्तीचे व उच्चाराचे तत्त्वांस धरूनच आहेत असे जे प्रतिपादण्यात आले आहे ते सर्वांशी खरे नसल्यामुळे इतकी व्यर्थ काथ्याकूट करावी लागली.'

दामल्यांच्या मते व्युत्पत्ती आणि प्रचलित लेखनप्रचार ही दोन्ही तत्त्वे प्राय: सुधारणेला प्रतिकूल आहेत. ज्या बाबतीत ती सुधारणावाद्यांना प्रतिकूल नाहीत त्या बाबतीत ते संशयाचा फायदा देऊन लेखनविकल्प (एकपर्यायिनियम नव्हे) मान्य करतात. त्यांच्या मते 'भाषासंग्रह, स्पष्टीकरण व सामान्य नियमांचे आविष्करण ही वैयाकरणांची मूळ कर्तव्ये होत. भाषेचे नियमन किंवा बंधन म्हणजे अपवादक

गोष्टीस सामान्य नियामांचेच वळण देणे हा अव्यापारेषु व्यापार होय;' म्हणूनच 'भाषेच्या दृष्टीने सक्ती, काठिन्य, अडचण, सोय इत्यादी मुद्दे अप्रकृत होत.'

सुधारणावाद्यांच्या मताने मराठी शब्दांतील अंत्य इकार-उकार आणि अकारान्त शब्दांतील उपांत्य इकार-उकार उच्चारांत दीर्घ असल्यामुळे 'वृत्ती, बुद्धी, भानू, वेणू, वीष, गूण' असे लिहावयास हवे. यावर दामल्यांचा मुख्य युक्तिवाद असा की, निर्दिष्ट स्थली स्वर ह्रस्वच पण साघात (accented) असल्यामुळे ते दीर्घ असल्यासारखे वाटतात; (असे साघात दीर्घ-स्वरही असतात, ते दीर्घतर ऐकू येतात.) वस्तुतः त्यांचा उच्चारणकाल दिर्घाहून कमी असतो. या संदर्भात डॉ. भांडारकरांनी 'कान्फरन्स' मध्ये जी साक्ष दिली तिच्याही न्युनाधिकाची चर्चा दामल्यांनी केली आहे. या बाबतीतला वाद तोडण्यासाठी त्यांनी 'ध्वनिसंग्राहक यंत्रा'च्या (फोनोग्राफ) ज्या नळकांड्यावर ध्वनीची आकृती निघते त्या नळकांड्याचे साहाय्य घेण्यास सुचवले आहे. त्यासाठी 'ह्रस्व इकारान्त...संस्कृत शब्द ज्या लेखामध्ये आलेले आहेत असा लेख सुशिक्षित मनुष्याकडून साहजिकपणे वाचवून त्याचा त्या नळकांड्यातील यंत्रात संग्रह करावा.' आणि मग 'एक सूक्ष्मदर्शक (magnifying) काच आणवून तिच्या साह्याने' त्या आकृतीचे 'फार सूक्ष्मपणे निरीक्षण करावे.' या निरीक्षणातून विरुद्ध निष्कर्ष निघाला तरी तो मान्य करण्याची तयारी दामल्यांनी दाखवली आहे. या वादात प्राकृत भाषांच्या प्रवृत्तीची साक्ष ते निरपवाद म्हणून मान्य करीत नाहीत; कारण मराठीत संस्कृत शब्द केवळ प्राकृतद्वारा न येत 'परभारेही आले आहेत.' म्हणूनच विद्वान्, क्वचित्, अर्थात् इत्यादी व्यंजनान्त शब्द 'विद्वान', 'क्वचित', 'अर्थात' असे लिहिण्याच्या सुधारणावाद्यांच्या सूचनेस त्यांचा विरोध आहे. प्रचलित अशा प्रायः सर्व अनुस्वारांना व्युत्पत्तीचे पाठबळ असल्याचे दामल्यांनी दाखवून दिले आहे. 'पाणी', 'लोणी' यांसारख्या शब्दांच्या अंतांवर अनुस्वार प्रचारात नसला तरी व्युत्पत्तिप्राप्त असल्यामुळे द्यावा, असा सुधारणापक्षीय भांडारकरांचाही कल आहे, हे दामल्यांनी नमूद केले आहे. व्युत्पत्तिसंदेहस्थली (जसे, 'शेंपूट') दामले अनुस्वारविकल्प मान्य करतात.

संपादित रचना

७. श्रीहरिहरमहाराज उदासी यांची कविता

अभंग व पदे आणि एक गद्यलेख : (प्रकाशक-) दामोदर सावळाराम आणि मंडळी, ठाकुरद्वार, मुंबई, १९११, १२ x १७ सें., पृ. ६+४४०.

या ग्रंथात दामल्यांनी हरिहरमहाराज उदासी या 'आधुनिक संता'च्या कवितेचे संपादन करून, म्हणजे 'साधारणपणे जेथे जेथे एक विषय किंवा मुद्दा संपतो, त्या त्या ठिकाणी तुकडे पाडून प्रत्येकास साजेल असे नाव देऊन' संकलन केले आहे. हे करीत असताना संपादकांनी 'अपशब्द बहुतेक ठिकाणी गाळले आहेत. ...साधूच्या तोंडचे अपशब्दसुद्धा गाळू नयेत असे माझ्या काही मित्रांचे म्हणणे होते. परंतु बहुमतास तसे करणे पसंत पडणार नाही असे समजून त्यांचे जागी फुल्या दिल्या आहेत.' ग्रंथारंभी उदासीमहाराजांचा 'परिचय' दिलेला आहे.

संपादकीय प्रस्तावनेखाली निर्दिष्ट काल मे १९११ हा आहे. यावरून हा संपादित ग्रंथ 'शास्त्रीय मराठी व्याकरणा'च्या पहिल्या हप्त्याच्या आधी सुमारे महिनाभर प्रसिद्ध झालेला दिसतो. हा ग्रंथ आपल्या व्याकरणग्रंथाच्या मोबदल्यादाखल दामल्यांनी प्रकाशकाकडून छापवून प्रकाशित करवला, अशी त्यांच्या चरित्रात माहिती मिळते आणि तो व्याकरणाआधी प्रसिद्ध झाला, या घटनेने तिला बळकटी मिळते.

अनुक्रमणिका

स्वतंत्र ग्रंथ

८. न्यायशास्त्र (निगमन - DEDUCTIVE LOGIC)

(प्रकाशक-) श्रीसयाजी लघु ज्ञानमंजुषा, बडोदे, १८९६,
१० x १६.५ सें., पृ. ३+४+३+२+१७६.

दामल्यांनी उज्जयिनीच्या कॉलेजमध्ये गेल्यानंतर दोनतीन वर्षांतच लिहिलेले हे त्यांचे बहुदा पहिलेच पुस्तक होय; आणि या दृष्टीने हा त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाच्या उमेदवारीच्या काळातला छोटा प्रयत्न म्हणता येईल. या त्यांच्या पुस्तकाला गायकवाड सरकारकडून १५० रुपयांचे पारितोषिक मिळाले होते.

'न्यायावर ग्रंथ नाहीत' हे पाहून 'मराठी भाषेची अल्प तरी सेवा करावी' या हेतूने लिहिलेले 'हे पुस्तक इंग्रजीतील कोणत्याही ग्रंथाचे भाषांतर नसून इंग्रजी ग्रंथाचे आधाराने स्वतंत्रपणे लिहिले' असल्याचे दामले प्रस्तावनेत लिहितात. 'या ग्रंथातील परिभाषा होता होईल तितकी संस्कृत न्यायातून घेतली आहे. पण ज्या ठिकाणी तसे करणे साधले नाही, त्या ठिकाणी ती इंग्रजीच्या आधाराने नवीन तयार केली आहे.' या पुस्तकात दामल्यांनी Induction या अर्थाने 'आगम' ही संज्ञा 'श्री सयाजी लघु ज्ञानमंजुषे'च्या 'एडिटरांचे सूचनेवरून' योजली असली, तरी दुसऱ्या भागात या अर्थी आपल्या पसंतीची 'विगमन' ही संज्ञा पुनः प्रस्थापित केली आहे. या पुस्तकात 'उपोद्घाता' व्यतिरिक्त 'पदे,वाक्ये, अनुमाने, पद्धती' असे चार भाग केले असून या सर्वांत मिळून ३३ 'धडे' आहेत. तिसरा 'अनुमाने' हा भाग एकूण ग्रंथाच्या निम्म्याहून अधिक असून त्यात १६ धडे आहेत; आणि चौथ्या 'पद्धती' या भगत एकच धडा आहे. शेवटी 'पारिभाषिक शब्द व त्यांचे इंग्रजी अर्थ' देणारी एक ६ पृष्ठांची यादी जोडली आहे.

'जेव्हा एक किंवा अनेक विधानांपासून तद्भिन्न विधान करण्यास प्रत्यवाय नसतो तेव्हा त्या विधानसमुदायास अनुमान म्हणतात. अनुमान दोन प्रकारचे आहे : एक आगामी अनुमान किंवा संक्षेपाने आगम; व दुसरे निगामी अनुमान किंवा संक्षेपाने निगमन. ...काही गोष्टींच्या अनुभवाने त्यांच्यासारख्या दुसऱ्या विशेष गोष्टींविषयी किंवा त्या गोष्टी ज्या वर्गात मोडतात त्या वर्गाविषयी सामान्ये करून, ...विश्वव्यापी कार्यकारणभाव व सृष्टिक्रमाची सुरुपता यांचे सहाय्याने जे अनुमान काढितात त्यास आगामी अनुमान किंवा आगम म्हणतात. ...निगमन आगमापासून निघते... 'सोमल खाल्ल्याने मनुष्य मरते' हा आगम. ...ह्या विधानावरून 'मनुष्याचा प्राण हरण करणाऱ्या वस्तूंपैकी सोमल आहे' असे अनुमान निघते... ह्या अनुमानास निगमी अनुमान किंवा निगमन म्हणतात. आगमाने कोणत्याही एका वर्गाविषयी सामान्य नियम स्थापण्यात येतात; निगमनाने ते नियम विशेष व्यक्तीस लागू करण्यात येतात. ...या पुस्तकात फक्त निगमनाचाच विचार केला आहे.' 'निगमी अनुमानाची उदाहरणे' पाहिल्यावर लक्षात येते की, 'अनुमाने वाक्यांची झालेली आहेत, व वाक्ये पदांची झालेली आहेत. ...म्हणून निगामी न्यायाचे तीन भाग करितात : पदे, वाक्ये व अनुमाने. ...ह्या तीन भागांस 'पद्धती' म्हणून एक चौथा भाग जोडण्याचा नैयायिकांचा परिपाठ आहे. विषयाचे विवेचन कसे करावे किंवा विषयाचे विवेचनातील अनुमानाची योजना कशी करावी, या विचारस पद्धती म्हणतात.' दामल्यांनी व्याकरणात 'वाक्यपृथक्करणा'चा 'विषयोपन्यास' करताना न्यायशास्त्राचा वाक्यविषयक दृष्टिकोन मांडला आहे, तो प्रस्तुत पुस्तकात दुसऱ्या 'वाक्ये' या भागात आला आहे.

९. न्यायशास्त्र : पुस्तक दुसरे – विगमन

(प्रकाशक-) दामोदर सावळाराम आणि मंडळी,
बडोदे आणि मुंबई, १९०२, १०.५ x १७.५ सें., पृ. १२+४७६.

हा ग्रंथ 'ग्रंथसंपादक आणि प्रकाशक मंडळीची ग्रंथमाला - ग्रंथ २२ वा' म्हणून प्रकाशित झाला असून तो ग्रंथकर्त्याने 'श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड सरकार' यांना अर्पण केला आहे. ग्रंथाचे नाव ग्रंथात मुखपृष्ठाखेरीज इतरत्र 'न्यायपद्धती' असे दिले आहे; ते मुळात योजलेले नाव असावे. 'विगमन हा शब्द Induction ह्या अर्थी नवीन बनविला आहे.' आपल्या पारिभाषिक शब्दांच्या टाकसाळीत' दामल्यांना अशी 'नवीन नाणी बरीच पाडावी लागली.' ती त्यांनी भागाच्या शेवटी यादी जोडून एकत्र दिली आहेत. 'हा ग्रंथ भाषांतर नसून इंग्रजीतील Inductive Logic वरील ग्रंथांच्या आधाराने लिहिला आहे. तथापि विषयरचना, प्रतिपादन व उदाहरणे ह्या बाबतीत अनेक ठिकाणी स्वातंत्र्याचा उपयोग केला आहे.' प्रस्तुत ग्रंथा विषय 'इतका कठिण आहे की, आमचेकडे कॉलेजात बी. ए. चे वर्गातील जेवढे विद्यार्थी तो आपल्या आवडीचा म्हणून स्वेच्छेने घेतील त्यांसच तो शिकविण्यात येतो. ...तथापि पारिभाषिक शब्द पूर्ण लक्षात वागवून जो ह्या विषयाचे, काव्यनाटकाप्रमाणे वाचन नव्हे तर, अध्ययन करील त्यास प्रकृत ग्रंथ समजण्यास कठिण पडणार नाही. अर्थात हा ग्रंथ साग्र वाचणारे सध्या फारच थोडे लोक निघणार. ...कोणतेही शास्त्रीय उच्च प्रतीचे ज्ञान हे सार्वजनिक इस्टेट होऊ शकत नाही. ...तात्पर्य, हे पुस्तक लिहिण्याचा उद्देश इतकाच की विगमन ह्या विषयास मराठी रूप द्यावे.' प्रस्तावनेच्या शेवटी दामल्यांनी प्रस्तुत ग्रंथाला 'श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड' यांनी बक्षीस देऊन लेखकाचा बहुमान केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे ('विगमन') चार भाग पाडले आहेत : (१) उपोद्घात, (२) आनुषंगिक गोष्टी, (३) विगामानाचे मार्ग आणि (४) हेत्वाभास. या चार भागांत मिळून एकूण २९ 'धडे' आहेत. प्रारंभी विगमनाचे स्वरूप स्पष्ट करताना दामले लिहितात : 'ज्या अनुमानात एका किंवा अनेक विशेष गोष्टींच्या निरीक्षणाने सामान्य नियम स्थापित करण्यात येतात त्या अनुमानास विगमन म्हणतात; आणि त्या सामान्य नियमासही लक्षणेने विगमन म्हणण्याचा परिपाठ आहे. सोमल खाऊन मेलेल्या मनुष्यांची अनेक उदाहरणे पाहिल्यानंतर जर कोणी असे म्हणेल की 'ही मनुष्ये सोमल खाल्ल्याने मेली' किंवा 'सोमलाच्या ह्या तुकड्यांनी मनुष्ये प्राणास मुकली' तर हे विगमन नव्हे. कारण वरील वाक्यांत निरीक्षित विशेष गोष्टींचाच समावेश होतो. त्यांत निरीक्षणाशिवाय दुसरे काही नाही. ह्या निरीक्षणाने जर कोणी असे म्हणेल की 'सोमल खाल्ल्याने मनुष्य मरते' तर ते विगमन होय. ...विगमनात तीन गोष्टी अवश्य दृष्टीस पडतात. त्या अशा : (१) विगमन हे बोधक असले पाहिजे. (२) शिवाय हे वाक्य सामान्य असले पाहिजे. (३) आणि हे वाक्य विशेष गोष्टींच्या निरीक्षणाने किंवा प्रयोगाने स्थापन झाले पाहिजे.' विगमनाच्या मार्गांसंबंधी ते लिहितात : 'एतावता, महत्त्वाची बहुतेक सर्व विगमने कार्यकारणसंबंधांवर अवलंबून असल्यामुळे, निरीक्षणाचा उपयोग सृष्टीतील वृत्तांमध्ये कार्यकारणभाव स्थापन करण्यातच विशेष महत्त्वाचा आहे. हा संबंध स्थापन करण्याच्या ज्या रीती त्यांस विगमनाचे मार्ग असे म्हणतात. बेकनने ह्या विषयांसंबंधाने काही गोष्टी सांगितल्या आहेत हे खरे, तथापि विगमनाचे शास्त्रीय पद्धतवार मार्ग मिल्ल साहेबानेच प्रथम घालून दिले, असे म्हटले पाहिजे. हे मार्ग पाच आहेत; त्यांची नावे : अन्वय, व्यतिरेक, अन्वयव्यतिरेक, परिशेष आणि सहविकार.'

'शास्त्रीय व्याकरण'कार दामल्यांची घडण होण्यातला एक महत्त्वाचा टप्पा या न्यायशास्त्रविषयक दोन ग्रंथांतील विषय, मांडणी, शब्दयोजना, परिभाषा इत्यादींमधून प्रत्ययाला येईल. या दोन ग्रंथांचे वर्णन

अनुक्रमणिका

दामल्यांच्या चरित्रात 'दोन छोटेखानी पुस्तके' असे केले आहे. ही पुस्तके 'शास्त्रीय व्याकरणा'हून लहान असली तरी यांपैकी दुसरे (प्रस्तुत) 'छोटेखानी' नक्कीच नाही. ही दोन्ही पुस्तके मिळून आकाराने 'शास्त्रीय व्याकरणा' च्या निम्म्याइतकी भरतील. आणि हा नुसता पृष्ठसंख्येचा प्रश्न नाही; हे सर्व शास्त्रीय विषयावरील लेखन आहे. द. मो. दामले या चरित्रकारांना ही पुस्तके पाहायला मिळाली नाहीत; त्यांविषयीची माहिती त्यांनी स्मरणाने आणि अदमासाने दिली आहे.

१०. शास्त्रीय मराठी व्याकरण (उद्घाटन व ऊहापोह)

लेखक - मोरो केशव दामले, सुपरिटेंडंट, मिडल स्कूल - नागपूर.

प्रकाशक - दामोदर सावळाराम आणि मंडळी, १९११;

१३ x २१ सें., पृ. ४+४+५+४+२+३+९९०.

'शास्त्रीय मराठी व्याकरण' हा दामल्यांचा अग्रग्रंथ - 'magnum opus' - होय. या ग्रंथाची तयारी ते उज्ञयिनीला असल्यापासून सुमारे १५ वर्षे करीत होते, अशी माहिती मिळते. या काळात त्यांनी या ग्रंथात परामर्शिण्याच्या विविध विषयांवर सुटी टिपणे-टाचणे केली असावी. अशा दृष्टीतून सुटून बाजूला राहिलेल्या एका टाचणाचा त्यांनी स्वत:च या ग्रंथाच्या परिशिष्टात निर्देश केला असून त्यात प्रयोगप्रकरणातल्या एका अंकातली माहिती दुरुस्त केली आहे. हा ग्रंथ प्रत्यक्ष लिहून काढण्याचे काम नागपूरला १९१० मध्ये चारपाच महिने चालले होते. (असे दत्तोपंत लिहितात; पण यात घोटाळा वाटतो. कारण या ग्रंथाचे बरेचसे हस्तलिखित पाहून रा. सा. विष्णू मोरेश्वर महाजनी यांनी लिहिलेल्या अभिप्रायपत्रावर दिनांक '२८ ऑगस्ट १९०९' हा आहे.) त्यासाठी त्यांनी मुद्दाम जाड कोरा कागद आणून त्याच्या सोयिस्कर अशा वह्या त्यांवर जाड ब्राउन पेपरचा पुठ्ठा घालून शिवल्या होत्या. या वह्यांत त्यांनी आपल्या सुवाच्य हस्ताक्षराने सबंध ग्रंथ एकटाकी लिहून काढला होता. या एकूण १८ वह्या पुढे बरीच वर्षे श्री. द. मो. दामले यांनी सांभाळून ठेवल्या होत्या. त्या प्रथम सीतारामपंतांनी बांधलेल्या घरात होत्या. (हे घर पुण्यात सध्याच्या टिळक रस्त्याला सर परशुरामभाऊ कॉलेजसमोर फाटा फुटून 'खजिना महाल' या इमारतीशेजारून उत्तरेकडे जो बोळ जातो त्यात होते.) पुढे १९५९ साली हे घर दामल्यांनी श्री. भोग नावाच्या गृहस्थांना विकले, तेव्हा त्यातले आपले सामान शनिवार पेठेत आपल्या सासुरवाडीला (शनिवार पोलीस चौकीसमोर, जोगळेकर वाडा) नेऊन ठेवले; त्यात हे व्याकरणाचे हस्तलिखित होते. हे हस्तलिखित साहित्य-परिषदेसारख्या एखाद्या संस्थेत ठेवण्याचा दामल्यांचा विचार होता. तो आचरणात येण्यापूर्वी १९६१ साली पानशेतचे धरण फुटून पुण्यात जलप्रलय झाला; त्यात हे हस्तलिखित नष्ट झाले. 'नलिनीं गज उज्ञहार!'

ग्रंथ तयार झाला. पण एवढा मोठा ग्रंथ छापून प्रकाशित कोण करणार? हत्ती फुकट मिळाला तरी त्याचे पालनपोषण करणे हे 'येरा गबाळाचे काम नोहे!' मोरोपंतांनी पाचसहा महिने खटपट केल्यावर या अडचणीतून मार्ग निघाला. मुंबईला शेठ दामोदर सावळाराम यंदे या मुद्रक-प्रकाशकांशी दामल्यांचा यापूर्वी तर्कशास्त्रावरील ग्रंथाच्या वेळी लेखक म्हणून संबंध आला होता. तो या वेळी उपयोगी पडला.यंद्यांनी या पुस्तकाची जबाबदारी उचलली;आणि हा ग्रंथ 'ग्रंथसंपादक व ग्रंथप्रसारक मंडळीची ग्रंथमला - ग्रंथ ४६ वा' म्हणून 'शास्त्रीय मराठी व्याकरण (उद्घाटन व उहापोह)' या नावाने प्रकाशित झाला. याबद्दल आपणाला वाटणारी कृतज्ञता दामल्यांनी 'दिलदार प्रकाशक' (उपसंहार ०४) असा यंद्यांचा निर्देश प्रास्ताविकात करून प्रकट केली आहे. 'मातृभाषेची ही अल्प सेवा' दामल्यांनी 'श्रीदत्तचरणी प्रणामपूर्वक अर्पण' केली आहे. मुंबईला यंद्यांच्या 'इंदुप्रकाश' छापखाण्यात या पुस्तकाचे मुद्रण १९११ मध्ये झाले, आणि त्या वर्षी हा

ग्रंथ डेमी आकारात, दोन हप्त्यात - दोन 'खंडां'त- प्रसिद्ध झाला. पहिल्या हप्त्यात सुरवातीची ४६८ पृष्ठे समाविष्ट असून त्यात 'शब्दविचारा'तील 'विकरण' हे प्रकरण पूर्ण झाले. राहिलेली ९९० पर्यंतची पृष्ठे दुसऱ्या हप्त्यात प्रसिद्ध झाली. पहिल्या हप्त्याला दामल्यांनी 'उपक्रम' म्हणून निवेदन जोडले असून त्याच्या खाली दिनांक १५-६-१९११ हा आहे; दुसऱ्या हप्त्याला 'उपसंहार' या नावाचे निवेदन आहे त्याखाली १५-१०-१९११ हा, आणि दोन्ही हप्त्यांना मिळून 'प्रस्तावना' जोडली आहे त्याखाली ११-११-१९११ हा दिनांक आहे. ह्या ग्रंथाच्या मुद्रणासाठी - मुद्रिते तपासण्यासाठी - दामले एप्रिलच्या आरंभी एकदोन महिन्यांकरता मुंबईला येऊन राहिले होते, असे कळते. यावरून हा ग्रंथ एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यात मुद्रित झाला, असे दिसते. या कामी त्यांना श्री. मोरेश्वर सखाराम मोने यांनी साहाय्य केले.

या ग्रंथात स्वत: दामल्यांनी 'उद्घाटन' आणि 'ऊहापोह' असे मजकुराचे दोन प्रकार कल्पिले असून त्या दोहोंसाठी अनुक्रमे मोठा (१४ पॉइंट, ग्रेट) आणि लहान (१२ पॉइंट, पायका) असे वेगवेगळे ठसे (टाइप) नियुक्त केले आहेत; शिवाय 'उहापोहा'चा मजकूर चौकटी-कंसंकित केला आहे, आणि त्याची स्वतंत्र सूची करून जोडली आहे. याशिवाय या ग्रंथात 'टीप', 'सूचना' अशा नावांनी काही मजकूर अधुनमधून दिलेला आहे,तोही उहापोहाच्या बारीक ठशात छापला आहे. 'शुद्धिपत्र'चार पृष्ठे; 'अनुक्रमणिका' दोन पृष्ठे; 'रा. सा. विष्णू मोरेश्वर महाजनी एम. ए. ह्यांचा अभिप्राय' - मूळ इंग्रजी आणि त्याचे मराठी भाषांतर - एक पृष्ठ; मुखपृष्ठावर दत्तात्रेयाचे लहानसे चित्र; त्याखाली लेखकाचे नाव आणि 'सुपरिटेंडंट, मिडल स्कूल - नागपूर' हा मजकूर; पहिल्या पृष्ठावर प्रारंभी 'श्री दत्त' अशी मंगलाक्षरे; मुखपृष्ठाच्या मागच्या बाजूला मुद्रक-प्रकाशकनिर्देशासह 'हे पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणे रजिस्टर करून यासंबंधाने सर्व हक्क लेखकाने आपणाकडे ठेविले आहेत' असा मजकूर; किंमत साडेचार रुपये; - असे या पहिल्या मुद्रावत्तीचे स्वरूप आहे. विष्णू मोरेश्वर महाजनी हे 'माजी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, वऱ्हाड; आणि अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे फेलो' म्हणून निर्दिष्ट असून त्यांनी प्रस्तुत सात-आठ ओळींचे अभिप्रायपत्र 'अकोल्या'हून 'ता. २८ ऑगस्ट १९०९' या दिवशी लिहिल्याचे नमूद आहे. यावरून असे दिसते की, हा ग्रंथ छापण्यापूर्वी सुमारे वर्ष-दीड वर्ष दामल्यांची त्याचा काही भाग हस्तलिखिताच्या स्वरुपात महाजनींना दाखवला होता; आणि त्यांच्याकडून अनुकूल मत आल्यावर त्यांनी पुढचे पाऊल टाकले होते.

'या ग्रंथाप्रित्यर्थ त्यांना स्वत:ला एक पैचा देखील मोबदला मिळाला नाही. त्यांनी केवळ ग्रंथ तयार झालेला होता व इतकी मेहनत कित्येक वर्षे तो ग्रंथ तयार करण्यासाठी त्यांनी केली होती. म्हणून तो कसाबसा छापून तरी प्रसिद्ध होऊन विद्वानांपुढे यावा, म्हणून त्याची प्रथमावृत्ती काढण्याची परवानगी प्रकाशकांस मोफत दिली होती.' याविषयी दत्तोपंत लिहितात : 'पण अन्य असा मोबदला त्यांना मिळविला... 'हरिहर महाराज उदासी यांची कविता' ...पुस्तकरूपाने छापून प्रसिद्ध करण्याची शर्त अण्णांनी श्री. यंदे शेट यांस घातली. ...हा काव्यसंग्रह यंदे शेट यांनी फुकट छापून प्रसिद्ध केला.' या माहितीवरून शास्त्रीय विषयावरील ग्रंथांच्या मुद्रणप्रकाशनांतली जोखीम आणि अशा ग्रंथांच्या कर्त्यांची स्वस्ताई या दोन्ही गोष्टींवर प्रकाश पडतो!

अनुक्रमणिका

दुसरी आवृत्ती

शास्त्रीय मराठी व्याकरण (उद्‌घाटन ऊहापोह)
लेखक - मोरो केशव दामले, एम. ए., सुपरिंटेंडंट, नीलसिटीस्कूल-नागपूर;
श्री. रा. ज. देशमुखांच्या संग्रही.
प्रकाशक - केशव भिकाजी धावले, बुकसेलर, मुंबई, १९२५
(दुसरी आवृत्ती). १३ x २१ सें., पृ.- ...९८८.

१९२५ मध्ये या ग्रंथाची जी दुसरी आवृत्ती निघाली तीत पहिल्या आवृत्तीतले शुद्धिपत्र गाळण्यात आले. त्यात दुरुस्त केलेल्या चुका मात्र पुष्कळशा नादुरुस्तच राहिल्या आहेत; आणि असंख्य नव्या चुका झाल्या आहेत. दामल्यांनी शुद्धिपत्रात गाळावयास सांगितलेला मजकूर ठेवला आहे ('सुरा' -प्रत्ययापुढचे 'आळसुडा' हे उदाहरण); तर मूळ ग्रंथात असलेला मजकूर कोठे कोठे गाळला आहे. या मुद्रावृत्तीची पृष्ठे ९८८, म्हणजे पहिल्या मुद्रावृत्तीच्या पृष्ठांहून दोन कमी, इतकी आहेत. ती यामुळे की, पृ. ३३९ ते पृ. ३६९ या पृष्ठांच्या दरम्यान प्रत्येक पृष्ठात पुढच्या पृष्ठावरचा थोडा मजकूर जिरत जाऊन पृ. ३६९ अखेर एकूण दोन पृष्ठे जिरली आहेत. यामुळे असे झाले की, पुढे पुढे जेथे कोठे दामल्यांनी मागच्या पृष्ठांचे हवाले दिले आहेत, त्यांचा पृ. ३३९ पासून पुढच्या भगात अपेक्षित मजकुराशी मेळ बसत नाही. अनुक्रमणिकेत 'व्युत्पत्ती' या प्रकरणातील सुमारे २०० पृष्ठांतील अध्यायांचे विषय गळले आहेत. एकूण या आवृत्तीवर विसंबून दामल्यांच्या व्याकरणाचा अभ्यास करणे जोखमीचे आहे.

याच कारणामुळे माझ्या मुद्रावृत्तीतील मूळ ग्रंथ पहिल्या मुद्रावृत्तीची प्रत फार खटाटोपाने मिळवून तिच्यावरून छापला आहे. या दुसऱ्या मुद्रावृत्तीवर ग्रंथकाराच्या नावाखाली 'सुपरिंटेंडंट, मिडलस्कूल' या मजकुराऐवजी 'सुपरिंटेंडंट, नीलसिटीस्कूल' असा मजकूर छापला आहे. हा बदल कोणी आणि कोणत्या अधिकारानुसार केला हे कळत नाही.

तिसरी आवृत्ती

शास्त्रीय मराठी व्याकरण : लेखक - प्रि. मोरो केशव दामले, एम्. ए. (सोबत व्याकरणविषयक निबंधांची पुरवणी : संपादक - प्रा. ग. वा. करंदीकर, एम्. ए.), प्रकाशक - दामोदर सावळाराम मंडळी, पुणे, १९६५ (आवृत्ती तिसरी). श्री. रा. ज. देशमुखांच्या संग्रही.

१४ x २१.५ सें., पृ. १४+४+२+१२+९८८+३+१४०+८.

दामोदर सावळाराम आणि मंडळीने या ग्रंथाची जी तिसरी आवृत्ती १९६५ साली प्रकाशित केली आहे तिचीही दुसऱ्या आवृत्तीसारखीच परवड आहे. ही मुद्रावृत्ती दुसऱ्या मुद्रावृत्तीवरून एकूण दहा मुद्रणालयांत मिळून छापली असून तिची पृष्ठे दुसऱ्या मुद्रावृत्तीतील पृष्ठांइतकीच म्हणजे ९८८ आहेत. अर्थात दुसऱ्या मुद्रावृत्तीत आहे तसा पृष्ठनिर्देशांचा घोटाळा याही मुद्रावृत्तीत आहे.काही पृष्ठांवरील मजकूर (जसे,२३९-४०) दुसऱ्या मुद्रावृत्तीतल्या त्या त्या पृष्ठावरील मजकुराहून आद्यंतांच्या दृष्टीने उणा-अधिक आहे; पण अशी पृष्ठे विरळा. नव्याही बऱ्याच चुका दिसतात; पण त्यांतल्या पुष्कळशा शेवटच्या आठ पृष्ठांच्या शुद्धिपत्रात दुरुस्त करून दाखवल्या आहेत. 'वाक्याचे आरंभी' या मूळ मजकुराच्या जागी 'वाक्याच्या आरंभी' अशासारखे बदल अनधिकाराने केले आहेत. पृ. ३१ वरील उकाराच्या जुन्या खुणेची उदाहरणे मुदलीच गाळली आहेत! अशी अक्षरे आजच्या टाइपात अखंड उपलब्ध नाहीत, हे खरे आहे. पण त्यावर

अनुक्रमणिका

उपाय या अक्षरांची अन्य मार्गांनी जुळणी करणे किंवा तशी ती हातांनी काढून त्यांचा ब्लॉक देणे हा आहे; मजकूरच गाळून टाकणे हा नाही. या मुद्रावृत्तीत मूळ मुद्रावृत्तीतले 'उपक्रम' हे लेखकाचे प्रास्ताविक छापले आहे, पण 'उपसंहार' हे गाळले आहे. 'प्रस्तावना' आणि 'अभिप्राय' यांनाही काट मिळाला आहे. हा निष्काळजीपणा नसेल, तर यातला हेतू सांगणे आवश्यक आहे. तसा तो सांगितलेला नाही. असे अनधिकृत बदल केल्याने ऐतिहासिक साधने नष्ट होतात, हे लक्षात घेतले पाहिजे. संपादकाला अधिकार मूळ लेखकाच्या अनवधानमूलक चुका आणि अपमुद्रिते एवढीच बदलण्याचा आहे; समजुतीच्या चुका किंवा अन्य गोष्टी बदलण्याचा नाही. शास्त्रीय विषयांवरील ग्रंथांच्या पुनर्मुद्रणात इतकी सारी अवधाने आपल्याकडे क्वचितच कोणी ठेवलेली दिसतात.

या मुद्रावृत्तीला आरंभी श्री. द. मो. दामले यांनी लिहिलेले बारा पृष्ठांचे 'मोरो केशव दामले, एम्. ए., यांचे अल्प चरित्र', आणि शेवटी प्रा. ग. वा. करंदीकर, एम्. ए. यांनी संपादिलेली १४० पृष्ठांची 'व्याकरणविषयक निबंधांची पुरवणी' जोडली आहे. या पुरवणीत एकूण ११ लेखकांकडून वेगवेगळ्या व्याकरणविषयांवर लिहवून घेतलेले १२ लेख किंवा निबंध समाविष्ट केले असून त्यांतला एक स्वत: संपादकांनी लिहिलेला आहे. या पुरवणीविषयी आपल्या 'मनोगता'त संपादक म्हणतात की, या 'व्याकरणग्रंथाच्या नव्या आवृत्तीला मराठी भाषेच्या नव्या गरजांप्रमाणे नव्या विचारांच्या पट्ट्या' जोडण्याची आवश्यकता आहे. कारण हा ग्रंथ वाचीत असताना 'काहीतरी अपुरे पडत चालले आहे याची जाणीव' होते; दामल्यांनी 'उदाहरणे म्हणून दिलेल्या वाक्यांचा जुनाटपणा स्वतंत्र भारतातील नव्या पिढीला चांगलाच' जाणवतो; दामल्यांनी 'त्यांच्या पूर्वकालीन वैयाकरणांवर जसा हल्ला चढविला आहे तशाच प्रकारे नव्या अभ्यासू विचारवंतांना प्रि. दामले यांच्या व्याकरणावर करावासा' वाटतो. या 'नव्या विचारांच्या पट्ट्या' संपादकांनी 'मुरलेल्या विचारवंतांकडून' न घेता - कारण 'प्रज्ञेची प्रगल्भता स्थलकालसापेक्ष नाही, ती व्यक्तिसापेक्ष आहे,'- 'महाराष्ट्रातील बहुतेक विद्यापीठांच्या कक्षेत येणाऱ्या महाविद्यालयांतून गेली कित्येक वर्षे मराठी भाषेचे व व्याकरणाचे अध्यापन करणारे माझे अनेक मित्र, व त्या मित्रांचे मित्र' यांपैकी 'ज्यांनी ज्यांनी...आपले विचार आत्मविश्वासाने सादर केले' त्यांच्याकडून घेतल्या; आणि त्या 'मराठीच्या व्याकरणाच्या क्षेत्रात नवे विचारप्रवाह निर्माण होऊ लागतील अशा दृष्टीनेच' घेतल्या.

या 'नव्या विचारप्रवाहां'ची दिशा दाखवताना त्यांनी 'मराठीचे सर्वच नियम आता तळापासून घासून पुसून साफ केले पाहिजेत' अशी साधारण सूचना करून 'विशेषत: लेखनशुद्धतेचे चौदा कलमी नियम रूढ झाल्यानंतर त्याला अनुसरून व्याकरणाच्या नियमांची काही ठिकाणी फिरवाफिरव करावी लागणार आहे' याकडे आणि 'व्याकरणाच्या ऐतिहासिक, तौलनिक, व्युत्पत्तीवर आधारित अशा भेदाबरोबरच नव्या भाषाशास्त्रीय दृष्टीकोनातून आजच्या मराठी भाषेचे स्वरूपदर्शन घडविणारे व्याकरण निर्माण झाले पाहिजे' याकडे लक्ष वेधले आहे. या 'मनोगता'तल्या प्राय: सर्वच गोष्टींत घोटाळा असून तो उलगडण्यासाठी व्याकरण म्हणजे काय, त्याचा भाषेशी आणि भाषाशास्त्राशी संबंध काय, व्याकरणाचा शुद्धलेखनाशी संबंध काय, इत्यादी मूलभूत गोष्टी समजणे आवश्यक आहे.या गोष्टींचे स्वरूप हा स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे. येथे एवढे सांगितले म्हणजे पुरे की, शास्त्रात 'नवे विचारप्रवाह निर्माण' व्हायला केव्हाच हरकत नाही, पण ते शास्त्रीयत्वाच्या कसोट्यांना उतरले पाहिजे; दामल्यांवर हल्ला चढवायलाही हरकत नाही, पण त्यासाठी त्यांच्याहून बलवत्तर असे प्रमाणबळ पाठीशी असले पाहिजे.

संपादकांनी प्रस्तुत मुद्रावृत्तीला ज्या बारा 'पट्ट्या' जोडल्या आहेत, त्यांच्या लेखकांचे व्याकरणातील समस्यांकडे पाहण्याचे दृष्टीकोन भिन्न भिन्न आहेत, त्यांमध्ये एकवाक्यात नाही, हे

निमित्तविशेषाने कळून येते; आणि तसे असण्यास हरकत नाही. प्रश्न एवढाच की, असे भिन्न भिन्न प्रकृतींचे आणि दर्ज्याचे लेख एका ग्रंथाची पुरवणी म्हणून एकत्र करण्याने या ग्रंथाच्या अभ्यासकाला लाभ काय होणार? एकंदरीने या ‘पट्ट्या’ व्रणविरोपणाऐवजी व्रणव्याकोपालाच कारणीभूत झाल्या आहेत.

संक्षेपावृत्ती

मोरो केशव दामले यांचे शास्त्रीय मराठी व्याकरण (उद्‌घाटन व ऊहापोह)

(संक्षिप्त) : संपादक-प्रा. भीमराव कुलकर्णी, जोशी लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता, पुणे ९, १९६६. १४ x २१ सें., पृ. २३+४४७.

‘(शास्त्रीय मराठी) व्याकरणाचा प्रचंड आकार, त्यातील सूक्ष्म व गुंतागुंतीचा ऊहापोह यांमुळे विद्यार्थ्यांची छाती दडपून जाते. ...तेव्हा हे व्याकरण अधिक उपयुक्त स्वरुपात संपादित करावे व त्याची किंमतही सर्वसामान्य वाचकांना परवडावी’, अशा उद्देशाने प्रस्तुत संक्षेपावृत्ती काढलेली आहे. या मुद्रावृत्तीत मूळ ग्रंथातले ‘उद्‌घाटन’ आणि ‘ऊहापोह’ हे दोन्ही प्रकारचे मजकूर संपादकीय कात्री लावून (असे करताना संपादकांनी कात्री प्रामुख्याने ऊहापोहाला लावली असून तसे करणे साहजिकही आहे.) सुमारे निम्म्या पृष्ठांइतके कमी केले आहेत. ही संक्षेपावृत्ती पहिल्या मुद्रावृत्तीवरून छापण्यात आली असल्याचे प्रस्तावनेत नमूद केले असून ही प्राय: शुद्धमुद्रित आणि नेटकी अशी आहे.ज्यांना फारसे खोलात जावयाचे नाही, त्यांची गरज या मुद्रावृत्तीने भागेल. आपल्या व्याकरणाची एक संक्षिप्त आवृत्ती काढण्याचा दामल्यांचा मानस होता; पण या संक्षेपावृत्तीत मूळ ग्रंथातला केवळ ‘उद्‌घाटन’ हा भाग आहे तसा सर्व समाविष्ट व्हावयाचा होता. एक गोष्ट मात्र सांगितली पाहिजे की, खुद्द दामल्यांची संकल्पित किंवा भीमरावांची सिद्ध संक्षेपावृत्ती ही दामल्यांचे व्याकरण राहत नाही; कारण दामल्यांच्या व्याकरणातला उद्‌घाटनाचा भाग बहुतांशी अन्य व्याकरणग्रंथांतून संकलित केलेला असून ऊहापोहच काय तो खास दामल्यांचा आहे.त्यामुळे उहापोहाला कात्री लावणे म्हणजे पर्यायाने दामल्यांच्या ग्रंथकर्तृत्वालाच कात्री लावणे होय. असे केल्याने व्याकरण मराठीचे मिळेल, दामल्यांनी रचलेले मिळणार नाही.

अनुक्रमणिका

३
व्याकरण

गुणगौरव

दामल्यांच्या शास्त्रीय व्याकरणाचा ज्यांच्यावर विशेष प्रभाव पडला आहे, अशा वैयाकरणांमध्ये 'हिंदी व्याकरणा'चे कर्ते स्व. पं. कामताप्रसाद गुरु यांचा प्रामुख्याने निर्देश करावयास हवा. पं. गुरु यांनी आपल्या ५८४ पृष्ठांच्या व्याकरणाची रूपरेखा दामल्यांचे व्याकरण पुढे ठेऊन आखली असून, हिंदीत परंपरेने रूढ असलेल्या पारिभाषिक संज्ञा, उदाहरणे आणि हिंदीच्या वैशिष्ट्यानुरोधाने करणे आवश्यक असे बदल सोडता दामल्यांच्याच पद्धतीने (पण फारसा 'ऊहापोह' न करता) विवेचन केले आहे. दामल्यांचे हे ऋण गुरूंनी आपल्या ग्रंथाच्या 'भूमिके'त पुढील शब्दांनी कृतज्ञतापूर्वक नमूद केले आहे :

"सबसे अधिक सहायता मुझे दामले-कृत 'शास्त्रीय मराठी व्याकरण' से मिली है जिनकी शैली पर मैंने अधिकांश में अपना व्याकरण लिखा है। पूर्वोक्त पुस्तक से मैंने हिंदी में घटीत होनेवाले व्याकरण-विषयक कई एक वर्गीकरण, विवेचन, नियम और न्यायसंमत लक्षण, आवश्यक परिवर्तन के साथ, लिये हैं। संस्कृत-व्याकरण के कुछ उदाहरण भी मैंने इस पुस्तक से संग्रह किये हैं। ...इन पुस्तकों के लेखकों के प्रति मैं, नम्रतापूर्वक, अपनी हार्दिक कृतज्ञता प्रकट करता हूँ।" ('हिंदी व्याकरण') १-२.

मराठी वैयाकरणांमध्ये 'मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरणप्रबन्धकार' या ग्रंथे आणि 'मराठी साहित्य व व्याकरण' इत्यादी व्याकरणविषयक शालेय पुस्तकांचे कर्ते श्री.मोरेश्वर सखाराम मोने यांच्यावर दामल्यांचा प्रभाव विशेष आहे; आणि हे साहजिकही आहे. दामल्यांचे शास्त्रीय व्याकरण छापले जात होते तेंव्हा त्याची प्रुफे मोने तपासत असत. या कामामुळे आपली व्याकरण विषयाची गोडी वृद्धिंगत झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दामल्यांचे एक विद्यार्थी आणि पुढे नागपूरच्या क्रॅडॉक हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. सदाशिव नारायण कुलकर्णी यांनी श्री. विनायक गोपाळ भावे यांच्या सहकार्याने आपली शालेय पातळीवरची मराठी व्याकरणाची पुस्तके लिहिताना दामल्यांचेच व्याकरण प्रमाणग्रंथ म्हणून पुढे ठेवले असल्याचे नमूद केले आहे. दमल्यांनंतरच्या अन्यही वैयाकरणांना त्यांचा ग्रंथ प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने साहाय्यकारक ठरला आहे. पाश्चात्त्य लेखकांच्या मराठी-व्याकरणविषयक लेखांतून कोठे कोठे मराठीच्या माहितीसाठी दामल्यांच्याच व्याकरणाचा प्रामुख्याने आधार घेतलेला दृष्टीस पडतो. जसे :THE MARATHI 'COMPOUND VERB' By I.M.P. RAESIDE (SIR RALPH TURNER JUBILEE VOLUME, INDIAN LINGUISTICS; 1958, Pp. 237). दामल्यांच्या प्रभावाचे एक वेगळ्या प्रकारचे गमक सबनिसांच्या व्याकरणात पहावयास मिलते आपल्याला अभिप्रेत असलेली मराठी व्याकरणाची फेरमांडणी करीत असताना सबनिसांनी 'प्रधानमल्लनिबर्हणन्याया'चा हवाला देत दमल्यांनाच मुख्य प्रतिस्पर्ध्याच्या स्थानी कल्पिले आहे.

दामल्यांची व्याकरणविषयक मते ज्यांना मान्य नाहीत त्यांनीही त्यांच्या व्याकरणातील अन्य गुणांबद्दल त्यांना धन्यवाद दिले आहेत. असा एक गुण म्हणजे दामल्यांची विषयपृथक्करणाची हातोटी आणि दुसरा, त्यांनी मराठी व्याकरणपरंपरेतील पूर्वसुरींच्या मतांचा घेतलेला चिकित्सापूर्ण आढावा. यांपैकी पहिल्या गुणाची पावती 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'ने अप्रत्यक्षपणे आणि मोघम शब्दांत दिली आहे : 'केवळ तार्किक दृष्ट्या शब्दांची परस्परसंगती पाहणारा आणि मराठी व्याकरणाचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणारा लेखक म्हटला म्हणजे मोरोपंत दामले हा होय.' (प्रस्तावना खंड, विभाग पाचवा, २१५.) दामल्यांचा ग्रंथ

'व्याकरणशास्त्र' या नावाला सर्वथा नालायक ठरवणारे राजवाडेही एका ठिकाणी म्हणतात : 'उदाहरणाचे पृथक्करण दामले इतके नामी करतात की, सत्याच्या जवळजवळ येऊन ते सदा ठेपतात. ते जर व्युत्पत्तीची मदत घेते, तर साक्षात सत्यच त्यांच्या हातून नमूद झाले असते.' शिवाय असेही म्हणतात : 'साधकबाधक प्रमाणे पाहून निर्णय करण्याची हातोटी दामल्यांना बरीच चांगली अवगत आहे. आणि ह्या एका गुणाच्या जोरावर त्यांनी मराठी भाषेचे व्याकरण लिहिण्यास कंबर बांधिली आहे.' अन्यत्र ते म्हणतात : 'ही संशोधनात्मक टीका करताना दामल्यांच्या व्याकरणाचा मला फार उपयोग झाला. संशयस्थले व अनिश्चित स्थले व बिकट जागा मराठी व्याकरणात कोणत्या आहेत व तत्संबंधाने पूर्ववैयाकरण काय म्हणतात व दामल्यांचे स्वत:चे काय म्हणणे आहे, ते एका ठिकाणी आयते संग्रहित केलेले मला सापडले व ते पद्धतशीर रीतीने मंडिलेले सापडले.एतदर्थ दामल्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.'

दामल्यांच्या या योग्यतेची जाणीव असल्यामुळेच राजवाड्यांनी 'सुबंतविचार'च्या अंती दामल्यांना आपल्या उणिवांची भरपाई करून पुन: एकदा व्याकरण लिहिण्याची सूचना केली आहे : 'तात्पर्य, विद्यमान मराठी भाषेचे व्याकरण शास्त्रीय पद्धतीने लिहिण्याचा दामल्यांचा प्रयत्न राष्ट्राच्या प्रगतीस अत्यंत पोषक आहे. इतकेच की हा प्रयत्न अनेक दोषांनी अथपासून इतीपर्यंत ग्रस्त आहे. सबब प्रो. दामल्यांनी मराठी व्याकरणशास्त्र रचण्याकडे आपली कुशाग्र व व्यापक बुद्धी पुन: एकवार लावावी.' सबनीसही लिहितात : 'गुंजीकरांच्या विधायक साहाय्यापेक्षा किती तरी अधिक प्रमाणात दामल्यांचे विरोधी कार्य आम्हांस उपकारक झाले आहे ही गोष्ट अत्यंत कृतज्ञतापूर्वक येथे नमूद करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. ...दादोबा, गोडबोले, जोशी, खेर इत्यादिकांची मते आम्हाला दामल्यांच्या व्याकरणाच्या द्वारेच कळली. त्यांनी परस्परच यांपैकी चुकीच्या मतांचा निरास केला होता...'

शास्त्राची जाण

दामल्यांच्या व्याकरणातील या गुणांचा काहीसा तपशिलाने परामर्श करणे उपयुक्त होईल. राजवाड्यांच्या म्हणण्याप्रमाणे दामले 'उदाहरणाचे प्रथक्करण नामी' करू शकले, याचे कारण त्यांच्या शास्त्राभ्यासात, विशेषत: न्यायशास्त्राच्या अभ्यासात, शोधावे लागेल. एम. ए. परीक्षेसाठी दामल्यांनी तत्त्वज्ञान हा विषय घेतला होता; आणि उज्जयिनीच्या माधव कॉलेजमध्येही त्यांची नेमणूक 'प्रोफेसर ऑफ लॉजिक अँड मॉरल फिलॉसफी' म्हणूनच झाली होती. या कारणाने सुरू झालेला तर्कशास्त्राचा - म्हणजे 'शास्त्रांच्या शास्त्रा'चा - अभ्यास त्यांनी पुढे पाश्चात्त्य तर्कपद्धतीवर दोन ग्रंथ लिहून दृढ केला. या अभ्यासाचा मराठीच्या अभ्यासाकडे विनियोग त्यांनी प्रथम १९०५ मध्ये शुद्धलेखनावर सविस्तार लेख लिहून केला. शास्त्रीय व्याकरणात त्यांनी सर्वत्र जो प्रमाण-प्रमेयनिर्देशपूर्वक ऊहापोह केला आहे त्यामागे ही सर्व तपस्या उभी आहे. या तपस्येतून त्यांना शास्त्राची कार्यपद्धती आणि मर्यादा यांची जाण आलेली आहे; त्यांचा त्यांनी आपल्या व्याकरणात वारंवार उच्चारही केला आहे. 'शास्त्रांचे साधारण स्वरूप' काय असते हे त्यांनी मुद्दाम विवेचिले आहे. शास्त्राचा व्यवहार लक्षणमुखाने चालतो, शास्त्रीय लक्षणांत लक्ष्य पद गुंतलेले असता कामा नये, त्यात लक्ष्य पदार्थाची जात आणि असाधारण धर्म यावे लागतात, अर्थात जो पदार्थ एकच आहे तो लक्षणक्षम असत नाही, लक्षण अव्याप्त्यादी दोषांपासून मुक्त असावे लागते, शास्त्रात अपुरी विधाने क्षम्य नाहीत, शास्त्रीय ग्रंथात वापरल्या जाणाऱ्या भाषेकडे कधीच दुर्लक्ष करिता कामा नये; भेदोपभेदांना एकच पंक्तीत बसवणे, अपवादांस नियमांचे बंधन घालणे, बहुमताने निर्णय करणे इत्यादी गोष्टी अशास्त्र आहेत; सत्याला (आणि परंपरेने शास्त्राला) कोणाचीही भीडमर्यादा नसते; याप्रमाणे त्यांनी आपल्या व्याकरणात जागोजागी शास्त्राला कौल लावला आहे. त्यांचा हा शास्त्रपक्षपात त्यांनी आपल्या ग्रंथाला दिलेल्या नावामागील 'शास्त्रीय' या शब्दातही व्यक्त होतो; आणि त्यातून अप्रत्यक्षपणे इतरांच्या व्याकरणांची

अनुक्रमणिका

अशास्त्रीयता सूचित करण्याचा त्यांचा हेतूही जाणवतो. ज्ञानदेवांच्या 'भावार्थदीपिके'बद्दल नापसंती व्यक्त करण्यासाठी वामन पंडिताने आपल्या गीताव्याख्येला 'यथार्थदीपिका' हे नाव दिले म्हणतात; तसाच हा प्रकार आहे. या 'शास्त्रीय' नावाला जागण्यासाठी दामल्यांनी न्यायशास्त्राचा 'धारवाडी काटा' सदैव जवळ बाळगला आहे; आणि त्याच्या साक्षीने पूर्वसुरींना अपुऱ्या सामग्रीच्या आधाराने निष्कर्ष - 'अवलोकनात्मक विगमन'- काढल्याबद्दल आणि 'न्यायशास्त्राचा खून' केल्याबद्दल ठपकाही दिला आहे.

व्याकरणाची जाण

या शास्त्रविषयक पक्षपाताला प्रायः अनुरूप अशीच भूमिका त्यांनी व्याकरण आणि वैयाकरण यांच्या बाबतीत स्वीकारलेली आहे. व्याकरणाचा मूलाधार आणि परम प्रमाण शिष्टप्रयोगात्मक भाषा हीच होय : 'प्रयोगशरणाः वैयाकारणाः'. शिष्टसंप्रदायात असलेल्या प्रयोगांवर ग्राह्याग्राह्यतेचा छाप मारण्याचा अधिकार वैयाकारणाला नाही; हा 'धंदा' वैयाकरणाच्या कर्तव्याचे मर्यादेबाहेरचा आहे. 'तो अधिकार बळेच बळकावून गाजवू लागल्यामुळे तुमचेच हसे होत आहे', असे ते वैयाकरणांना बजावतात. वैयाकरणांचे काम इतकेच की, शिष्टप्रचाराची नोंद करून स्वस्थ बसावयाचे; फार तर इतके सांगावे की, अमुक रूपाचा प्रचार शिष्ट भाषेत कमी किंवा जास्त आहे. वैयाकरणाच्या या कर्तव्याचे उल्लंघन करून शिष्टप्रयोगांतील रूपांविषयी शुद्धाशुद्धतेची चर्चा करणाऱ्या दादोबादिकांना त्यांनी अनेक स्थळी बोल लावला आहे; आणि त्यांच्या मताविरुद्ध 'मी अंघोळ केली', 'तू मला लेखणी दिलीस' इत्यादी संकर प्रयोगांना मान्यता देऊन त्यांपैकी काहींना संस्कृत प्रयोगांचा ('त्वं में लेखनी दत्तवान्') आधारही शोधून दिला आहे. याउलट याच शिष्ट प्रयोगाला कौल लावून 'असत असतो' हे 'व्याकरणग्रंथांशिवाय इतर कोठेही' न आढळणारे 'वैयाकरणप्रणीत' रूप अमान्य केले आहे. व्याकरणाच्या कार्यकक्षेविषयी दामल्यांनी आपली कल्पना एकदोन ठिकाणी स्पष्टपणे नमूद केली आहे. एखाद्या भाषेचे ऐतिहासिक व्याकरण आणि प्रचलित भाषेचे व्याकरण यांच्या कक्षा भिन्न असल्याचे ते निदर्शनास आणतात;आणि सांगतात की, 'एका भाषेचा अन्य भाषांशी जो संबंध असतो तो व्याकरणाचा विषय होऊ शकत नाही. तर व्याकरणाची दृष्टी फक्त त्या एकच भाषेपुरती मर्यादित असते.' मग 'अन्य भाषांशी संबंध' हा विषय कोणाचा? 'अन्य भाषांतून आपल्या भाषेत शब्द कसे येतात, हे सांगणे कोशाचे काम आहे; व्याकरणाचे नाही.' म्हणजे भाषेच्या ऐतहासिक आणि तुलनात्मक अध्ययनापेक्षा वर्णनात्मक अध्ययन वेगळे आहे, याची जाणीव दामल्यांना आहे. आणि दामल्यांना ह्याचीही जाणीव आहे की, व्याकरणातील विविध उपपत्ती 'हा प्रश्न सत्यासत्याचा नसून केवळ बऱ्यावाईट व्यवस्थेचा आहे.' व्याकरणातली उत्तम व्यवस्था ती, की जिच्यात बहुसंख्य प्रयोगांची सुखाने संगती लागते.

मराठी व्याकरणाची जाण

या व्याकरणादर्शाच्या दृष्टीने पाहता मराठीचे व्याकरण 'हे अद्याप बनत असलेले शास्त्र' आहे, असा त्यांचा अभिप्राय आहे. याचे एक कारण मराठी भाषेची अस्थिरता हे होय : 'जोपर्यंत भाषेस स्थैर्य आले नाही तोपर्यंत व्याकरण संदिग्धच राहणार', असे याविषयी दामल्यांचे निदान आहे. हे दामल्यांनी 'कालदेशवर्तमानानुसार' भिन्न होणाऱ्या रूपांना अनुलक्षून म्हटले आहे. आणि त्याची प्राप्ती मर्यादित आहे. मुख्य कारण 'आमच्या वैयाकरणांनी घालून दिलेल्या व आजपर्यंत अंधपणे चालत आलेल्या चुका' हे असून या चुका आपण आपल्या 'ग्रंथात अनेक प्रसंगी सविस्तर दाखवून त्यांचा निषेध केला आहे,' इकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. या चुकांचे दिग्दर्शन वर दामल्यांची शास्त्रविषयक आणि व्याकरणविषयक भूमिका सांगताना केले आहे. त्यात न निर्देशिलेली एक चूक म्हणजे पूर्ववैयाकरणांनी अवलंबिलेली 'सदोष परिभाषा'. हिच्यामुळे विभक्तीप्रकरणात 'आमच्या वैयाकरणांनी' गोंधळ माजविला आहे, असे दामले सांगतात. ही परिभाषा सुधारण्याच्या दामल्यांच्या प्रयत्नाचा मुख्य भाग म्हणजे त्यांनी सर्व कालार्थ प्रत्ययांना

साधारण म्हणून योजिलेली ‘आख्यात’ ही (पुनरुज्जीवित,- कारण ही मराठीत प्रथम कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधांत योजलेली आढळते.) संज्ञा आणि आख्यात प्रत्ययांच्या गटांना पाणिनीय संज्ञांच्या नमुन्यावर दिलेल्या ‘ताख्यात, लाख्यात’ इत्यादी सांकेतिक संज्ञा. या आपण सुचवलेल्या संज्ञांचे ‘योग्य चीज होवो’ अशी आशा प्रदर्शित करून त्यांविषयी आपणांस वाटणारा उचित अभिमान त्यांनी सूचित केला आहे. दामल्यांनी प्रसंगविशेषाने आणखीही काही नव्या संज्ञा योजल्या आहेत. त्या अशा : ‘परवर्ण/पर, स्वरादि, स्वरांत,बिंदु, अनुसंबंधी, पूर्वनाम, क्रियापदेश/धातुरूपेश, पूर्ववाक्य/पूर्व, उत्तरवाक्य/उत्तर, अनुद्धृत, उद्धृत, संक्रांत विशेषण, प्रधानकर्तृक कर्मणि’ इत्यादी. यांपैकी ‘अनुद्धृत, उद्धृत’ या संज्ञा संस्कृत न्यायशास्त्रग्रंथांत रूढ आहेत; पण त्या मराठी व्याकरणाच्या संदर्भात दामल्यांनी योजल्या आहेत.

दामल्यांची अशास्त्रीयता

दामल्यांनी याप्रमाणे ग्रंथात ठिकठिकाणी शास्त्रीय पद्धतीची जाण दाखवली असली, आणि पूर्ववैयाकरणांना अशास्त्रीय प्रतिपादनाबद्दल दोष दिला असला, तरी स्वत:सुद्धा प्रारंभापासून अखेरपर्यंत अगणित ठिकाणी कळत न कळत अशास्त्रीयतेचाच मार्ग चोखाळला आहे. ‘शास्त्रीय’ व्याकरण रचण्याची प्रतिज्ञा करणारे दामले जेव्हा ‘शास्त्राद्रुढिर्बलीयसी’ असे जाहीर करीत म्हणू लागलात की ‘शास्त्र जरी झाले तरी त्यास रूढीस सर्वस्वी धाब्यावर बसविता येत नाही’, एवढेच नव्हे, तर क्वचित शास्त्रीय फरक ‘महत्त्वाचा नाही’ असे सांगतात, एखादा नियम ‘त्रासदायक’ असल्याच्या सबबीवर बाजूला सारतात आणि ‘सोयी साठी साधारण नियम’ बांधू लागतात, ‘सूक्ष्मता बाजूस ठेवून...स्थूल दृष्टीच स्वीकारणे प्रशस्त’ ठरवू लागतात, व्याकरण आणि न्यायशास्त्र यांमध्ये ‘तडजोड’ करू लागतात, व्याकरणासाठी न्यायशास्त्राकडून ‘सवलत’ घेऊ लागतात, स्वरूपदृष्ट्या निघणारा निष्कर्ष बाजूला सारून ‘अर्थदृष्ट्या’ निघणारा निष्कर्ष जवळ करतात, व्याकरणाला मार्गदर्शकत्वाचाही अधिकार देऊ लागतात, वैयाकरणांचे शिष्टप्रचाराविषयीचे शुद्धाशुद्ध, प्रशस्ताप्रशस्त या स्वरूपाचे शेरे अस्थानी नाहीत असे म्हणू लागतात आणि स्वत:ही तसे शेरे देऊ लागतात, एखादा प्रयोग रूढ असूनही तो करण्याची ‘जरूर नसल्या’चे सांगतात, शास्त्रीय मुद्द्याचा निर्णय बहुमतानुसार करण्याची पद्धती स्वतःला मान्य नसल्याचे सांगूनही पुढे हा निर्णय बहुमतानुसार करण्याचा घाट घालतात, शास्त्रातला घोटाळा दूर करण्यासाठी ‘पाचामुखी’ असलेल्या परमेश्वराला शरण जातात, एखादी संज्ञा कोणाला ‘आवडत नसल्यास’ दुसरी संज्ञा उपयोजिण्यास अनुज्ञा देतात, विशिष्ट नियम आणि अपवाद ‘अप्रयोजक’ असल्याचे जाणत असूनही ‘वैयाकरणाचे चालीस अनुसरून’ नमूद करतात - हे आणि असले प्रकार जेव्हा दामले करू लागतात - तेव्हा वाटते की, आपल्याच प्रतिपादनावर आपणच बोळा फिरवणारे दामले एक तर विसराळू असले पाहिजेत, नाही तर हे प्रकार चालवून घेणारे त्यांचे ‘शास्त्र’ तरी मुलखावेगळे असले पाहिजे!

शास्त्रांत तडजोड

दामल्यांनी आपल्या ग्रंथाच्या एका सबंध भागात अशास्त्रीयता शिरोधार्य मानली असेल, तर ती ‘वाक्यपृथक्करण’ या भागात. आंग्ल व्याकरणाकडून आगरकरांच्या द्वारे मराठी व्याकरणाला हा ‘अलंकार’ भेटीदाखल मिळाल्याबद्दल दामल्यांनी समाधान व्यक्त केले आहे, आणि तो बसता करण्यासाठी मराठी व्याकरणाला ‘नवीन वळण’ लावण्याची आवश्यकता प्रतिपादून ते आजवर समाधानकारकपणे लावले न गेल्याचे निदर्शनास आणले आहे. पुढे या विषयाची रुजवात करून देताना दामल्यांनी आपली शास्त्रविषयक कडवी मते गुंडाळून ठेऊन व्याकरणाच्या बाजूने न्यायशास्त्राशी खुशाल तडजोडीची बोलणी सुरू केली आहेत; आणि या दोन्ही शास्त्रांची थोडथोडी छाटाछाट करून एकदाचे वाक्यपृथक्करण व्याकरणात बसते केले आहे. यामुळे दामल्यांना काय समाधान मिळाले असेल ते असो; प्रत्यक्षात त्यांच्या प्रतिपादनावर दोन

अनुक्रमणिका

पादशाह्यांचा अंमल सुरू होऊन शास्त्रीयतेवर परागंदा होण्याचा प्रसंग आला. आता दामल्यांना पदोपदी व्याकरण आणि वाक्यमीमांसा या दोघांचाही सल्ला घ्यावा लागू लागला; आणि हे सल्ले परस्परविरुद्ध येऊ लागल्यावर सर्वत्र तडजोड अशक्य झाल्याने त्यांना दोनदोन निर्णय देणे भाग पडू लागले. 'वाक्यमीमांसेचे दृष्टीने...केवळ व्याकरणाचे दृष्टीने...' अशी जागोजाग दुपदरी विधाने करावी लागू लागली. जेथे तडजोड केली तेथेही विसंगतीच नांदवून घ्यावी लागली, एका कर्मणीच्याच नमुन्यात कोठे कर्ता, तर कोठे कर्म उद्देश्य मानावे लागले; आणि न्यायशास्त्राच्या दृष्टीने कोणत्याही प्रयोगातील कोणतेही पद उद्देश्य होऊ शकत असताना अमक्या प्रयोगात अमकेच पद उद्देश्य, असे 'रेशनिंग' करावे लागले.

इतका खटाटोप करून व्याकरणाला लाभ काय झाला? मुळात असल्या पृथक्करणाचा व्याकरणाशी संबंधच काय? आणि संबंध नसतानाही त्याला व्याकरणात स्थान मिळणार असेल, तर छंद:शास्त्रातल्या लगक्रमाच्या दृष्टीने वाक्याचे पृथक्करण करण्यास तरी व्याकरणात काय हरकत? याप्रमाणे 'वाक्यमीमांसेच्या दृष्टी'ने व्याकरणात घातलेला धुमाकूळ पुरेसा न वाटल्यामुळेच की काय, दामल्यांनी 'अर्थदृष्टी' नावाच्या तिसऱ्या एका पादशाहीला व्याकरणात पाचारण केले आहे : 'अर्थदृष्टी व शब्ददृष्टी या दोन भिन्न आहेत.' 'त्याने काम केले' हा प्रयोग जरी 'बाह्यत: (म्हणजे बहुधा व्याकरणदृष्टीने) दिसण्यात कर्मणी (म्हणजे कर्मप्रधान) आहे, तरी अर्थदृष्ट्या त्यातील कर्मास प्राधान्य नसून कर्त्यासच प्राधान्य आहे', असे दामले म्हणतात, आणि तदनुसार त्याला 'प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग' असे नाव देतात; तो 'वेशधारी कर्मणी' पण 'वास्तविक कर्तरिप्रयोगच होय' असे सांगतात, आणि हे 'जोशीबोवांचे लक्षात न आल्याने' त्यांना दोषही देतात. पुढे पुढे त्यांना या प्रयोगात व्याकरणदृष्ट्याही कर्ताच प्रधान वाटू लागतो. हा अर्थदृष्टीचा चिंतामणी त्यांना कोठे कोठे 'भाषादृष्ट्या' काढलेल्या निष्कर्षाच्या दृढीकरणालाही उपयोगी पडतो.

अशास्त्रीय तपशील

हे सर्व शास्त्रीय मुद्द्यांविषयी दामल्यांनी घेतलेल्या भूमिकेसंबंधी झाले. यापुढे तपशिलात गेल्यास किती तरी अशास्त्रीय गोष्टी दामल्यांच्या व्याकरणात भेटतात : 'कोणत्याही भाषेतील शब्दांच्या जाती आठच असल्या पाहिजेत...हा सिद्धांत विश्वव्यापी असून तो अनपवादक आहे.' काय हे धाष्टर्य? स्वत:ला येणाऱ्या तीनचार भाषांच्या अवलोकनाने असला निष्कर्ष काढणारे दामले पूर्ववैयाकरणांना 'हे फक्त आपल्यासमोर असलेल्या उदाहरणांवरून अवलोकनात्मक विगमने बांधतात,' असे दूषण कसे काय देतात, कळत नाही. 'रामा आणि कृष्णा गेले,' याला दामले दोन वाक्ये मानतात, कारण त्यांच्या मते उभयान्वयी अव्यय 'एक वाक्याची दुसऱ्या वाक्याशी सांगड घालिते.' 'घातक/घातुक, ढाळक, रेचक, जाचक' इत्यादी कृदंतांना त्यांनी नि:शंकपणे उपपदतत्पुरुष सामासांमध्ये लोटले आहे. समाहारद्वंद समासात त्यांच्या मते 'त्यातील पदांच्या अर्थाशिवाय आणखी तशाच प्रकारच्या अर्थाचा अंतर्भाव होतो', पण हा 'सामाहाराचा'चा त्यांनी मानलेला निराधार अर्थ समाहारद्विगू समासात कसा यावयाचा राहतो, हे सांगावयास ते विसरले आहेत. 'एकशेष' नावाचा द्वंदप्रकार संस्कृतात असल्याची, आणि तो मराठीत मानण्याचे प्रयोजन नसल्याची माहिती त्यांनी दिली आहे. यावरून त्यांना 'एकशेष' आणि संस्कृत या दोन्हींविषयी पुरेशी माहिती नसल्याचे उघड होते. सहबहुव्रीही समासात त्यांनी 'सकर्मक, सहपरिवार' इत्यादी उदाहरणांच्या पंक्तीला 'सोदर,सवर्ण, सरूप' याही सामासांना बसवले आहे. समासाची जात त्याच्या वाक्यातील कार्यावरून ठरवण्याचे नवेच तत्त्व त्यांनी शोधून काढले आहे; आणि तदनुसार 'दक्षिणोत्तर' इत्यादी बहुव्रीही समास आणि 'घरघर,रानरान' इत्यादी अभ्यास्त शब्द यांना त्यांचा 'क्रियाविशेषणाप्रमाणे उपयोग' होत असेल, तेव्हा 'अव्ययीभाव समास' म्हणावयास सांगितले आहे. 'एकसारखे' हा वाटल्यास कर्मधारय म्हणा, वाटल्यास अव्ययीभाव म्हणा, अशी सवलत त्यांनी दिली आहे. त्यांच्या 'समापनकर्मणी'ला 'त्याचे पत्र लिहून झाले' हा

प्रयोग चालतो; पण 'रामाचे...पुस्तक देऊन झाले' हा प्रयोग चालत नाही. प्रयोगविचारात दामल्यांनी फारच गोंधळ घातला आहे. कर्तरी, कर्मणी, भावी या संज्ञांचा अभिप्राय अनुक्रमे कर्तृप्रधान, कर्मप्रधान आणि भावप्रधान असा असल्याचे त्यांना मान्य आहे; पण तरी त्यांनी 'अर्थदृष्टि' नामक तत्त्वाच्या आधाराने कर्मणीचे आणि भावीचे 'प्रधानकर्तृक' आणि 'गौणकर्तृक' असे भेद सांगितले आहेत; आणि त्यांतही फक्त काहीच 'खरे' (अर्थात काही खोटे) असल्याची माहिती दिली आहे. अव्ययांना पूर्वी 'अविकारी शब्द' म्हटले असतानाही दामले पुढे असे सांगतात की, आकारांत शब्दयोगी अव्यये 'विशेष्यनिघ्न आहेत; अर्थात ती पुढे येणाऱ्या नामांच्या म्हणजे विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणे बदलतात.' 'हसू,रडू' अशा काही कृदन्त अव्ययांना नामांचा दर्जा देऊनही ते सांगतात : 'तथापि त्यांस विभक्तिप्रत्यय लागत नाहीत; म्हणजे फक्त प्रथमेमध्येच त्यांचा उपयोग होतो.' याउलट त-कृदंत अव्ययाला त्यांनी 'कालाधिकरणदर्शक सप्तमी'चा 'आ' हा प्रत्यय लावून 'देता,घेता' इत्यादी ता-कृदन्ते साधली आहेत. 'व्यधिकरण' या संज्ञेचा अर्थ 'मर्यादित अर्थाचा' असा दामले देतात. 'उपसर्गघटित साधितशब्दां'च्या याद्यांत त्यांनी 'अतिप्रसंग, अनुरूप, आब्रह्म, अपादमस्तक, निश्तुष, पराकाष्टा, अन्याय, कुलक्षण, दिवानिशि, पश्चात्ताप, स्वर्णदी' इत्यादी समास, तसेच 'उत्सुक, अद्भुत, नक्षत्र' इत्यादी अनिश्चित किंवा संदिग्ध व्युत्पत्तीचे शब्द दिले आहेत; आणि 'प्रत्ययघटित साधितशब्दां'च्या याद्यांत मोल्स्वर्थच्या साक्षीने 'स्वाधीन', 'दानाध्यक्ष', 'गुणानुरूप' इत्यादी समास दिले आहेत.

दामल्यांची शैथिल्ये

अशा विसंगती, प्रमाद, शैथिल्ये ही दामल्यांचे बारीकसारीक शब्दप्रयोग, विधाने इत्यादींतही जाणवतात. 'दोन्ही'मधल्या 'ही'ला दामले शब्दप्रयोग न म्हणता चक्क 'अक्षर' म्हणतात, 'प्रत्यय' म्हणतात; 'पैकाच पैका' मधला 'च' हा 'आगम' आहे; 'मला गुजराथी... येते' यातला कर्ता 'मला', 'मी' नव्हे; कर्मे धातूंना नसतात, क्रियापदांना असतात; 'पदक्रमे' हा अध्याय, अध्यायविषय नव्हे. कारणदर्शक-कारणद्योतक, परिणामबोधक-परिणामद्योतक इत्यादी प्रकारे पारिभाषिक संज्ञा लहरीनुसार मुखवटे बदलतात. 'भाषणविषयक' म्हणजे भाषणविषयभूत. 'अकर्मक धातूंचा लाख्याती आणि वाख्याती कर्तरी प्रयोगच होतो', याच्या पुढच्याच ओळीत सांगितले आहे : 'वाख्यातात अकर्मक धातूंपासून भावे प्रयोगही होतो.' आणखी एका ठिकाणी 'फक्त विधेयविस्तारक ह्याच स्थानी क्रियाविशेषण व क्रियाविशेषणवाक्ये येऊ शकतात', हे सांगून झाल्यावर दोनच ओळींनंतर म्हटले आहे : 'ही जेव्हा कृदन्तांशी किंवा विशेषणांशी संबद्ध असतात, त्याच वेळी ती विधेयविस्तारकाशिवाय इतर सदरांत...प्रवेश करितात.' असाच प्रकार त्यांनी प्रथम-ताख्याताच्या विवेचनात एका ठिकाणी केला आहे. 'जोशीबोवांची ही व्याकरणपद्धती जरी चुकीची नसली, तरी कशी चमत्कारिक आहे' हे दाखवून झाल्यावर उपसंहारात ती 'सर्वथैव त्याज्य' असल्याचे नि:शंक पणे सांगितले आहे. दुसरीकडे 'आमच्या मते' अशा उपक्रमाने मांडलेली उपपट्टी 'हे निर्विवाद आहे' असे म्हणून संपवली आहे. अशा एकमेकांना छेद देणाऱ्या विधानांना संस्कृतात 'व्याघात' म्हणतात. पण यात दामल्यांना काही खटकत नाही. 'रा. फणसळकर यांनी आपल्या अस्खलित भाषणास सुरुवात केली', हे एक उदाहरणवाक्य आहे. सुरवातीलाच भाषण अस्खलित कसे ठरते कोण जाणे! 'अ+ईल ह्यांचा पररूपसंधी सर्वत्र आढळतो; परंतु काही ठिकाणी नियमाप्रमाणे ए असाही संधी...' असे म्हणण्यात आपण सर्वत्र आढळणाऱ्या पररूपसंधीला नियमबाह्य ठरवीत आहोत, हे दामल्यांच्या गावीही नसावे.

वाक्यदोष आणि भरताड वाक्ये

विषयाचे सोडून द्या, सध्या वाक्यरचनेतही दामल्यांनी नाना तऱ्हा केल्या आहेत. त्यांच्या लेखनात 'कोणकोणत्या स्वरान्त (=कोणकोणते स्वर अंती असलेली) नामे आहेत', 'एकाच प्रत्ययान्त रूपे' असे सापेक्ष समास येतात; 'केवळ वर्तमान किंवा भूतकाळाचा (=भूतकाळ याचा) अर्थ' असे उभयान्वयी अव्ययाच्या व्यधिकरण संबंधाचे प्रयोग येतात; 'पोराची अक्कलही (=पोराचीही अक्कल) पुरे', 'एक अवयव होऊनच (=अवयवच होऊन) बसल्यामुळे', 'त्यांचे व्याख्यातही (=त्यांचेही व्याख्यात)', 'या वाक्यात... विधान केलेलेच (=विधानच केलेले) नाही', यांतल्यासारखा शब्दयोगी अव्ययांचा भलत्याच पदाशी अन्वय होतो; 'तेथे जाण्याची (=जाण्यात) आता आपली काही एक शोभा राहिली नाही', '(विशेषणे) काळास लागण्यात आली (=लागली)', 'त्याला फुरसत होऊन तो इकडे येईल तो फार उशीर आहे (?)', असे अश्रुतपूर्व प्रयोग भेटतात; 'मराठीमध्ये आहे यात दादोबा म्हणतात त्याप्रमाणे असधातु मानिता येत नाही', 'त्यांचे (=घंघाळ, हिंवाळा इत्यादीचे) सामासिकत्व केवळ संस्कृतानभिज्ञ मनुष्यास पटावयाचे नाही,' 'तिने चार दिवस जाग्यावरून न हालता अन्नग्रहणही केले नाही' अशी संदेहाला किंवा विपरीतग्रहाला कारणीभूत होणारी वाक्ये वावरतात. 'खेरांची अक्षम्य नजरचूक सर्वथैव त्याज्य' ठरवताना दामल्यांचा अभिप्राय 'नजरचुकीने दिलेली उदाहरणे' असा असतो. 'हे निर्विवाद आहे, उघड आहे, साहजिक आहे, स्पष्ट आहे, हे तेव्हाच कळून येईल, हे तेव्हाच समजण्यासारखे आहे, हे कोणीही कबूल करील, असे म्हणण्यास हरकत नाही, असे म्हटले तरी चालेल, हे विसरता कामा नये, हे वाचक विसरले नसतीलच, तेव्हा आता पुढे चलू', असली निरर्थक भरताड वाक्ये तर पानोपानी भरली आहेत. ती गाळल्यास दामल्यांच्या व्याकरणातली २५-३० तरी पृष्ठे सहज कमी होतील! गमतीची गोष्ट ही की, चार चार, आठ आठ पाने एखाद्या मुद्द्यावर वाद घातल्यावर दामले 'ही गोष्ट निर्विवाद आहे' असा त्याचा उपसंहार करतात! यावरून ते 'निर्विवाद' हा शब्द 'वादातीत' अशा रूढ अर्थी न योजता 'विवादातून निष्पन्न' अशा खास अर्थी योजीत असावे, असा संशय येतो. किंवा दामले मतांतर म्हणून सांगतात तसले हे 'एक वाक्यात्मक केवलप्रयोगी अव्यय' असावे.

अशा भरताड वाक्यांचा जो आणखी एक दामल्यांच्या मर्जीतला गट आहे, तो 'तज्ज्ञ, सुज्ञ, समंजस, विचारी,चाणाक्ष' अशा वाचकांना उद्देशून येतो; आणि त्यात दामले आपल्या वाचकांना सतत प्रच्छन्न धमकीही देत असल्यासारखे वाटतात. 'हे तज्ज्ञांस स्मरेलच, हे सुज्ञ वाचणारांचे लक्षात येईल, हे विचारी मनुष्य कबूल करील, असे करण्यास समंजस मनुष्य डोळे उघडे ठेऊन धजेल असे वाटत नाही', अशा वाक्यांच्या तैनाती फौजा त्यांनी 'शास्त्रीय व्याकरणा'त जागोजाग सज्ज ठेवल्या आहेत. 'मी म्हणतो ते मुकाट्याने मान्य करा; नाही तर तुम्ही सुज्ञ, समंजस, विचारी कसे ठरता ते पाहतो!' असेच जणु या वाक्यांनी दामले वाचकांना धमकावीत असतात; आणि वाचक अनुकूल निघाल्यास 'शास्त्रानभिज्ञ परन्तु सुज्ञ' असे म्हणून त्याची शास्त्रानभिज्ञताही चालवून घेतात.

पुनरुक्ती

पुनरुक्ती हाही दामल्यांचा एक स्वभावधर्म आहे. त्यांच्या लेखनात मुद्द्यांची पुनरुक्ती तर अगणित ठिकाणी आहे. एखादा मुद्दा मांडल्यावर काही मजकूर लिहून झाला, की तो मुद्दा मांडल्याचा दामल्यांना विसर पडतो; आणि पुन्हा तो मुद्दा हजेरी लावण्यास (की दक्षिणा घेण्यास?) आला तरी ते त्याला मनाई करीत नाहीत. उदाहरणार्थ : शब्दाच्या अंतीचा अ अपुर्णोच्चरित असताना लटपटू लागतो आणि मग पुर्वाक्षरातला स्वर त्याच्याकडे ओढ घेऊ लागतो, त्याची गोष्ट; असा अ शब्दाच्या मध्ये आल्यास मागच्या अक्षराला पुढे जोडाक्षर आल्याप्रमाणे बसणारा धक्का; 'अनुनासिका'चे लक्षण; पूर्वरूपसंधीचे लक्षण; यणादेशाची माहिती; वर्गीकरण, विकरण आणि व्युत्पत्ती; विशेषनामांचा अनेकवचनी प्रयोग; 'अनुसंबंधी'

संज्ञेची शिफारस; 'कोणीही' पासुन 'कोण्ही'; करता आणि कर्म यांच्या मध्ये अदलाबदल होत नाही; धातुरूपेश; करवितो-करवतो या रूपांत दादोबामते 'कर' हाच धातु, इत्यादी; प्रत्ययभेदाने विभक्तिभेद; पद्यवर्तमान आणि रीतिभूत यांमध्ये दोनच रूपांत फरक; 'टीप'; काळ हाही एक अर्थ; लाख्यात - असला... लाख्याती रूप; संयुक्तक्रियापद म्हणजे... ते संयुक्तक्रियापद होय; जाते, निघते, करते ही सामान्यरूपे; कर्मांचे स्थानी चतुर्थ्यन्त वे-कृदंत; ऊन-कृदंत आणि कार्यकारणभाव; व्याकरणाचे पर्यवसान पदपरिस्फोट; या वाक्यांत प्रधानकर्तृक कर्मणिप्रयोग आहे.

यावरून लक्षात येईल की, कित्येक वेळा दामल्यांना आपल्या उक्तीचा पुढच्याच वाक्यात, किंबहुना त्याच वाक्यात शेवटी, विसर पडतो. इतके कशाला, समानार्थक शब्द लागोपाठ आल्याचीसुद्धा उदाहरणे दामल्यांच्या लेखनात अनंत आहेत : 'आपआपसांत परस्पर, सहसा फारसे, फक्त प्रत्ययात मात्र, मुळची मातामही, वास्तविक खरा, जोडलेली सांगड' इत्यादी. 'इ.' अर्थात 'इत्यादी' हेही असेच दामल्यांच्या हातून नकळत कोठेही उमटणारे पद आहे; आणि विशेष हे की, ते प्रायः 'जसे' च्या जोडीने येते. ही 'जसे... इत्यादी' ची जोडी फुटल्याची सबंध हजार पृष्ठांत मला दोनच स्थळे आढळली! पण याही स्थळी दामले 'इ.' लिहावयास विसरले, यापेक्षा या एका अक्षरासाठी नवी ओळ करावी लागली असती; यामुळे त्यांना मुद्दामच 'इ.' लिहिला नाही अशी शक्यता अधिक वाटते. या सर्व कारणांमुळे दामल्यांचे लेखन फार विस्तृत आणि पाल्हाळाचे झाले आहे. हे त्यांना स्वत:लाही अधुनमधून जाणवत असावे, असे त्यांच्या 'हा आधीच लांबलेला विषय', 'विस्तारभयास्तव', 'आता विस्तार नको', 'हे विवेचन जरासे लांबलचक झाले आहे' इत्यादी विधानांवरून वाटते. पण विस्तार करूनच्या करून वर ही विधाने केली असल्यामुळे त्यांतून विनोदाखेरीज अन्य काही निष्पन्न होत नाही. 'एवढा मोठा व्याकरणग्रंथ' आपण का लिहिला, असा एक प्रश्न कल्पून त्यांनी 'उपक्रमा'त 'इतके लिहिल्यावाचून माझ्याने राहवेना' असे उत्तर दिले आहे; आणि त्याच्या गुणदोषांच्या बाबतीत तुकारामबुवांच्या 'करविली तैशी केली कटकट । वाकुडे की नीट देव जाणे।।' या वाचनाचा हवाला दिला आहे.

समासविच्छेद; निरुपयोगी आणि अस्थानी माहिती

पुनरुक्तीप्रमाणे कंटाळा आणणारा नव्हे, तरी 'सूक्ष्म वाचका'ला जाणवणारा दामल्यांचा एक गौण दोष म्हणजे समासघटकांचा विच्छेद. 'तीन अक्षरी, अपुर्णोच्चरित अकारान्त, दीर्घस्वरपूर्वक ईकारोपांत्य, उच्चार विशेषास, सर्वसाधारण, लोक जागृती, अपूर्णक्रियाद्योतक, वर्तमान कालवाचक, व्याकरण पद्धति, शब्दयोगी अव्ययान्त शब्द, अधिक हेरी, वाक्य पृथक्करण', इ. अर्थद्योतक अशी लेखनशैथिल्याची उदाहरणे त्यांच्या ग्रंथात पदोपदी भेटतात. अर्थात यात दोष दामल्यांचा किती आणि मुद्रकाचा किंवा मुद्रितशोधकाचा किती, हे सांगणे कठीण आहे. क्वचित दामल्यांचा निरुपायही झाला असणे शक्य आहे; 'विशिष्ट कल्पनावाचक सांकेतिक विशिष्ट शब्दमय' हे इतके शब्द जोडून लिहिणे हे त्यांना फारच अवघड वाटले असावे. पण या पक्षी त्यांना दोनतीन वाक्यांच्या रूपाने याहून वेगळी रचना करता आली असती असे वाटते. असे अन्यही काही अल्पोपद्रवी दोष त्यांच्या ग्रंथात आढळतात.कोठे कोठे ते ग्रंथाला निरुपयोगी अशी माहिती केवळ आपल्याला आहे म्हणून देतात. जसे : अच्, हल्, अच्-संधि, लट्, इत्यादी संस्कृत संज्ञा; व्यंजनांचे कठोर-मृदू वर्ग, अर्धस्वर; छंदशास्त्रातले नियम; राव, रावजी, पंत इत्यादी सन्मानदर्शक शब्दांच्या प्रयोगांचे क्षेत्र. मराठीत न भेटणारी संस्कृत उदाहरणे तर संधी आणि समास यांच्या विवेचनात अगणित आहेत. कित्येक ठिकाणी दामल्यांची माहिती अस्थानी येते. जसे : अंक २५९ आणि २६० यांमध्ये दिलेल्या माहितीचे योग्य स्थान अंक २५५ (आ) याच्याजवळ आहे; अंक २३२ मधील 'अपवाद ४' वरील टीप 'अपवाद ३' वर हवी. 'प्रत्ययघटित साधितशब्दां'च्या विवेचनात फारसी आणि अरबी समास आणि समासवजा शब्द

अनुक्रमणिका

शेवटी जोडले आहेत, एवढेच नव्हे तर प्रत्ययान्त शब्दांच्या याद्यांतही घुसवले आहेत. अंक ४५१ मधली माहिती बहुव्रीहीतील विशेषांविषयी असल्याने अंक ४५४ मध्ये द्यावयास हवी होती. अंक ५२५ (ई) वरील टीप २ ही ५२५ (अ) शी संबद्ध असल्याने त्याखाली येणे नीट झाले असते. संयुक्तक्रियापदविचारात अंक ५४२ मध्ये दिलेल्या माहितीचा संयुक्त क्रियापदाशी असा संबंध नाही; ती आख्यातार्थांच्याविवेचनात अंक ५१० पासून पुढे आलेल्या भागात, किंवा त्याहीपेक्षा शब्दविचारातील धातुविषयक अध्याय ५ मध्ये देणे युक्त झाले असते. कर्मणी प्रयोगाच्या विवेचनात अंक ५८१ मध्ये इ ह्या विभागात स्वतंत्रपणे दिलेली माहिती गरज नसताना अ मध्येही दिली आहे. अंक ५९५ आणि ५९६ यांत दिलेली उभयान्वयी अव्ययाची माहिती ५९७ मधल्या शब्दयोगी अव्ययांच्या माहितीनंतर देणे दामल्यांनी स्वीकारलेल्या शब्दजातींच्या क्रमाला अनुरूप झाले असते. अंक ५९८ मध्ये दिलेली णे-कृदन्ताविषयीची माहिती उघड उघड विभक्त्यर्थांत बसणारी आहे. मराठी कृत्प्रत्ययांच्या यादीत 'ण' या प्रत्ययाविषयी दिलेली 'संस्कृत धातु बहुधा...स्वरांत आहेत' ही माहिती मागच्या-पुढच्या वाक्यांशी संबद्ध नाही.

'उद्घाटन, ऊहापोह, टीप' : संकर

दामल्यांनी आपल्या व्याकरणात 'उद्घाटन' आणि 'ऊहापोह' असे दोन प्रकारचे मजकूर असल्याचे मुखपृष्ठावर ग्रंथाच्या नावाखाली निर्देशिले असून त्यांचा विभाग उद्घाटनाला मोठा आणि ऊहापोहाला लहान असा वेगवेगळा टाइप वापरून आणि ऊहापोहाला चौकटी कंस करून दर्शविलाही आहे. लहान टाइपात त्यांनी ऊहापोहाखेरीज 'टीप' या नावाने, आणि क्वचित 'सूचना' या नावाने (क्वचित ही दोन्ही नावे गाळून) आणखी एका वेगळ्या जातीचा मजकूर दिला आहे. उपसर्गघटित आणि प्रत्ययघटित साधित-शब्दांचे विवेचन करणाऱ्या अध्यायात (भाग २, प्रकरण ३, अध्याय २-६) ऊहापोह नाही. या सबंध ग्रंथात तळटीपा फक्त आठ ठिकाणी आल्या आहेत. मुख्य माहिती उद्घाटनात, अवांतर माहिती टीपेत (किंवा सूचनेत), चर्चा ऊहापोहात, आणि मागाहून सुचलेली फुटकळ माहिती तळटीपेत, अशी मूळ योजना दिसते. पण पुढे दामल्यांना या योजनेचा विसर पडला असावा. टीपेचा किंवा ऊहापोहाचा मजकूर उद्घाटनात दिला आहे, अशा जागा या ग्रंथात कित्येक आहेत. जसे : अंक २१(अ), ४९, 'शब्दविचारा'चा 'विषयप्रवेश', अंक ११९,१२९, १७५(आ), २३७, २५०, २८३ - चा मधला भाग, ५०७, ५४३, ६१३, ६३५, ६८५(उ). क्वचित टीपेत उद्घाटनाचा मजकूर भेटतो (जसे : अंक ५३०, टीप १); ऊहापोहाचाही भेटतो (जसे : ३७७ वरील टीप) दामल्यांच्या काही टीपा ऊहापोहाला लाजवतील इतक्या मोठ्या आहेत. दामल्यांनी तद्धित-प्रत्यायांत एका टीपेत 'स्थूलत्वार्थी ईश्वर शब्द' जोडून 'दउतेश्वर, लवंगेश्वर, टीचेश्वर' इत्यादी शब्द साधून दाखवले आहेत. त्यांच्या नमुन्यावर वरील टीपांना 'टीपेश्वर' आणि दामल्यांच्या व्याकरणाला 'व्याकरणेश्वर' म्हणावयास हरकत नाही. टीपा प्रायः पूर्वीच्या मजकुराला अनुलक्षून येतात; पण क्वचित (जसे : अंक ११९, टीप २) त्या पुढच्या मजकुराशी संबद्ध असतात.

पूर्वसूरींचा परामर्श

मुख्यतः 'ऊहापोहा'त आणि क्वचित 'उद्घाटना'त आणि 'टीपां'त दामल्यांनी विवेच्य विषयासंबंधीच्या पूर्वसूरीच्या मतांचे निर्देश आणि परामर्श केले आहेत. यांपैकी बहुसंख्य स्थळे नामनिर्देशयुक्त असली, तरी काही स्थळी दामले 'काहींचे म्हणणे, काही वैयाकरण, दुसरे वैयाकरण, कोणी, दुसरे कोणी, काहीक' असा पूर्ण मोघम, आणि काही स्थळी 'आधुनिक वैयाकरण, अलीकडील वैयाकरण,नवीन मत, आजकालचे मत' असा कमी मोघम निर्देश करतात. दामल्यांनी नामनिर्देश केलेल्या वैयाकरणांमध्ये सर्वात जुने दादोबाच; यापूर्वीचे दखल घेण्याजोगे वैयाकरण दामले जाणत नाहीत. नामनिर्देश केलेल्या स्थळी सर्वांत अधिक वेळा हजेरी दादोबा, रामचंद्र भिकाजी जोशी, अप्पाजी काशीनाथ

खेर यांची लागली आहे; यांच्या खालोखाल कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले,- म्हणजे, 'शास्त्रीद्वय', 'कृष्णशास्त्रीद्वय'- गोपाळ गणेश आगरकर, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा नंबर लागतो; सर्वांत कमी वेळा (म्हणजे, दोनचारदाच) भेटतात ते गणपतराव नवलकर, 'मंजरीकर' (म्हणजे विष्णू लक्ष्मण काळे आणि रामचंद्र काशीनाथ हळबे), आणि बाळकृष्ण विष्णू भिडे. रावजीशास्त्री गोडबोले, बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री टिळक, गोपाळ जिवाजी केळकर आणि वागळे यांची तर दामल्यांनी 'उपक्रमा'त एकवार निर्देश करण्यावरच बोळवण केली आहे. यांपैकी गोपाळ जिवाजी केळकर यांचे व्याकरण मला उपलब्ध झाले नाही. त्याखेरीज इतरांच्या आणि इतर अनेकांच्या व्याकरणांचा परामर्श माझ्या 'मराठी व्याकरणाचा इतिहास' या ग्रंथात जिज्ञासूंना पाहता येईल.

दादोबा, चिपळूणकर,गोडबोले या प्रायः सर्वांचे दामल्यांनी कमीअधिक प्रमाणात खंडन केले असले तरी सर्वांना सारख्या पातळीवर बसवलेले नाही. दादोबांच्या मतांचे खंडन दामल्यांच्या ग्रंथात सर्वाधिक वेळा आले असले तरी दामले 'उपक्रमा'त दादोबांना 'मराठीचे आद्य वैयाकरण' मानतात, त्यांनी व्याकरण 'या शास्त्रास मूर्तस्वरूप देऊन त्यास नीटनेटकेपणा, सौंदर्य, उज्ज्वलता व पूर्णता आणण्याचे कामी आपल्या आयुष्यभर काळजीपूर्वक अव्याहत मेहनत' केल्याबद्दल त्यांचा गौरव करतात, आणि श्रीक्षेत्र काशीतील 'दाक्षिणात्य पंडितां'नी त्यांना दिलेल्या 'महाराष्ट्र भाषेचे पाणिनी' या गौरवोपाधीला अनुमोदन देतात. 'व्याकरणविषयात दादोबा, चिपळूणकर व गोडबोले ह्यांच्याच अंगाखांद्यावर खेळून वाढीस लागलेल्या पिढीपैकीच प्रस्तुत लेखक आहे' या शब्दातं दामल्यांनी दादोबादिकांचे ऋण मान्य केले आहे. अर्थातच त्यांच्या मतांचा परामर्श करताना दामल्यांची भाषा काहीशी मर्यादशील होते. ते दादोबांचे 'चुकलें' म्हणतात, त्यांची 'दृष्टी चकली' म्हणतात, त्यांच्या शिफारशीला 'अरेरावी' म्हणतात, इतकेच. केव्हा केव्हा त्यांच्या शिफारशी करण्याच्या सवयीचे समर्थनही करतात. दादोबा आणि चिपळूणकर हे दामल्यांच्या मते व्याकरणात 'रथीमहारथी' आहेत; शिवाय चिपळूणकर 'शास्त्रपारंगत', 'संस्कृताभिमानी व संस्कृतभाषापारंगत' आहेत. त्यामुळे चिपळूणकरांचीही 'नजर' जेव्हा (फक्त) 'चकते' तेव्हा दामल्यांना आश्चर्य वाटते. आपल्या मताच्या दृढीकरणासाठी कोठे कोठे चिपळूणकरांचे मत उद्धृत करताना दामल्यांना समाधान वाटतेसे दिसते. संस्कृत, फारसी आणि अरबी या भाषांतील माहितीसाठी तर दामले सर्वस्वी कृष्णशास्त्री गोडबोल्यांवर अवलंबून आहेत. यांखेरीज अन्य विषयांत दामल्यांनी त्यांच्यावरही शरसंधान केले आहे.

आगरकर, गुंजीकर, राजवाडे, नवलकर

वाक्यपृथक्करणात दामले आगरकरांवर अवलंबून असे नसले, तरी त्यांच्या मताला प्रायः मान देतात. आगरकरांचे मत दामल्यांनी नापसंत केले, अशा जागा फार थोड्या आहेत. त्यांपैकी एका जागी तर दामल्यांनी चुकीचीच बाजू घेऊन, म्हणजे 'त्याला पाहिजे त तो करू दे' असे प्रयोग अप्रमाण ठरवण्याकरिता, आगरकरांवर हल्ला चढवला आहे. या ठिकाणी स्वतः दामल्यांनीच उद्धृत केलेल्या 'आम्हा महाराष्ट्रीयांस भाषा-विषयक अर्थजालाशी झगडण्याची सवय अद्यापि फारशी लागली नाही' या आगरकरांच्या आव्हानामुळे इरेला पेटून दामल्यांनी हा वाद घातला असावा. (अन्यत्र ते 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या न्यायाने 'तत्त्वबोध होण्यासाठी वाद' करतात. एरवी दामल्यांच्या मते आगरकर 'विद्वान प्रोफेसर' आहेत, 'विद्वद्वर्य' आहेत, 'शास्त्रीयरीत्या फारच उत्तम ऊहापोह' करणारे आहेत, 'जोरदार भाषा' आणि 'अधिकारयुक्त विवेचन' यांनी त्यांचा ग्रंथ मंडित आहे. यामुळे दामल्यांनी 'पुरवणी' म्हणून तो वाचण्याची अनेकदा शिफारसही केली आहे. गुंजीकरही 'सुप्रसिद्ध भाषाभिज्ञ' आहेत, 'मार्मिक भाषाभिज्ञ' ही आहेत; आणि त्यांचे 'निबंधही शास्त्रीबोवांच्या (म्हणजे कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या) निबंधांच्या तोलाचे'

आहेत. त्यामुळे त्यांच्याही वाटेला दामले फारसे जात नाहीत. राजवाड्यांशी मतभेद प्रकट केले आहेत, अशाही जागा दामल्यांच्या ग्रंथात एकंदरीने कमीच, म्हणजे पाचसहाच आहेत. नवलकरांच्या व्याकरणाविरुद्ध दामल्यांची तक्रार 'त्याची किंमत श्रीमंतीची' असण्यापलीकडे काही दिसत नाही. तथापि त्यातल्या प्रतिपादनाचा परामर्श दामल्यांनी फारसा केलेला नाही. इतरांचा परामर्श दामल्यांनी प्रायः दोषदर्शनासाठीच केला आहे, हे पाहता नवलकरांच्या बाबतीतले दामल्यांचे प्रायः मौन हे नवलकरांचे व्याकरण दामल्यांच्या दृष्टीने निर्दोष असण्यास अनुकूल असे अप्रत्यक्ष प्रमाण ठरू लागते.

जोशी आणि खेर

दामल्यांनी खरे धारेवर धरले आहेत असे व्याकरणकार जोशी आणि खेर हे होत. दामले 'नवीन वैयाकरणां'चे म्हणून केव्हा केव्हा मत मांडतात, तेव्हा प्रायः हेच दोघे त्यांना अभिप्रेत असतात. यांपैकी जोशांनी व्याकरण 'या विषयाचा दीर्घकाळ व्यासंग केला' आहे, या विषयावर 'अनेक लहानमोठी पुस्तके प्रसिद्ध केली आहेत', कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधाचा आणि विशेषेकरून क्रियापदनिरूपणाचा' उद्धार केला आहे, याबद्दल दामल्यांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत. पण 'याशिवाय त्यांनी व्याकरणात व वाक्यमीमांसेत जी उलथापालथ केली आहे', तिची त्यांना क्षमा करण्यास दामले तयार नाहीत. या विषयातले जोशांचे विवेचन त्यांच्या मते 'अशास्त्रीय', 'अनिर्बंध', 'अप्रमाण' व 'धृष्ट' आहे; कारण खुद्द जोशी हे 'शास्त्रीय संस्कारविरहित' आहेत, 'अशास्त्रीय, अप्रयोजक व परप्रत्ययनेयबुद्धी' आहेत. खेरांचे श्रेय दामल्यांनी एवढेच नमूद केले आहे : 'इंग्रजी भाषेच्या व्याकरणावर बेन ह्याने जे शास्त्रीय पद्धतीने पुस्तक लिहिले आहे, त्यावरून खेर ह्यांनी मराठी व्याकरणाच्या शास्त्रीय पद्धतीचा एक सांगाडा तयार केला आहे'. (हाच बेनचा कित्ता वाक्यमिमांसेच्या बाबतीत आगरकरांनी समोर ठेवल्याचे, आणि तेच कार्य आपण पुढे चालवीत असल्याचे दामल्यांनी उपक्रमात नमूद केले आहे.) पण तपशिलात शिरल्यावर दामल्यांनी दादोबादिकांचा ठेवला आहे, तसा या दोघांचा मुलाहिजा ठेवलेला नाही. दादोबा, चिपळूणकर, गोडबोले या 'विद्वान त्रयी'पासून या दोघांना 'बाजूस ठेवण्या'ची काळजी दामले घेतात. त्यांनी योजलेल्या नव्या संज्ञांना दामले 'कवडीमोल नाणी' ठरवून त्यामुळे 'घाण झाली' म्हणतात, त्यांचे 'डोके ठिकाणावर' नसल्याची माहिती देतात, 'त्यांनी डोळे मिटून लिहिले' असल्याची ग्वाही देतात, त्यांना जे कळले नाही ते कळण्यास 'पोराची अक्कल पुरे' असल्याचे सांगतात, त्यांच्या नियमांना साफ 'हरताळ फासला पाहिजे' म्हणतात, त्यांच्या चुकांना 'मराठी व्याकरणाचे दुर्दैव' ठरवतात, त्यांचा 'नालायकपणा' दाखवतात, त्यांनी 'अर्थाचा खून' केल्याचा आरोप करतात, त्यांनी 'चुथडा' केला म्हणतात, त्यांना 'दुराग्रही व पक्षांध' ठरवतात. दामल्यांनी एका ठिकाणी जोशीबोवांच्या 'प्रौढबोध व्याकरणा'च्या 'प्रौढ' वाचकाची एका हरिदास-पुराणिकाशी गाठ घालून देऊन वाचकाची फजिती करवली आहे; आणि त्यांच्या पुस्तकांसारखी चुकांनी भरलेली, अशास्त्रीय पुस्तके शाळांत लावण्यासाठी मंजूर केल्याबद्दल शाळाखात्यालाही काही ठिकाणी तराटण्या दिल्या आहेत. जोशी आणि खेर नसते तर दामल्यांनी या तोफा कोणावर डागल्या असत्या, हा एक प्रश्नच आहे!

पूर्वसुरींच्या ग्रंथातील गुणांचा परामर्श न करता नेमक्या दोषांवर तेवढे आपण बोट ठेवलेले पाहून लोक आपणांस 'दोषैकदृक्' म्हणतील, याचे स्वप्न दामल्यांना पडले आहे. आपल्या या कृतीचे समर्थन करताना दामले 'उपक्रमा'त म्हणतात : 'कोणत्याही शास्त्राची किंवा कलेची जेव्हा वाढ होत असते तेव्हा मागल्या रचनेतील दोष विशेषेकरून दूर करावयाचे असल्यामुळे त्यांच्याकडेच नवीन प्रबंधकाचे लक्ष असणे स्वाभाविक आहे.' पण असे असले तरी 'पूर्व कृतीतील योग्य व सत्य भागाचा स्वीकार करूनच तो पुढे चालण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे पूर्व प्रबंधकांची योग्यता तो विसरून जाणे शक्यच नाही.

अनुक्रमणिका

...पूज्यपुरुषांसंबंधाने दोषज्ञान व पूज्यबुद्धी यांजमध्ये काही एक विरोध नाही.' दामले पुढे असेही म्हणतात की, ते दादोबादी पूर्वसुरींच्या खांद्यांवर उभे राहिले असल्यामुळे पपूर्वसुरींच्याहून त्यांची दृष्टी दूरवर पोचणारच; आणि यामुळे पूर्वसुरींना अदृश्य असे काही क्षेत्र त्यांनी इतरांच्या दृष्टीपुढे आणून देणे हे दोघांनाही भूषणावह आणि अभिमानास्पद आहे. दामल्यांची या बाबतीतली भूमिका पूर्वसुरींच्या कार्यातले 'न्यून ते पुरते, अधिक ते सरते' करण्याची आहे. आगरकरांनी आणि खेरांनी बेनच्या व्याकरणाच्या नमुन्यावर मराठीच्या व्याकरणाची उभारणी करण्याचे काम सुरू केले, ते 'पुढे चालवून प्रचलित मराठी व्याकरणाची शास्त्रीय पद्धतीने योग्य रचना करून व्याकरणाचा व वाक्यमिमांसेचा सांधा एकात एक नीट जुळवून द्यावा आणि असे करिताना होता होईल तो व्याकरणाच्या लहानमोठ्या सर्व मुद्द्यांची यथाशक्ति छाननी करावी,' याच मुख्य उद्देशाने दामले प्रेरित झाले आहेत. 'मराठी व्याकरणाची रचना शास्त्रीय पद्धतीस अनुसरून' करण्याचे हे कार्य आपल्या हातून पूर्ण झाले आहे, असे दामले समजत नाहीत; आणि असे होण्याचे कारण देतात की, 'मराठी भाषेसारख्या प्रचलित व वृद्धिंगत होत जाणाऱ्या भाषेचे व्याकरण अपूर्णच असावयाचे. विशेष वस्तू अनंत आहेत आणि त्या सर्वांचा सामान्यात समावेश करिता येत नाही, असे बेकनचे म्हणणे आहे. तसेच 'अनंतपारं किल शब्दशास्त्रम्' अशी आपलीही म्हण आहे.' दामल्यांची आकांक्षा एवढीच आहे : 'मराठी व्याकरणास शास्त्रीय वळण लागण्याचे व त्यास पूर्णत्व प्राप्त होण्याचे बाबतीत प्रस्तुत ग्रंथाचा उपयोग होवो.' हे दामल्यांचे श्रेय त्यांच्या विरोधकांनाही अमान्य करता येणार नाही.

अन्य ग्रंथकार आणि ग्रंथ

वरील मराठी वैयाकरणांखेरीज डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, 'आपटेज् गाइड'कर्ते प्रि. वामन शिवराम आपटे, मराठी-इंग्रजी कोशकार कॅप्टन जेम्स टी. मोल्स्वर्थ यांचाही प्रसंगविशेषाने तुरळक निर्देश दामल्यांच्या व्याकरणात आला आहे. 'विविधज्ञानविस्तारा'तील (मे १९०९) एका व्याकरणटीकालेखाच्या संदर्भात श्री. सखाराम रघुनाथ दांडेकर यांचा निर्देश आला आहे. संस्कृत ग्रंथकारांपैकी फक्त पाणिनीचे नाव ते घेतात. त्याला त्यांनी 'प्राचीन पूज्यपाद ज्ञानसूर्य' म्हणून गौरविले असून त्याने निर्मिलेली 'लट्, लिट्, लुट्' इत्यादी परिभाषा अनेकदा प्रशंसिली आहे. उदाहरणांदाखल नामनिर्देशपूर्वक घेतलेल्या अवतरणांत बहुसंख्य वचने अर्याभारतकार मोरोपंतांची आढळतात. हा योगायोग वाटतो; पण दामल्यांचे स्वत:चे नाव 'मोरोपांत'च आहे, यामुळेही मोरोपंतांना ही खास वागणूक मिळालेली असणे असंभाव्य नाही. ज्यांची अथवा ज्यांतून दामल्यांनी उदाहरणवचने उद्धृत केली आहेत, असे अन्य मराठी ग्रंथकार आणि ग्रंथ असे आहेत : अनंतकवी, शिवदिनकेसरी, तुकाराम, ज्ञानेश्वर, राजवाडी ज्ञानेश्वर, रघुनाथ पंडित, वामन,मुक्तेश्वर, सोहिरोबा, श्रीधर, रामजोशी, किर्लोस्कर, हरिहरमहाराज, रामदास, विवेकसिंधू, श्रीगुरुचरित्र, कचेश्वर कवी, भुजंगनाथ, कृष्णशास्त्री चिपळूणकर, भा. दा. पाळंदे, परशुराम तात्या गोडबोले, पां. गो. शास्त्री पारखी, बापुसाहेब कुरुंदवाडकर, गं. रा. मोगरे, खाडिलकर, आनंदतनय. यांपैकी निम्मे शिम्मे ग्रंथकार किंवा ग्रंथ अक्षरश: एकदाच डोकावून गेले आहेत; आणि वारंवार येणाऱ्या जुन्या ग्रंथकारांची बहुतेक वचने कृष्णशास्त्री गोडबोल्यांच्या व्याकरणात येऊन गेली आहेत. हरिहरमहाराज हे दामल्यांचे गुरु, आणि गुरुचरित्र हा त्यांचा पूजाग्रंथ असल्यामुळेच त्यांची व्याकरणग्रंथात हजेरी लागली असावी. काही अवतरणे निनावी आहेत : 'आजि वेदव्यास गुरु । तुम्हा माझा नमस्कारू॥...', 'पलंगी बसवूनिया राणी । माते हाते आणवी पाणी ॥' 'जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीते ॥', 'जन हो मन मुंडा मन मुंडा ।...' इत्यादी.

अनुक्रमणिका

सभाशाही लेखन

दामल्यांच्या पुनरुक्ती इत्यादी सवयींबद्दल वर लिहिले आहे. दामल्यांच्या काही निरुपद्रवी सवयीही दाखवता येण्यासारख्या आहेत. त्यांच्या लेखनात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, एखाद्या सभेत भाषण करीत असल्यासारखी भाषा ते लेखनात योजतात. अर्थात सभेतले भाषण परिणामकारक होण्याकरिता आणि प्रतिपक्षाचा पाडाव करण्याकरिता वक्ता शब्द, वाक्ये, दृष्टांत जसे योजील तसे दामले लेखनात योजतात. 'सत्य, सत्याभिमान, सत्याचे स्मरण' या गोष्टी दामल्यांच्या व्याकरणात अनेकदा भेटतात. 'सुज्ञ, तज्ञ, विचारी, समंजस' अशा वाचकांना त्यात वारंवार कौल लावला जातो. दामल्यांचे सिद्धांत 'सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ' असतात. प्रतिपक्षाचे दोषदर्शन करताना त्यांना पुष्कळदा एखाद्या मुद्द्यावर 'दु:खाने, दिलगिरीने म्हणावे लागते'. काही वेळा दामले फक्त 'नम्र विनंती' करतात; आणि केव्हा केव्हा आपले म्हणणे मांडून वाचकांची 'रजा' घेतात. अधूनमधून त्यांना 'वाचक हो' अशी हाकही मारतात. त्यांचे प्रतिपक्षी 'दुराग्रही, पक्षांध' असतात; 'बुह्मघोटाळा' करतात; 'अरेरावी' करतात; त्यांचे 'डोके ठिकाणावर' असत नाही; ते 'डोळे मिटून' लिहितात; त्यांची 'दृष्टी चकते'; जे कळण्यास खरोखर 'पोराची अक्कलही पुरे', तेही त्यांना कळत नाही; त्यांच्या लिखाणावर वस्तुत: 'हरताळ फासला पाहिजे' असतो; त्यांना 'वाडवडिलांपेक्षा आपण अधिक जाडे विद्वान् झाल्याची घमेंड' असते; ते 'पोरकटपणे अद्वातद्वा बरळत' असतात; असे बरेच काही दामल्यांनी प्रतिपक्षाच्या योग्यतेबद्दल लिहिले आहे. प्रतिपक्षाचे अज्ञान पाहून पुष्कळदा त्यांना 'हसावे की रडावे हे कळत नाही.' त्यांना 'राजमार्ग' हवा असतो; 'आडमार्ग' नको असतो. 'भीड भिकेची बहीण' त्यांना मानवत नाही. 'शास्त्रीय विषयात डोके शांत पाहिजे' असे ते वारंवार बजावीत असतात. मधून मधून ते दाखलाही देतात,- 'सूक्ष्मदर्शक यंत्रा'चा देतात; 'एका परीक्षेत चाळीस विद्यार्थ्यांपैकी तीस विद्यार्थी पास झाले' त्या गणिताचा देतात; 'वाळूच्या भुसभुशीत पायावर उभारलेल्या इमारती'चा देतात; 'आंधळ्या कोशिंबरी'च्या खेळाचा देतात; 'मोंगलाई अंमल गाजवून जबरीने मुंडन करून मुसलमानी दीक्षा' देण्याचा देतात; 'मुख्य घर किंवा बंगला यांस आजूबाजूस पडव्या, सोपे, वरांडे' यांमुळे जी 'सोय' आणि 'शोभा' होते, तिचा देतात; 'सर्व रोग्यांस...एकच ठराविक औषध' देणाऱ्या 'मिश्रक वैद्यबोवां'चा (कंपौंडर) देतात. पण एकूण ग्रंथाच्या मानाने असे दाखले कमीच.

व्युत्पत्त्या

याच्या उलट त्यांची व्युत्पत्तिचर्चा. ती त्यांच्या ग्रंथात दाखल्यांहून पुष्कळच अधिक प्रमाणात येते. विभक्तिप्रत्यय, आख्यातप्रत्यय कशापासून निघाले याची माहिती तर ते देतातच; पण 'शुक्तिका - शिंप, तृषा - तहान, लत्ता - लात, षंड - सांड, सत्काल/सुकाल - सकाळ, तिलक - तीट, टंग - टांग, पुत्र/पुत्री - पोर, भूमी - भूय, धूम्र - धूर, आभा-आळ - आभाळ, कांती - कांत,' अशा (वृत्तपत्रातल्या 'शब्दकथां'तच चालण्यासारख्या) गमतीच्या शब्दव्युत्पत्त्याही देतात. अधुन मधून ते प्रकृतातल्या रुपांतरांनाही नकळता हात घालतात, आणि 'कर्तुं-करदुं-करूं, हसितुं-हसेउं-हसूं' अशी विवरणे बेधडक देतात. मराठीतल्या 'ऊन' प्रत्ययाचे (करून, बोलून,...) मूळ त्यांच्या मते संस्कृत 'त्वा' प्रत्यय आहे. हे सारे ज्ञान त्यांनी कदाचित दुसऱ्या अशाच कोणाच्या तरी ग्रंथातून उतरून घेतले असणे अशक्य नाही. अशी माहिती राजवाड्यांच्या पुस्तकांतून घेण्याची दामल्यांना सवय आहे. अर्थात राजवाडे चुकतात तेथे दामल्यांना तारावयास कोणीही नाही.

विशेष शब्द

काही शब्द, काही रूपे, काही शब्दांचे विशिष्ट वर्णयोग (स्पेलिंग) यांचा दामल्यांना विशेष लळा दिसतो. त्यांतले काही शब्द हिंदी प्रांताच्या सांनिध्यामुळे त्यांच्या सवयीचे झालेले असणे शक्य आहे. काही

रूढ अर्थांहून वेगळ्या अर्थांनी येतात. काही संस्कृत शब्द दिले आहेत, ते कोणाच्या मराठीत येतात, कळत नाही. उदाहरणार्थ पुढील शब्द पाहा : ‘बराबर, काईम, किं, खुणा (स्त्री.), पुर्णोच्चरित (च्चा), जलद (जदंततालव्य), माणूस, तांदुळ, फाडे/पाडे (=पाढे), छटांक, पाणारणे (=पाणावणे), समोर/समूर, उंचून, पालवपद, मातक्यान, पळपळाट, मोहो, तपकीर (नपुं.), जन्म (नपुं.), कार्ड (पुं. स्त्री. नपुं.), सेन्टेन्स (पुं. नपुं.), साळा (=साला, मेहुणा), हुतुतु, कामीण (=कावीळ), भालूक, आळोकेपिळोके, जांबूळ, जोखमाचें, पावदूक (=वावदूक?), ईयत्ता, थरू, धू, सू, उप्रांत, कून, दुप्पटीने, सरमजाम, अटोका, गंवडी, फसणूक, जेऊं, ठेऊन, वैय्याकरण, नैय्यायिक, एकदुसरा, तिफण, तिरधेल, घणघण (=ताक), फलाणाबिस्ताणा, कत्रर्थी, पैशाने (=ला), पासरी, शक्यताशक्यता (=शक्याशक्यता), माथाळा, नांवरसी, राजाबदल (=०द०), मंडण, मिश्रक (कंपौंडर), दुरापास्त, अतिशयोक्ति (=अतिव्याप्ती), आभार (=उपकार), निष्काळजी (=निष्काळजीपणा), भाषण (=भाषा), विषयक (=विषयभूत), उद्देशून (=अनुलक्षून),द्योतक (=द्योत्य), इंग्रजी (=इंग्रजीचा) अभ्यास, नसता (=नसून), फिरणे - फेरणे (प्रयोजक), येतपर्यंत (=येई.), वरोपचार (=वरवरचा उपचार), शिष्टकल, अद्य, यदा, तदा, कदा, आदौ, हिंदुस्थानांतील (=उत्तर हिंदु०), इत्यादी. एका ठिकाणी ‘घालला’ (=घालायला, घालावयाला) हे खास चित्पावनी बोलण्यातले रूप आले आहे.

वैयक्तिक प्रतिबिंब

दामल्यांचे वैयक्तिक प्रतिबिंब ज्यात पडले आहे असे म्हणता येईल, असे अन्य निमित्ताने आलेले स्पष्ट किंवा अस्पष्ट निर्देश दामल्यांची माहिती असणाऱ्यांना या ग्रंथात पुष्कळ आढळतील. दामले दत्तभक्त होते, हे त्यांच्या व्याकरणाच्या मुखपृष्ठापासूनच जाणवू लागते. बाईंडिंगवर आणि आतल्या मुखपृष्ठावर असलेले दत्ताचे चित्र, ‘प्रस्तावने’च्या शेवटी जाड ठशात आलेली ‘मातृभाषेची ही अल्पसेवा श्रीदत्तचरणी प्रणामपूर्वक अर्पण करितो’ ही अर्पणिका, ग्रंथातील मजकुराच्या पहिल्या पृष्ठावर पहिल्याच पंक्तीत केलेले ‘श्रीदत्त’ हे मंगल, पुढे एका ठिकाणी उदाहरणादाखल दिलेल्या हरिहरमहाराजांच्या पंक्तीतला ‘दत्तगुरू’चा निर्देश, आणखी एका ठिकाणी आलेली ‘नरसोबाची वाडी’ या सर्व गोष्टी काही योगायोगाने आलेल्या नव्हेत. ग्रंथात पहिलेच उदाहरणवाक्य ‘ईश्वर आहे’ हे देऊन त्यांनी आपल्या ग्रंथाला जणु मंगलाचरणच जोडले आहे. ‘परसू, दत्तू, मोरू, केसू, बापू, पांडू, काशी, विष्णू, चिंतू’ इत्यादी वेगवेगळ्या ठिकाणी आलेली नवे खुद्द दामल्यांच्या गोतावळ्यातली आहेत, हे त्यांचे चरित्र वाचल्यावर कोणाच्याही ध्यानात येईल. यांपैकी ‘दत्तू’ला साहजिकपणे बऱ्याच वेळा बोलावणे गेले आहे; त्यांत ‘दत्तू, तू चांगला बस’, ‘पुढच्या वर्षी दत्तूची मुंज होईल’, ‘दत्तू असला तर माझे कार्य होईल’ ही केवळ ‘दत्तू’विषयीची विधाने आहेत.’बादशहा मरण पावला’ ही ‘परसूने खबर आणली आहे.’ एका ठिकाणी दामले आणि ‘दामली(ण)’ही आली आहेत. दामल्यांनी तीर्थयात्रादी निमित्ताने केलेले पर्यटन ‘मुंबईहून काशी सातशे मैल आहे’, ‘आम्हाला तुमची मनिऑर्डर मिळून...आम्ही कशी सोडली’, ‘मुंबईहून नागपूर पाचशे मैल आहे’ इत्यादी वाक्यांत हजेरी लावून गेले आहे. एका ठिकाणी ‘महाबळेश्वर’ही डोकावले आहे. ‘हरी आणि त्र्यंबक’ हे पुस्तक आणि ‘विक्रम-शशिकला हे नाटक ही दोन्ही दामल्यांना केव्हा तरी आवडून गेली असावी.

प्रसंगविशेषाने त्यांनी आपल्या शुद्धलेखनविषयक निबंधाचा आणि न्यायशास्त्रावरील ग्रंथाचा हवाला दिला आहे. शुद्धलेखनाच्या बाबतीत त्यांनी जुन्याचे समर्थन आणि नव्याचा निषेध केला आहे. त्यांच्या व्याकरणात खुद्द त्यांचे व्याकरणही आले आहे.त्याबद्दलचे त्यांचे ‘व्याकरणावरील माझा हा ग्रंथ अंदाजाच्या मानाने फारच थोड्या मुदतीत लिहून झाला’ हे जाहीर प्रकटन लक्षणीय आहे. या व्याकरणाचा त्यांना अर्थप्राप्तीला काहीही उपयोग झाला नाही, हे लक्षात घेता ‘पानास रुपया याप्रमाणे त्याला त्या पुस्तकाचे

पाचशे रुपये मिळाले' हे त्यांनी उदाहरणादाखल लिहिलेले वाक्य अर्थपूर्ण ठरते. त्यांनी उदाहरण म्हणून दिलेली पुढीलही वाक्ये सहेतुक वाटतात : 'जो श्रीमंत असतो त्याला विद्येची गोडी नसते आणि ज्याला विद्येची गोडी असते त्याला अनुकूलता नसते.' भट्टीने संस्कृतात रामचरित्राच्या रूपाने व्याकरण मांडले, तर दामल्यांनी मराठीत व्याकरणामध्ये आत्मचरित्र मांडले आहे!

परिस्थितीचे प्रतिबिंब

याप्रमाणे दामल्यांच्या व्याकरणात जसे घराच्या आतले जीवन आले आहे, तसे घराच्या बाहेरचेही जीवन - म्हणजे परिस्थितीचे प्रतिबिंब - थोडेफार आले आहे. त्यात 'हिंदु-मुसलमान' बेबनाव आहे, 'परवाचा दंग' आहे, 'हरी रामोशी' आणि 'वासुदेव बळवंत' पकडले गेल्याची बातमी आहे, मुंबईचा प्लेग आहे, चीन देशातली जागृती आहे, 'हिंदुस्थानची अधिस्वामिनी आणि इंग्लंदची राणी व्हिक्टोरिआ' आहे, शाळाखात्यावर ताशेरे आहेत, 'काही देशांत शौचाकरिता कागदांचा उपयोग' करीत असल्याचीही माहिती आहे. दामल्यांच्या व्याकरणात 'लहानमोठ्या माणसांचा सरसकट खर्च प्रत्येकी दरमहा सहासात रुपये लागतो', भाताचा दर खंडीला तीस रुपयांवरून पन्नास रुपयांवर आला आहे, 'पैशाला पाच आंबे मिळतात', 'तूप रुपयाने शेर' मिळवायचे ते लग्नसराईत 'दीड रुपयाने शेरही मिळण्याची पंचाईत पडते', चांगले संत्रे सहा रुपये शेकडा मिळतात' आणि 'कापड चार आणे वार मिळते'. (दामल्यांचे व्याकरण किती चांगले आहे!) पन्नास रुपये खंडी भात आणि दीड रुपया शेर तूप यांविरुद्ध तक्रार करणाऱ्या दामल्यांना खरोखर काय म्हणावे कळत नाही.

विनोद, उपरोध, उपहास

दामल्यांना विनोद, उपरोध, उपहास यांचे वावडे नाही, एवढे सिद्ध होण्यापुरत्या विनोदादिकांच्या जागा त्यांच्या ग्रंथातून काढून दाखवता येतील. 'मराठी राज्याचा संस्थापक' हे 'स्थूल दृष्टीने सार्थ विशेषनाम' ठरवताना त्यांनी 'वैयाकरणाची गाजलेली शुष्क अरसिकता' निर्देशून आपल्या जातवाल्यांनाही उपहासविषय केले आहे. पूर्ववैयाकरणांनी अपुऱ्या अवलोकनाच्या आधारावर केलेल्या नियमांचे त्यांनी 'आडनावी नियम' असे नामकरण केले आहे. द्वितीयेच्या वादात वेगळी व्यवस्था मांडून 'थोडी सवय झाल्यावर हा प्रकार उलट सोपा व सोईचा वाटू लागेल', असे म्हणणाऱ्या जोशीबोवांना त्यांनी टोमणा दिला आहे : 'थोडी सवय झाल्यावर विषसुद्धा पचनी पडू लागते.' 'घोडतोंड्या', 'गायमुख्या', 'उंटमान्या' इत्यादी समास उपमानबहुव्रीही न मानता 'घोड्याचे तोंड आहे ज्याला' अशा अर्थाने षष्ठीतत्पुरुषाला तद्धित प्रत्यय लागून सिद्ध झाले आहेत, असे मानणाऱ्या दादोबादिकांना उत्तर देताना दामले लिहितात : 'अशा प्रकारचे प्राणी सध्या तरी आढळत नाहीत.' दादोबांनी पुनरुक्त शब्दांच्या गटात दिलेल्या 'हीकीती, बरेकीवाईट' इत्यादी उदाहरणांना दामले 'फणस ही फण शब्दाची चतुर्थी' मानण्याच्या पंक्तीला बसवतात. 'हा मुलगा लग्न झालेला आहे...एक मुंज व्हावयाची आहे' या उदाहरणांच्या विवेचनाला त्यांनी 'लग्न व मुंज ह्यांचे व्याकरण' म्हटले आहे. दामल्यांच्या शुद्धलेखनविषयक पुस्तकात साने, गोडबोले, हातवळणे या सुधारणावाद्यांना पाणिनीय व्याकरणपरंपरेतील 'मुनित्रय' हा किताब दिला आहे. (हा बहुधा त्यांनी त्या वेळच्या 'केसरी'तल्या याविषयीच्या लेखातून उचलला असावा.) अशी बहुधा चुकून आलेली विनोदादिकांची स्थळे सोडता दामल्यांना या वृत्तीचे वारे लागल्याचे कोठे आढळत नाही.

दामल्यांचे भाषाज्ञान

मराठी इंग्रजी आणि संस्कृत अशा तीन भाषांचे दामल्यांना निश्चित ज्ञान होते; यांहून अन्य भाषांचे होते की काय, असल्यास कोणत्या, याबद्दल काही निश्चयाने सांगता येत नाही. अरबी आणि फारसी

भाषांविषयीच्या माहितीसाठी ते सर्वस्वी कृष्णशास्त्री गोडबोल्यांवर अवलंबून आहेत, हे त्यांच्याच विधानावरून स्पष्ट आहे. आणि त्यांना संस्कृत जरी थोडेफार येत असले तरी संस्कृतच्या व्याकरणाची माहिती त्यांना फारशी नाही, हेही स्पष्ट आहे; कारण संस्कृत संधी इत्यादी प्राथमिक स्वरूपाच्या तपशिलाच्या बाबतीत त्यांनी पुन्हा गोडबोल्यांनाच कौल लावला आहे. तेव्हा खऱ्या राहिल्या भाषा दोनच : मराठी आणि इंग्रजी. मराठी ही दामल्यांची मातृभाषा. तिचे त्यांनी बरेचसे डोळसपणे अवलोकन केले आहे. इतरांच्या दृष्टीतून सुटलेली बरीच उदाहरणे पुढे आणून त्यांनी पूर्वसुरींच्या नियमांतील अपुरेपणा दाखवून दिला आहे. या कामी त्यांना न्यायशास्त्राचा व्यासंग उपयोगी पडला आहे. नियम बांधण्यास उपयोगी अशी अगणित उदाहरणे त्यांनी जमवली आहेत. ही सर्वच उदाहरणे त्यांनी स्वतंत्रपणे जमवली आहेत असे नाही. यांतला बराचसा भाग पूर्ववैयाकरणांच्या ग्रंथांतून आढळून येईल; आणि संस्कृत, अरबी, फारसीविषयक काही भाग तर त्यांनी सांगूनसवरून दुसरीकडून घेतला आहे. (हा सर्व उसना भाग वजा करता दामल्यांच्या व्याकरणातील खास दामल्यांचा असा मजकूर सुमारे निम्मी किंवा त्यांहून कमी पृष्ठे भरेल, असे वाटते.) तसे पाहू जाता एकच भाषेवर ग्रंथरचना करावयाची असता प्रत्येक ग्रंथकार सर्वस्वी नवी उदाहरणे आणणार कोठून? दामल्यांचे कार्य हे की, त्यांनी मिळतील तेथून उदाहरणे गोळा करून एकत्र दिली. दादोबांच्या व्याकरणातून घेतली, पूरणिकेतून घेतली, गोडबोल्यांच्या व्याकरणातून घेतली. आणखीही कोठकोठून घेतली असतील. पण घेतली ती त्यांनी तपासून घेतली; आणि जेथे त्यांचे मुळचे गट चुकलेसे त्यांना वाटले, तेथे त्यांनी ती योग्य त्या गटांत दाखल केली. असे करीत असताना कोठे कोठे त्यांचा दृष्टिकोनच चुकला, तेथे ही उदाहरणे भलत्या गटांत पडणे ओघानेच येते. पण उदाहरणे जमा करण्यात दामल्यांनी कुचराई केली नाही, हे त्यांच्या ग्रंथाचे मोठेच श्रेय होय. भाषेच्या अभ्यासात भरपूर उदाहरणे सोयवार एकत्र उपलब्ध करून देणे हेही एक मोठे कार्य आहे. दामल्यांनी मांडलेल्या निष्कर्षांशी मतभेद असणाऱ्यांनाही त्यांच्या व्याकरणातील हा भाग उपयुक्त झाल्याशिवाय राहणार नाही.

मराठीविषयक विधाने

मराठी भाषेसंबंधी दामल्यांनी नमूद केलेली काही मते अवलोकनीय आहेत. त्यांच्या मते मराठी भाषेला अद्याप (म्हणजे त्यांच्या काळापर्यंत) पूर्ण स्थैर्य आलेले नाही; आणि त्यामुळे तितक्या प्रमाणात व्याकरण संदिग्ध राहणे अपरिहार्य आहे. हे त्यांनी अकारान्त स्त्रीलिंगी नामांच्या प्रथमा एकवचनातल्या अंत्य आ-ई-विकल्पाला अनुलक्षून म्हटले आहे. अन्यत्र त्यांनी दादोबांच्या एका विधानाच्या साक्षीने मराठी भाषेची बाल्यावस्था चालू असल्याचे सांगितले आहे; आणि त्यामुळे तसेच 'तिचे व्याकरण बनण्याचे पूर्वकाळी तिचा स्वभाव मुलाप्रमाणे फार चंचल असतो,' अशी माहिती दिली आहे. याच कारणासाठी त्यांनी निर्दिष्ट स्थळी नेहमीची प्रथा सोडून दादोबांचे शुद्धाशुद्धतेच्या शेऱ्यांबद्दल समर्थन केले आहे. काही रूपांचा दादोबांच्या काळी वैकल्पिक प्रचार असण्यास त्यांनी एका ठिकाणी सवलत दिली आहे, आणि काही प्रयोगांचा प्रचार 'नवीन' असल्याचे सांगितले आहे ते यामुळेच. दादोबांच्या काळातले हे मराठीचे अस्थैर्य दामल्यांच्या काळात 'एकछत्री राज्य, देशी भाषांचा अभ्यास, वर्तमानपत्रे, मासिक पुस्तके व ग्रंथ ह्यांचा मुद्रणकलेच्या सहाय्याने होणारा प्रसार, आणि प्रवाससाधनांच्या सुलभतेने घडणारे प्रांताप्रांतातील वाढते दळणवळण, ह्या योगाने... दिवसेंदिवस लयात जात असून प्रांतिक उपभाषांच्या एकीकरणास सुरवात होऊन गेली आहे, असे म्हणण्यास ' दामल्यांची 'हरकत नाही.'

मराठी भाषेची साधारणपणे तीन स्वरूपे दामल्यांनी मानली आहेत : एक, व्यावहारिक भाषा; दोन, अभीज्ञ ग्रंथकारांची किंवा वक्त्यांची भाषा; आणि तीन, अशिक्षित हलक्या जातींची भाषा. पहिले दोन्ही

अनुक्रमणिका

प्रकार शिष्ट भाषेचे असून तेच व्याकरणाला ग्राह्य होत, असे ते मानतात. ग्रंथकारांची भाषा प्रमाण मानल्यावर तीत 'प्रचलित भाषेहून' भिन्न अशी पद्यभाषा अर्थातच येते; आणि तिचा दामल्यांनी 'पद्य', 'काव्य' किंवा 'कविता' या नावाने अनेक ठिकाणी परामर्श केला आहे. 'प्रचलित भाषे'च्या परामर्शात देशस्थ-कोकणस्थभेदपरत्वे आढळणारी प्रयोगवैशिष्ट्ये वारंवार आली आहेत. एका ठिकाणी 'शिष्ट कोंकणस्थ' आले आहेत. विशिष्ट प्रदेशापुरते मर्यादित प्रयोग निर्देशिताना दामले 'प्रांतिक भाषे'चे नाव घेतात. एकदोन ठिकाणी 'मध्य हिंदुस्थाना'तलीही भाषा आली आहे. या सर्व भेदोपदभेदांमध्ये दामल्यांना ग्रंथभाषा पसंत असून ग्रंथांत न आढळणाऱ्या प्रयोगांची दखल (त्यांनी स्वतः काही ठिकाणी घेतली असली तरी) वैयाकरणांनी घेण्याचे कारण नाही,असे त्यांचे मत आहे. याच कारणामुळे त्यांनी आपल्या व्याकरणात प्रमाणभूत प्रयोग ठरवताना वारंवार लेखनाचा, लेखकांचा किंवा ग्रंथांचा निर्देश केला आहे.

संस्कृताचा आणि इंग्रजीचा मराठीवर प्रभाव

मराठीवर एका बाजूने संस्कृताचा आणि दुसऱ्या बाजूने इंग्रजीचा प्रभाव पडला आहे. त्यांपैकी संस्कृताच्या प्रभावाबद्दल दामल्यांची काही तक्रार दिसत नाही. इंग्रजीच्या प्रभावाकडे मात्र क्वचित सहिष्णुतेच्या तर क्वचित नापसंतीच्या दृष्टीने दामले पाहतात. या भाषांच्या व्याकरणांचा मराठीच्या व्याकरणावर झालेला परिणाम मात्र त्यांनी वेगळ्या भूमिकेवरून जोखला आहे. पाणिनीला ते 'ज्ञानसूर्य' मानतात, आणि संस्कृत वैयाकरणांचीही प्रसंगविशेषी प्रशंसा करतात. अधूनमधून मराठी प्रयोगांची उपपत्ती मांडताना सदृश संस्कृत प्रयोगांची साक्षही काढतात. तथापि मराठी शब्दांच्या लिंगाचा प्रश्न मूळ संस्कृत शब्दांकडे बोट दाखवल्याने सुटला असे होत नाही. 'हिवाळा' शब्दासाठी संस्कृत 'हिमकाला'कडे बोट दाखवून न थांबता 'हिंव' शब्दाला 'आळा' प्रत्यय सांगितला पाहिजे, असे बजावण्यास ते विसरत नाहीत. त्यांच्या मते मराठी धातूही संस्कृत धातूंपेक्षा अधिक नियमित आहेत. इंग्रजी व्याकरणात जरी दामल्यांना 'अप्रयोजकपणा' काही ठिकाणी दिसला, काही इंग्रजी प्रकारकल्पना मराठीत अनावश्यक वाटल्या, 'आमचे वैयाकरण इंग्रजी भाषेच्या परकीय फाजील संस्कारांनी...चकले आहेत' असे त्यांचे मत असले, 'भाषेच्या साम्राज्यातही इंग्रजी प्राबल्य विनाकारण...वाढत चालले' असणे त्यांना आवडत नसले, 'युरोपिअन रचना...आमचे आर्य रचनेहून फारच भिन्न' त्यांना वाटत असली, तरी एकंदरीने 'इंग्रजी वळणाचे सर्वस्वी निराकरण जरी इष्ट असले तरी शक्य नाही', एवढेच नव्हे तर 'ज्ञानाचे प्रत्येक शाखेस पाश्चात्त्यांनी सूक्ष्म विचारांती व दीर्घोद्योगाने जे पूर्णत्व आणिले आहे, ते मनात आणिले असता मराठीस इंग्रजीच्या सहवासापासून सर्वथा परावृत्त करणे इष्टही नाही', असे त्यांचे स्पष्ट मत आहे. शब्दांच्या आठ जातींच्या विश्वव्यापकतेविषयी त्यांची असलेली खात्री, वाक्यपृथक्करण 'या आंग्लपद्धतीचा आमच्या व्याकरणाने स्वीकार केल्या'बद्दल त्यांनी प्रकट केलेले समाधान इत्यादी गोष्टी म्हणजे त्यांच्या या मताचाच स्वाभाविक परिणाम होय. इंग्रजी व्याकरणाविषयीच्या या कृतज्ञतेपोटीच त्यांनी 'अपूर्णवर्तमान' इत्यादी इंग्रजीकडून पदरात पडलेल्या संज्ञा स्वतःला नापसंत असूनही पवित्र करून घेतल्या आहेत.

दामल्यांच्या संस्कृताचा प्रभाव

दामल्यांच्या भाषेवर, विचारांवर, व्याकरणावर संस्कृताचा बराच प्रभाव दिसून येतो. मराठी प्रयोगांची उपपत्ती ते पुष्कळदा सदृश संस्कृत प्रयोगांच्या तुलनेने मांडतात, हे वर निदर्शनास आणलेच आणले आहे. या संदर्भात त्यांनी उद्धृत केलेली 'क्रमादमुं नारद इत्यबोधि सः', 'अवैमि चैनामनघेती', 'सूर्ये अस्तं गच्छति सति', 'रूदति पुत्रे (रूदतो वा पुत्रस्य) पिता प्राव्राजीत्', 'मा मेति व्याहरत्येव तस्मिन् पातालमभ्यागात्' इत्यादी वचने लक्षणीय आहेत. असा तुलनेचा प्रसंग नसतानाही ते अधूनमधून 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी', 'वादे वादे जायते तत्वबधः', 'काचः काचो मणिर्मणिः', 'अस्माकुणां नैयायिकानां

अनुक्रमणिका

अर्थरि तात्पर्यं न तु शब्दरि', 'यद् रोचते तद् ग्राह्यम्' अशी संस्कृत वचने हौसेने उद्धृत करतात. गरजेनुसार त्यांनी नव्या संस्कृत संज्ञा बनवून वापरल्याचे मागे सांगितलेच आहे. याखेरीज संस्कृत शास्त्रवाङ्मयात रूढ असलेल्या अन्यही काही खास संस्कृत संज्ञा त्यांनी प्रसंगपरत्वे योजलेल्या आहेत. जसे : प्रवृत्तिनिमित्त, अव्याप्ति, अतिव्याप्ति, लक्षण (=व्याख्या, 'व्याख्या', हीही संज्ञा त्यांनी पुष्कळदा योजली आहे), विशेष्यनिघ्न, अन्योन्याश्रय, आतिशय्यवाचक, भविष्यत्संभव, क्रियासंतति, संधी, तद्धित आणि समास इत्यादींच्या विवेचनात तर संस्कृत उदाहरणे खच्चून आली आहेत. त्याचा मासला : 'गुरूरु, भुर्जित, तवल्कार, बुद्ध्यूर्मि, व्श्रव्श्रार्थ, गुर्विच्छा, मात्रिच्छा, ने+अन=नयन, अच्+आदि=अजादि, भगवड्डमरू, भूभृढ्डक्का, मत्+शर=मच्छर, अहर्मुख, अधश्छवि, रामष्टीकते, अयस्कार, पुनारक्षण; शुनी, कवयिता, रुद्राणी..., मत्सी, क्षत्रियी; सोमपा, शंखध्मा, धूम्रपा, वर्षाभू, प्रतिभू, खलपू; अस्मभ्दाग्य, पूर्वकाय, पश्यतोहर, खेचर, विधुंतुद, उरग, उत्तमर्ण, अधिज्यधन्वा, रेवतीजानि, स्त्रीपुंसी.' 'सुवासिनी' शब्दाचे मूळ म्हणून त्यांनी 'सुवासिन्' असा पुलिंगी शब्द दिला आहे; तो माझ्या तरी वाचनात नाही.

दामल्यांचे व्याकरणविवेचन याप्रमाणे संस्कृताच्या अध्यक्षतेने होत असले तरी दामले संस्कृतपंडित होते असे समजण्याचे कारण नाही. त्यांचे संस्कृताचे ज्ञान त्यांनीच एकदोनदा उद्धृत केलेल्या 'आपटेज् गाईड'पलीकडे असावे असे वाटत नाही. संधीसारख्या प्राथमिक विषयात त्यांना कृष्णशास्त्री गोडबोल्यांचा हवाला देण्याची आवश्यकता वाटली आहे; प्रयोजक धातूंसाठी कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या आधाराची गरज लागली आहे. संस्कृतविषयक माहितीत त्यांनी कित्येक ठिकाणी चुका केल्या आहेत. 'मूत्र, गोत्र, कलत्र, पौत्र, छात्र' हे शब्द त्र-प्रत्ययान्त म्हणून दिले आहेत; समासात पूर्वपदाच्या विभक्तीचा लोप होण्याच्या नियमाला 'संस्कृतात एकही अपवाद नाही' म्हणून ते सांगतात, आणि स्वतःच पुढे 'अलुक् समास' देतात; 'यथाकालोचित' आणि 'व्यर्थ' हे समास ते अव्ययीभावात दाखल करतात; 'घातक' हा त्यांच्या मते उपपद-तत्पुरुष आहे; 'एकशेष' हा द्वंद्वाचा प्रकार आहे; संबोधन ही स्वतंत्र विभक्ती आहे; 'गतया तया, गतायाः तस्याः' असे प्रयोग संस्कृतात होत नाहीत. आपल्याला जे येत नाही त्याची प्रांजळपणे कबुली त्यांनी अन्य गोष्टींच्या बाबतीत पुष्कळदा दिली आहे; तशी संस्कृताच्याही बाबतीत दिली असती तर बऱ्याच चुका टळल्या असत्या. पण मराठीच्या व्याकरणासाठी संस्कृताचे ज्ञान अपरिहार्य आहे,असे राजवाड्यांप्रमाणे दामलेही समजत असल्यामुळे त्यांनी या चुकांना आणि राजवाड्यांच्या टीकेतील एका मुद्याला आपल्या हाताने दार उघडून ठेवले.

४.
टीकाकार

दामल्यांच्या व्याकरणाचे टीकाकार मुख्यत: दोन : राजवाडे आणि सबनीस. राजवाड्यांनी दामल्यांच्या व्याकरणाचे परीक्षण 'तिङन्तविचार' आणि 'सुबंतविचार' या दोन निबंधांमध्ये १९१२ साली, आणि सबनिसांनी 'आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण' या ग्रंथात १९५१ साली केले आहे. यांपैकी राजवाड्यांनी केलेले परीक्षण दामल्यांच्या पाहण्यात आले होते. त्याला ते काही उत्तरही देणार होते. (असे त्यांचे चिरंजीव लिहितात); पण त्यापूर्वीच त्यांच्यावर मृत्यूने झडप घातली. सबनीसांचे परीक्षण दामल्यांच्या दृष्टीला येणेच शक्य नव्हते. या दोघांचेही देणे दामल्यांच्या वतीने त्यांच्या पदरात टाकण्याचे काम आता करावयाचे आहे.

राजवाड्यांचे आक्षेप

राजवाड्यांनी दामल्यांवर जे मुख्य आक्षेप घेतले आहेत ते त्यांची शिवीगाळ गाळून असे सांगता येईल :

मराठीचे व्याकरण रचता येण्यासाठी राजवाड्यांच्या मते वैयाकरणाची काही मूलभूत तयारी असावयास हवी. 'व्याचिकीर्षु हा शब्देतिहासज्ञ नैरुक्त हवा'. म्हणजे भाषेतील शब्द त्यांच्या मूळ रूपांतून कसकसे बदलत वर्तमान रूपांपर्यंत पोचले, हे - म्हणजे सर्व शब्दांची व्युत्पत्ती, गणगोत - त्याला माहित असावयास हवे. हे माहीत होण्यासाठी त्याला वैदिक, संस्कृत, प्राकृत आणि जुने मराठी यांचे व्याकरणशास्त्र अवगत हवे.दामल्यांना यांतले काही येत नाही.

या तयारीनंतर मराठी शब्दांचे समग्र अवलोकन आणि वर्गण (=वर्गीकरण) ही अवस्था येते. हे काम दामल्यांना मुळीच साधलेले नाही; किंबहुना मराठी भाषेचे पूर्ण अवलोकनच अद्याप झालेले नसल्यामुळे वर्गण आणि नियमपरंपरा यांची अद्याप वेळच आलेली नाही. या बाबतीतली दामल्यांची न्यूने राजवाडे दाखवतात, त्यांचे काही नमुने असे : 'स्वर' आणि 'व्यंजने' हे व्याकरणाला निरुपयोगी असलेले गट आणि त्यांची लक्षणे दामल्यांनी इंग्रजी वैयाकरणांच्या गचाळ लक्षणांवरून घेतली आहेत. 'घरचें घर, रामाचें घर' यांतले च हे सर्वनाम दामल्यांना ओळखता आलेले नाही. 'चा' या नाम-विशेषणसाधक प्रत्ययाला त्यांनी षष्ठी विभक्ती म्हटले आहे. 'वाघ गाईस (द्वितीया) मारितो, गाईस (चतुर्थी) गवत, राम मुलगी (प्रथमा) समरितो (यात स हा उपसर्ग,-'गति')', इत्यादी ठिकाणी त्यांना रूपांचा विवेक करता आलेला नाही. आणखी मुळात गेल्यावर मराठीत प्रथमा आणि द्वितीया (म्हणजे इतरांचे 'सामान्यरूप') एवढ्या दोनच विभक्ती उरतात, हे त्यांना उमगले नाही. सर्वनामांचा निकष 'शेषकार्य' हा आहे; तो त्यांना सापडला नाही. कोणतर (कतर), कोणता (कतम), तो तो (ततम), इत्यादी तरतमभावबोधक रूपांच्या त्यांनी व्युत्पत्तिज्ञानाभावी भलत्याच उपपत्ती लावल्या. 'मला वाचणेस येते' (मया वाचनीयं ज्ञायते), 'मी जाऊ शकतो' (मया यातु: शक्यते), यांत 'वाचणेस, जाऊ' ही कृदन्त नामे आहेत, हे त्यांना कळले नाही. दामल्यांचे 'संयुक्त क्रियापद' ही इंग्रजीतून आयात झालेली भ्रांती आहे. 'मी जात आहे' यातले 'जात' हे 'मी'चे विशेषण दामल्यांनी संयुक्त क्रियापदाच्या खाती जमा केले आहे. 'विवाह केलेला मुलगा' यात 'विवाह-केलेला' या समासाचे 'अवलक्षण' (=ओळखणे) यांना करता आले नाही. 'पुन: शिवाजी जन्मता

तर सुकाळ होता' यातील 'जन्मता' आणि 'होता' ही 'अनद्यतनभविष्यति लुट्'ची रूपे आहेत. ती दामले संकेतार्थाची मानतात. दामल्यांनी णे-आख्यात ('आज तुम्ही जाणे') आणि च-आख्यात ('तो जायचा') सांगितलेले नाही. दामल्यांच्या व्याकरणात धातुपाठ नाही.

वर्गणानंतर - नियम - शास्त्र बांधण्याची अवस्था येते. 'शास्त्र म्हणजे सामान्य सिद्धान्तांची परंपरा...प्रथम अत्यंत सामान्य कार्यांचा शोध करावयाचा; नंतर त्याहून कमी सामान्य कार्यांचा...; आणि शेवटी सर्वांहून कमी व्यापक अशा सामान्य कार्यांचा... आणि सरतेशेवटी जेथे सामान्य कार्य सापडत नाही, तेथे निपात करावयाचा. ...ह्या पाणिनीय धर्तीवरच मराठी व्याकरणशास्त्राची इमारत उभारिली पाहिजे.' या दृष्टीने राजवाड्यांच्या मते पाणिनीची अष्टाध्यायी हाच शास्त्रग्रंथ आहे; सिद्धांतकौमुदी हा शास्त्रग्रंथ नाही, कलाग्रंथ आहे. दामल्यांनी आपला ग्रंथ कौमुदीच्या धर्तीवर रचला आहे. तेव्हा 'शास्त्रसरणीसंबंधाने...व्याकरणशास्त्रात दामले कोठे च नाहीत. उत्सर्ग व अपवाद कसे रचावे ह्यांचे स्वप्नही दामल्यांना नाही.' 'बहुतेक नियमांना काही हा शब्द जोडलेला दामल्यांच्या ग्रंथात हमेशा आढळतो. नियम म्हणजे निश्चित वस्तूसंबंधाने निश्चित विधान करणे. दामल्यांचे सर्व नियम अनिश्चित वस्तुसंबंधाचे आहेत. ह्यांना नियम हा शब्द कोणत्या न्यायशास्त्राच्या कोणत्या परिभाषाप्रकरणात सांगितला आहे?'

राजवाड्यांच्या आक्षेपांचा परामर्श

या आक्षेपांचा आता क्रमशः विचार करावयाचा आहे. ऐतिहासिक व्युत्पत्ती हे शब्दांच्या वर्गीकरणाचे यंत्र आहे, हे राजवाड्यांचे मत विवाद्य आहे. 'घडा' या शब्दाचे अथवा त्याच्या रूपाचे व्याकरण सांगता येण्यासाठी तो शब्द 'घट' या संस्कृत शब्दापासून 'घड' या प्राकृत रुपांतराच्या द्वारे आला आहे, या ज्ञानाची खरोखर काय आवश्यकता आहे? हे ज्ञान असल्याने या शब्दाच्या व्याकरणात काय भर पडणार आहे? किंवा नसल्याने काय न्यून राहणार आहे? राजवाड्यांना हे मान्य आहे की, 'वर्तमान मराठी भाषेचे व्याकरण रचताना, त्यात शब्दांचा व प्रत्ययांचा व रूपांचा इतिहास देणे अप्रस्तुत आहे.' तरी त्यांचे म्हणणे आहे की, 'वैयाकरणाने तो जाणणे अत्यंत आवश्यक आहे.' जे व्याकरणात अप्रस्तुत आहे तेही वैयाकरणाने जाणणे आवश्यक असेल, तर आणखी बऱ्याच अप्रस्तुत विषयांचे ज्ञान त्याला आवश्यक का मानू नये? मुद्दा असा आहे की, उपयोगी पडणे वेगळे आणि आवश्यक असणे वेगळे. हा विवेक करून लक्ष्यभूत कार्याचे कारण - म्हणजे 'कार्यनियतपूर्ववृत्ति- काय आहे, 'अन्यथासिद्ध' काय आहे, 'यदृच्छापूर्ववृत्ती' काय आहे, हे निर्धारित केले पाहिजे. या दृष्टीने पाहता मराठीचे व्याकरण रचता येण्यासाठी फक्त मराठीचे ज्ञान हे असाधारण कारण, आणि शास्त्रपद्धतीचे ज्ञान हे साधारण कारण,- एवढीच आवश्यक म्हणून सांगता येतील. राजवाड्यांचा 'वैयाकरणसूर्य' जो पाणिनी, त्याला तरी संस्कृतपूर्व सर्व अवस्थांचे पूर्ण ज्ञान होते,- म्हणजे युरो-भारतीय भाषावस्था माहीत होती, अवेस्ताची भाषा येत होती, ग्रीक-लॅटिन भाषा अवगत होत्या, लिथुआनियन भाषा कळत होती, याला काय प्रमाण आहे? त्याला वेदभाषा येत होती एवढे मान्य होईल. पण त्यामुळे त्याच्या संस्कृताच्या विवरणात काय भर पडली? 'गन्तुम्, गन्तवे, गन्तोः' इत्यादी मुखवट्याची रूपे वेदांत आलेली पाहून त्याला त्यांतली 'गन्तु' ही प्रकृती आणि पुढे लागलेले विभक्तिप्रत्यय नक्कीच ओळखू आले असतील. तरी तो संस्कृतात 'गन्तुम्' हे 'गन्तु'चे द्वितीया एकवचनाचे रूप म्हणून न सांगता 'तुम्' प्रत्ययान्त अव्यय म्हणून सांगतो, ते काय उगाच? आता पुढे प्रश्न असा की, 'गन्तुम्' हे शेवटी तुमन्त अव्यय म्हणूनच जर सांगावयाचे असेल, तर त्यासाठी वेदांतले 'गन्तु' हे नाम माहित असून-नसून काय फरक पडणार आहे? तेव्हा वैयाकरणाला ऐतिहासिक व्युत्पत्तीचे ज्ञान आवश्यक म्हणता येणार नाही.

कदाचित हे ज्ञान त्याच्या व्याकरणकार्यात विघ्नभूतही ठरेल. तसे ते राजवाड्यांच्या बाबतीत ठरले आहे. प्रसिद्ध भाषाभिज्ञ ब्लूमफील्ड म्हणतो :

'In order to describe a language, one needs no historical knowledge whatsoever; in fact, the observer who allows such knowledge to affect his description is bound to distort his data.' [LANGUAGE, p. 19-20]

ब्लूमफील्डने दाखविलेला हा धोका राजवाड्यांनी आपल्या व्याकरणविषयक उपपत्तींनी प्रत्यक्षात उतरवून दाखवला आहे. उदाहरणार्थ : 'रामाने मुलगीला मारिली' म्हणजे त्यांच्या मते 'रामाने मुलगी लामारिली.' असली विलक्षण उपपत्ती सांगून राजवाड्यांनी व्युत्पत्तिज्ञान (तेही येथे खरे नाही.) व्याकरणाला मारक असल्याचेच सिद्ध केले आहे. या उदाहरणातला पदक्रम बदलल्यावर जे वाक्य बोलण्यात येते, - समजा, 'मुलगीला रामाने मारिली'- ते पाहताच 'लामारिली' हे एक पद असल्याचा राजवाड्यांचा स्वैर व्युत्पत्तीवर आधारलेला दावा किती फुसका आहे ते तत्काळ कळून येते. राजवाड्यांच्या या आक्षेपाचे दामल्यांना आधीच स्वप्न पडले असावे. म्हणूनच त्यांनी 'व्युत्पत्ती' या प्रकरणात सुरवातीलाच सांगून टाकले की, एका भाषेतून दुसऱ्या भाषेत शब्द कसा आला या स्वरुपाची व्युत्पत्ती व्याकरणात अप्रस्तुत आहे.

याप्रमाणे राजवाड्यांचे मूळ गृहीतच विवाद्य असल्यामुळे त्याच्या आधारावर त्यांनी दामल्यांच्या वर्गणावर जे आक्षेप घेतले आहेत, आणि जी नवी वर्गणे सुचवली आहेत, त्यांतला वारा निघून जातो. त्यांनी मांडलेले मुद्दे (स्वर-व्यंजनविभागाची अनावश्यकता, 'शेषकार्य' हा सर्वनामत्वाचा निकष, मराठीत दोनच विभक्ती, 'संयुक्त क्रियापदा'ची अनावश्यकता, धातुपाठाची आवश्यकता इत्यादी) मूलगामी आहेत, विचारणीय आहेत, यात शंका नाही. पण म्हणून त्यांनी केलेली सगळी उलथापालथ ग्राह्य ठरत नाही. त्यांनी सुचवलेल्या काही गोष्टी तर उघड उघड भ्रममूलक आहेत. याचा अर्थ दामल्यांनी सांगितलेले सगळे बरोबर आहे असा नाही. त्यांच्याही चुका झाल्या आहेत. पण राजवाड्यांच्या चुका त्यांच्याहून जास्त आहेत, मोठ्याही आहेत. राजवाड्यांच्या काही व्युत्पत्त्यांना तर त्यांच्या कल्पनेखेरीज अन्य काही प्रमाण नाही. 'रामाने मुलगीला मारिली' यात 'लामारिली' हे एक पद मानण्यास त्यांनी काहीही पुरावा दिलेला नाही. 'वाचणेस' हे 'वाचनीयं' वरून कसे आले, विशेषत: 'य' चा 'स' कसा झाला, याला त्यांच्याकडे काही पुरावा नाही. अशा या त्यांच्या व्युत्पत्त्याच डळमळीत राहिल्यावर त्यांच्या आधारावर उभी केलेली त्यांची 'अवलक्षणे' कशी ग्राह्य होतील? त्यांच्या व्युत्पत्त्या जेथे बरोबर असतील तेथेसुद्धा 'अवलक्षण' त्यांच्यावर विसंबून ठेवणे बरोबर नाही, हे मागे सांगितलेच आहे.

राजवाड्यांनी दामल्यांच्या व्याकरणातील मांडणीबद्दल जे म्हटले आहे ते मात्र खरे आहे. दामल्यांनी बांधलेल्या नियमांत 'काही, प्राय:, बहुधा' इत्यादी शब्द 'हमेशा' आढळतात.अशा मोघम विधानांना काटेकोरपणे 'नियम' म्हणता यावयाचे नाही हे खरे आहे.यासाठी प्रत्येक शब्द तपासून, त्याची प्रवृत्ती पाहून त्याला योग्य गटात दाखल करणे आवश्यक आहे. हे काम फार मोठे आहे; आणि ते पूर्ण होईल अशी अवस्था येणे भाषेचा स्वभाव आणि व्याप्ती लक्षात घेता कठीण आहे.नुसती प्रमाण भाषा घेतली तरी देशकालकृत, उद्योगव्यवसायकृत असे सर्व फरक निरपवादपणे नोंदवणे हे बिकट काम आहे. 'जोपर्यंत भाषेस स्थैर्य आले नाही तोपर्यंत व्याकरण संदिग्धच राहणार' असे म्हणून दामल्यांनी हीच अडचण मांडली आहे. राजवाड्यांच्या 'व्याकरणसूर्या'नेदेखील - म्हणजे पाणिनीने - 'बहुलम्' असे ठिकठिकाणी म्हणून

आणि ‘आकृतिगण’ नावाचे लवचिक शब्दगण कल्पून या बारीकसारीक गोष्टींच्या पुढे आपण हात टेकल्याचीच कबुली दिली आहे. ही राजवाड्यांच्या ‘शास्त्र’कल्पनेत बसत असेल तर तितपत सवलत दामल्यांनाही द्यावयास हरकत नाही. यात पाणिनीच्या पंक्तीला दामल्यांना बसवण्याचा हेतू नाही; भाषाभ्यासाचे क्षेत्र कसे अनंत आहे हे दाखवावयाचे आहे.

दामल्यांचा ग्रंथ सिद्धांतकौमुदीसारखा आहे, अष्टाध्यायीसारखा नाही, हेही खरे आहे. पण म्हणून तो शास्त्रग्रंथ नाही, हे मात्र खरे नाही. शास्त्रग्रंथांचे अनेक प्रकार असतात; शैलीही विविध असतात. राजवाडे म्हणतात तशी बांधणी सुत्रशैलीच्या कार्यानुरोधी ग्रंथांची असते; चर्चात्मक शैलीच्या प्रकरणानुरोधी ग्रंथांची नसते. उपयोग या दोन्ही प्रकारच्या ग्रंथांचा असतो. राजवाडे म्हणतात तशी मांडणी ब्रह्मसूत्र, मीमांसासूत्र इत्यादी ग्रंथांत ते ग्रंथ सूत्रशैलीचे असूनही आढळत नाही. ते सर्व ग्रंथ अशास्त्रीयच काय? विषयांच्या गटांमध्ये शब्द विभागून देणारा ‘अमरकोश’ हाच तेवढा कोश, वर्णानुक्रमाने शब्द देणारा कोश हा कोश नव्हे, तो शास्त्रीय नव्हे, असे म्हटले तर चालेल? मग राजवाड्यांनी स्वत: केलेल्या अशा कोषांची वाट काय? ग्रंथाची मांडणी काय, अधिकारि-विषय-प्रयोजनांच्या अनुरोधाने आणि ग्रंथकाराच्या रुचीप्रमाणे बदलते. तेव्हा जी मांडणी करण्याचा दामल्यांचा हेतूच नव्हता ती त्यांच्यावर बळाने लादून दोष देण्यात काय अर्थ आहे?

राजवाड्यांनी ‘तिङतविचारा’त एका ठिकाणी म्हटले आहे : ‘अडाणी वैयाकरण व्याकरण लिहिण्याला व देशात त्या काली चिकित्सक तज्ञ नसण्याला जर गाठ पडली, तर मोठे अनहित होते. ते कोणते तर व्याकरणशास्त्राची प्रगती खुंटते. दादोबापासून दामल्यांपर्यंत गेल्या पाऊणशे वर्षात, असा काही प्रकार झाला की काय हे निर्भीडपणे सांगण्याचे काम एखाद्या भविष्यत् तज्ञावरच सोपविणे बारे.’ राजवाड्यांची ही अपेक्षा सर्वस्वी अनाठाई होऊ नये, म्हणून खुद्द राजवाड्यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची ही दुर्जनता पदरी घ्यावी लागली. राजवाडे मला त्याबद्दल क्षमा करतील अशी अशा आहे.

सबनिसांचे आक्षेप

हे दामल्यांवरील राजवाड्यांचे आक्षेप झाले. सबनिसांचा आक्षेप मुख्यत: असा की, दामल्यांनी आपल्या व्याकरणात व्याकरणबाह्य विषय फार आणले आहेत; त्यांच्या ‘एक हजार पानांच्या पुस्तकातून व्युत्पत्तिशास्त्र, ध्वनिशास्त्र, छंद:शास्त्र कोश, प्रबंधशास्त्र यांसंबंधीच्या फाजील मजकुरावरील सात-आठशे पाने काढून टाकली, तर निव्वळ व्याकरणाविषयी शेदोनशे पाने राहतील की काय याची वानवाच आहे!’ वर निर्देशिलेले व्याकरणबाह्य विषय मराठी व्याकरणात संस्कृत व्याकरणातून आल्याची माहिती सबनीस देतात. ‘कुंपणाने शेत खावे त्याप्रमाणे ह्या शास्त्रांचे व्याकरणावर आक्रमण झाले आहे. ...बिंदू कोणत्या शब्दावर असावा याची चर्चा व्याकरणात करण्याची मुळीच जरुरी नाही...तसेच द्वितीया, तृतीया, षष्ठी इत्यादी विभक्तीचे प्रत्यय कसे झाले या चर्चेला व्याकरणात स्थान नाही. तो व्युत्पत्तिशास्त्राचा विषय आहे...या दृष्टीने पाहिले तर राजवाड्यांचे ‘ज्ञानेश्वरीचे व्याकरण’ हा व्याकरणग्रंथ असे म्हणताच येणार नाही...तथापि ह्या ग्रंथाने व्याकरणविषयक वाङ्मयात एक महत्वाची भर पडली, असे दामले गंभीरपणे सांगतात!’ व्याकरणात ढीगभर उदाहरणे देणे हेही सबनिसांच्या मते अनावश्यक आहे. ‘कोणतीही रूपे न देता व्याकरण लिहिता येईल;’ कारण ‘व्याकरणात रूपे नियमसिद्धीसाठी असतात; रूपसिद्धीसाठी नियम नाहीत.’ आपल्या या मताशी इमान राखण्यासाठी सबनिसांनी आपल्या व्याकरणात अनेक ठिकाणी नियमांची उदाहरणे शोधण्याचे काम वाचकावरच सोपवले आहे.

सबनीसांचा दुसरा मोठा आक्षेप असा आहे की, 'प्रयोगशरणा: वैयाकरणा:' हे तत्त्व दामल्यांनी चुकीच्या अभिप्रायाने स्वीकारून दादोबादी जुन्या वैयाकरणांवर अन्याय्य टीका केली. यातल्या 'प्रयोग' या शब्दाचा अर्थ सबनिसांच्या मते 'व्याकरणसिद्ध रचना' असा आहे; तो दामले वगैरे मंडळींनी 'usage' म्हणजे बोलण्याचा प्रचार असा चुकीचा घेतला. यामुळे 'त्याने मुलीस निजविली' असले दादोबादिकांनी अग्राह्य ठरवलेले व्याकरणदुष्ट प्रयोग त्यांनी ग्राह्य ठरवले. सबनिसांच्या मते 'प्रयोग (usage) काहीही असो,... व्याकरण सांगताना 'निजविले' हेच रूप धरून 'भावे प्रयोग' म्हणून सांगावे. 'अंघोळ केलो, असे कोणी म्हणतील, ते सुखे म्हणोत; पण व्याकरण सांगताना तो अशुद्ध असे समजून अंघोळ केली असे समजूनच कर्मणिप्रयोग म्हणून सांगितला पाहिजे.' 'बोलण्याचा प्रचार' अशा अर्थाने 'प्रयोग' हा शब्द घेतला तरी 'प्रयोग शिष्टमान्य असला पाहिजे' अशी अट घालून सबनीस बजावतात की, 'प्रौढ भाषेत लिहिताना दादोबांसारख्या भाषाशास्त्रज्ञशिष्टांना संमत असलेले प्रयोगच स्वीकारणे योग्य होईल.' आणि 'शिष्ट' कोण? तर 'शिष्ट' म्हणजे...संस्कृत न्यायशास्त्रात ज्याला 'आप्त' म्हणजे 'यथार्थ वक्ता पुरुष' असे म्हटले आहे तो होय.' या धोरणाने सबनिसांनी असेही म्हटले आहे की, 'बोली (म्हणजे बोलण्यातली भाषा) ही व्याकरणापूर्वी असली तरी खरी (म्हणजे अभिजात लिखित वाङ्मयातील) भाषा व्याकरणानंतरच विकसित होते.' अर्थात या 'खऱ्या' भाषेच्या बाबतीत व्याकरण हे धर्मशास्त्राप्रमाणे 'प्रभुसंमित उपदेश' करणारे - म्हणजे normative, 'यथादर्श'- शास्त्र होय. ते 'अस्ति'मुख नाही, तर 'अस्तु'मुख आहे; वर्तमानकाळी नाही, आज्ञार्थी आहे.

सबनिसांच्या मते दामल्यांनी आपला ग्रंथ रचताना पाणिन्यादी व्याकरणकारांची सूत्रपद्धती न अनुसरता मरे, बेन, हॉवर्ड इत्यादिकांच्या व्याकरणांतून आढळणारी विवेचने, ऊहापोह, व्याख्या, वर्गीकरण इत्यादी विशेषांना युक्त अशी आधुनिक तर्काधिष्ठित पाश्चात्त्य पद्धती अनुसरली, हे चांगलेच झाले. पण असे करूनही त्यांनी संस्कृत व्याकरणातील 'लट्, लिट्, लुट्चे आधुनिक अवतार लाख्यात, ताख्यात इत्यादी जणो काय अभ्यासकाचा मार्ग अधिक खडकाळ करण्यासाठीच मराठी व्याकरणात घुसविलेले' आहेत, त्यांचा सबनिसांनी निषेध केला आहे. 'राजवाड्यांनी तर आपल्या तथाकथित 'ज्ञानेश्वरीच्या व्याकरणा'त ह्या लट्, लोट्चा कडेलोट केलेला दिसतो.' आपल्या या मताच्या पुष्ट्यर्थ सबनिसांनी वामन मल्हार जोशांचा एक शेराही उद्धृत केला आहे : 'व्याकरण साम्राज्यातील संज्ञारुपी नोकरशाहीच्या ताब्यात आपण इतके गेलो अहो की आता एक वेळ राजकीय स्वातंत्र्य मिळेल, पण व्याकरणात्मक मिळणे दुरापास्त.'

सबनिसांच्या आक्षेपांचा परामर्श

व्याकरणबाह्य विषय व्याकरणात येऊ नयेत, हे सबनीसांचे म्हणणे न्याय्य आहे. स्वत: दामल्यांनीही 'वाक्प्रचार, अलंकार, वृत्ते' इत्यादी विषय व्याकरणबाह्यच ठरवले आहेत. असे जे विषय दामल्यांच्या व्याकरणात आले असतील त्यांबद्दल त्यांना दोषी धरण्यास हरकत नाही. शब्दांच्या लिंगांविषयीचे नियम, 'वाक्यपृथक्करण' इत्यादी विषय हे अंशत: अशा प्रकारचे म्हणता येतील. पण प्रत्ययानुरोधाने लिंगव्यवस्था सांगणे व्याकरणबाह्य नाही. अशी व्यवस्था सांगणारे 'लिंगानुशासन' पाणिनीय व्याकरणाला परिशिष्ट म्हणून जोडलेले असतेच. विशिष्ट प्रत्ययांच्या किंवा व्याकरणकार्यांच्या अनुरोधाने केलेल्या शब्दांच्या गटवार याद्या हाही व्याकरणबाह्य विषय नव्हे; पाणिनीय व्याकरणाला जोडलेला गणपाठ, धातुपाठ ही परिशिष्टे अशाच स्वरुपाची आहेत. ही परिशिष्टे म्हणजे पाणिनीची सूत्रे नव्हेत; पण यांच्या अभावी पाणिनीची बरीच सूत्रे अर्थशून्य होतील. एकाच नियमाच्या विवरणासाठी आलेली अनेक उदाहरणे ही अशा गणपाठाचा भाग म्हणता येणार नाहीत; हा टीकेचा भाग ठरेल. अशी उदाहरणे दामल्यांच्या व्याकरणात बरीच आहेत. पण त्यामुळे त्यांचे व्याकरण अशास्त्रीय न ठरता सटीक ठरेल;- म्हणजे दामल्यांच्या व्याकरणाचे सूत्रकार,

वृत्तिकार (म्हणजे टीकाकार) खुद्द दामलेच ठरतील. आता त्यांच्या व्याकरणातला सूत्रात्मक भाग कोणता, वृत्तीचा कोणता, हे ठरवण्याचा खटाटोप ज्यांना कुतूहल असेल त्यांनी करावा. प्रयोगविचारापलीकडे वाक्यपृथक्करण हा विषय व्याकरणाच्या मर्यादेबाहेरचा आहे, हे खरे आहे. हा विषय आपल्या ग्रंथात समाविष्ट करून दामल्यांनी 'शास्त्रीय व्याकरणा'त शास्त्रालाच अडचण केली आहे. ध्वनिशास्त्र आणि छंद:शास्त्र यांच्या कक्षांतले कोणते विषय दामल्यांच्या व्याकरणात शेकडो पाने आले आहेत, हे सबनिसांनी स्पष्ट केलेले नाही. हे सर्व विषय कमी केले असता दामल्यांच्या व्याकरणाची शेदोनशे पानेच कशी राहतात, याचाही त्यांनी हिशेब दिलेला नाही.

भाषा आणि व्याकरण यांचा अन्योन्य संबंध तसेच वैयाकरणाला प्रमाणभूत असलेला प्रयोग यांविषयी सबनीसांची कल्पना काही विलक्षणच आहे. 'बोली' (म्हणजे बोलण्यातली भाषा असे समजू.) ही त्यांच्या मते खोटी भाषा आहे; आणि वाङ्मयात योजली जाणारी भाषा ही खरी भाषा असून ती व्याकरणामुळे निर्माण आणि नियमित होते, असे ते समजतात. म्हणजे असे की, बोलीचे अवलोकन करून (असे समजू; सबनीस तसे म्हणत नाहीत.) वैयाकरण त्यांतले ग्राह्य काय ते ठरवतो; हा ग्रह्यांश म्हणजे खरी भाषा. ती ग्रंथकार वैयाकरणांकडून शिकतात आणि तीत आपले ग्रंथ लिहून काढतात. अर्थात वैयाकरणाला अग्राह्य वाटणारी रचना करण्याचा अधिकार त्यांना नाही. व्याकरणनियमांना धरूनच त्यांनी रचना करावी. आणि वैयाकरणांनीसुद्धा नियमांना अनुसरणारीच रचना (हिलाच 'प्रयोग' म्हणतात.) हिशेबात घ्यावी; अन्य घेऊ नये. प्रयोग म्हणजे 'भाषाप्रचार' असा अर्थ मानला (तसा तो वस्तुतः नाही.) तरी ही भाषा दादोबादी शिष्टांना संमत असलेली अशीच घ्यावयास हवी; तरच वैयाकरणाची 'प्रयोगशरणता' समर्थिता येईल.वाटेल त्या 'उपटसुंभा'च्या भाषाप्रयोगापुढे वैयाकरणाने लोटांगण घालावे, असे कसे म्हणता येईल? दामल्यांसारखे लोक असल्या उपटसुंभांचे व्याकरणनियमांविरुद्ध असलेले भाषाप्रचार शिरोधार्य मानून दादोबांसारख्या शिष्टांना वेळोवेळी चापतात, याचा सबनिसांना राग येतो.

सबनीसांचे हे सर्व प्रतिपादन त्यातल्या शुद्ध तर्कदृष्टतेसाठी कौतुक करण्यासारखे आहे. मुळात बोलण्यातली भाषा खोटी समजणे म्हणजे व्याकरणाचा आधारच काढून घेणे होय. बोलण्यातला प्रचार गुंडाळून ठेऊन वैयाकरण नियम बांधणार, तो कशाला प्रमाण मानून? आपल्या लहरीला? व्याकरणनियम व्याकरणकाराच्या (?) लहारीने ठरतात, असे सबनीस समजत असतील तर त्यांना इतर वैयाकरणांच्या मतांचे खंडन करण्याचे काही कारण नाही. (ते त्यांनी केले आहे.) आणि वैयाकरणाच्या लहरीखेरीज नियामक तत्त्व व्याकरणाला काही असेल, तर ते बोलण्यातल्या भाषेहून अन्य कोणते असू शकेल? व्याकरणाचे नियम वैयाकरण आपल्या कल्पनेतून तर काढत नाही ना? मग ज्या भाषेतले काही प्रयोग (म्हणजे usage) प्रमाण मानून तो नियम बांधतो, त्याच भाषेतले अन्य प्रयोग याच नियमांच्या आधाराने अप्रमाण ठरवण्याचा त्याला काय अधिकार आहे? प्रयोग म्हणजे सबनिसांच्या अर्थाने व्याकरणनियमानुरोधी रचना - ती वैयाकरणाने ठरवावयाची, आणि तिला कौल लावून त्याने इतर रचना अग्राह्य ठरवावयाच्या, म्हणजे कायदा करण्याचा, त्याचा अर्थ लावण्याचा, आणि फाशी देण्याचा अधिकार एकच व्यक्तीकडे देण्यासारखे आहे.सबनिसांना भिती प्रमाणभाषेच्या व्याकरणात उपभाषेतील किंवा प्रामादिक प्रयोग संमत होण्याची वाटत असावी; म्हणून त्यांनी शेवटी 'दादोबा सांगतील ते ऐकू' असा पवित्रा घेतला आहे. सबनिसांनी ही मोठीच जोखीम अंगावर घेतली आहे. 'त्याणे आपल्या बायकोला घरी ठेविली' (महाराष्ट्र भाषेचे व्याकरण - दादोबा पांडुरंग तर्खडकर, आवृत्ती २(१८३६) : ३३९) हा प्रयोग नापसंत करणारे दादोबा स्वत:च 'प्रस्तावने'त '...जी ही मराठी भाषा तिला, काही तरी नियमात आणावी...' (महाराष्ट्र भाषेचे व्याकरण - दादोबा पांडुरंग तर्खडकर, आवृत्ती २; १८३६ : ०९) असा तसलाच प्रयोग करतात, हे जर

सबनिसांना समजले असते तर त्यांनी कदाचित ही जोखीम अंगावर घेतली नसती. वरीलपैकी कोणते दादोबा त्यांना प्रमाण आहेत? निर्दिष्ट प्रयोग नापसंत करणारे की तसाच प्रयोग स्वत: करणारे? दादोबांनी वर उद्धृत केलेले वाक्य लिहून जणू असेच सिद्ध केले आहे की –

'यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।'
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति।। (भगवद्गीता १८.५९)

एकूण, दादोबांनी स्वत:च स्वत:चे खंडन केले आहे. ही गोष्ट क्षणभर बाजूला ठेऊन 'दादोबा सांगतील ते ऐकवयाचे' ठरवले, तरी दादोबा सांगणार ते तरी कशावरून, हाच मुळात प्रश्न आहे. आणि दादोबांनी सांगितले आहे (जसे : स्त्रीलिंगी 'जात्ये' इत्यादी रूपे), त्याहून वेगळे जे सबनिसांच्या स्वत:च्याच व्याकरणात आहे, त्याचे समर्थन ते कसे करणार आहेत? भाषाव्याकरणसंबंधाविषयी असल्या भोंगळ, भाबड्या कल्पना 'उच्चतर' क्षेत्रांतही अद्याप प्रचलित असाव्या, ही आश्चर्याची गोष्ट आहे. सबनीस ज्यांना गुरुस्थानी मानतात त्या गुंजीकरांचे लिखाण जरी त्यांनी डोळे उघडून पाहिले असते तरी त्यांचा भ्रमनिरास झाला असता. गुंजीकर म्हणतात :

'अमुक एक रूढीतला नियम तुमच्या व्याकरणामध्ये लिहिलेला नाही, म्हणून त्याप्रमाणे तुम्ही बोलू नका व लिहू नका, असे ज्यांची ती भाषा असेल त्यांना सांगणे हा मोठा जुलूम आहे; याकरिता व्याकरणामध्ये हा नियम नसला तर आता घालावा, आणि व्याकरण शुद्ध करावे. ...भाषेचे स्वरूप दाखविण्याला व्याकरण हा एक आरसा आहे. आणि त्या भाषेचे वास्तविक स्वरूप दिसत नाही, तर तो आरसा निरुपयोगी होय.' (विविधज्ञानविस्तार', जुलै १८७०)

दामल्यांच्या परिभाषेविरुद्ध सबनिसांनी वामन मल्हार जोशांच्या पाठींब्याने फिर्याद गुदरली आहे, तीही अशीच बालिश आहे. दामले ज्या कारणांसाठी प्रचलित संज्ञा सोडून 'ताख्यात, लाख्यात' इत्यादी नव्या संज्ञा रुजू करतात, त्या कारणांचे खंडन न करता त्यांच्या संज्ञांना नुसते नाक मुरडणे, तिला 'संज्ञारूपी नोकरशाही' वगैरे म्हणणे, याला शास्त्रीय चर्चेत तरी काही किंमत नाही. राजवाड्यांच्या लट्-लिट्-लोट् विरुद्ध तक्रार करण्यात काही अर्थ आहे; कारण पाणिनीय व्याकरणातल्या अशा संज्ञा त्यांनी त्यांचा अर्थ विषद न करताच योजल्या आहेत, आणि त्यांतल्या सुबंत, तिङन्त अशा काही तर मराठीत गैरलागूच आहेत. पण जुन्या संज्ञा न स्वीकारण्याचे कारण सांगून नव्या संज्ञा कायदेशीरपणे, म्हणजे लक्षणपूर:सर, योजण्यात दामल्यांनी काय अपराध केला आहे? दादोबादिकांच्या संज्ञा सोडून नव्या संज्ञा योजणे हाच अपराध असेल तर अशा 'प्रकृतेय, वाक्येय, मुखपदान्तर' इत्यादी नव्या संज्ञा स्वत: सबनिसांनी योजल्या आहेत, त्यांची काय वाट? नव्या संज्ञा दुर्बोधतेमुळे अस्वीकार्य असा सबनिसांचा अभिप्राय असेल तर प्रथम हे सांगितले पाहिजे की, सुबोधता-दुर्बोधता हा मुद्दा शास्त्रग्रंथांत गैरलागू आहे; आणि तो गैरलागू नसला तरी खुद्द सबनीसांचा ग्रंथ भरपूर दुर्बोध आहे.

अनुक्रमणिका

५.
श्रेय

मराठी व्याकरणाची परंपरा

मराठी व्याकरणाच्या परंपरेत दामल्यांचे श्रेय निश्चित काय आहे, हे कळण्यासाठी ही परंपरा आधी माहित असणे आवश्यक आहे. या विषयाचा अभ्यास आजपर्यंत पद्धतशीर आणि सांगोपांग झालेला पाहण्यात नाही. हा वस्तुतः एका स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे; तसा तो मी मांडला असून हा ग्रंथ 'मराठी व्याकरणाचा इतिहास' (१९९१) प्रकाशित झाला आहे. मराठी व्याकरणाची जी परंपरा अगदी त्रोटक रूपाने, दामल्यांच्या श्रेयाच्या निर्धारणापुरती, पुढे मांडली आहे तिचा विस्तार जिज्ञासूंना या माझ्या ग्रंथांत पाहता येईल.

मराठी व्याकरणावरचे म्हणण्यासारखे प्राचीनतम उपलब्ध पुस्तक - महानुभाव भीष्माचार्यांचे 'पंचवार्तिक'- तेराव्या-चौदाव्या शतकाइतके जुने असले तरी मराठी व्याकरणाची परंपरा अशी एकोणिसाव्या शतकापासून - नक्की सांगावयाचे तर १८०५ पासून - विल्यम केरी आणि वैजनाथ पंडित नागपूरकर यांच्या पुस्तकापासून सुरू झाली, असे म्हणावयास हवे. मध्यंतरीच्या काळात सतराव्या-अठराव्या शतकात फादर स्टीफन्सन आणि अन्य काही मिशनऱ्यांनी लिहिलेली कोकणीची व्याकरणे उपलब्ध आहेत. व्यापक अर्थाने ती मराठीचीच व्याकरणे होत. तथापि ती विशिष्ट बोलीशी निगडीत आहेत हे एक; आणि त्यांचा पुढे झालेल्या प्रमाण मराठीच्या - म्हणजे बहुतेकांनी नमूद केल्याप्रमाणे पुणेप्रांती प्रचलित असलेल्या मराठीच्या - व्याकरणावर प्रभाव असा पडलेला नाही, हे दुसरे. या कारणांसाठी मराठी व्याकरणाच्या परंपरेचा आरंभ स्थूल मानाने केरीपासून मानावा लागतो.

मराठीच्या माहेरापासून दूर अशा पूर्वेकडे बंगालमधल्या श्रीरामपूर या ठिकाणी मराठी व्याकरणाच्या परंपरेतले हे पहिले व्याकरण निर्माण व्हावे हा योगायोग - त्याची ऐतिहासिक कारणे सांगता येण्यासारखी असली तरी - विलक्षण वाटतो. असाच दुसरा विलक्षण योगायोग जुळून येऊन दूर दक्षिणेकडे मद्रास शहरी १८२७ च्या सुमाराला मराठीचे संस्कृत भाषेतले एकमेव व्याकरण - वेंकटमाधवाची 'महाराष्ट्रप्रयोगचंद्रिका' (१९७०) हे - रचले गेले. ही दोन्ही व्याकरणे इतिहासदृष्ट्या महत्त्वाची असली तरी परंपरा निर्माण करण्यास असमर्थ ठरली. परंपरानिर्मितीचे श्रेय नि:शंकपणे ज्याला द्यावयास हरकत नाही असे मराठीच्या माहेरी जन्मलेले पहिले व्याकरण म्हणजे मुंबईच्या 'नेटिव एज्युकेशन सोसैटी'च्या 'कारखान्या'त 'जार्ज जारवीस' साहेबाने नेमलेल्या पंडितांपैकी जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके आणि बाळशास्त्री घगवे या तिघा पंडितांनी ' संस्कृत व्याकरणाध्ययनबले करून' १८२५ च्या सुमारास रचलेले 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' हे होय. मराठीचे व्याकरण मराठीतून रचण्याची जी परंपरा या व्याकरणाने सुरू केली तिला पुढे दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, रावजीशास्त्री गोडबोले, मोरो केशव दामले, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, नारायण विठ्ठल आपटे, गोविंद कृष्ण मोडक, महादेव पांडुरंग सबनीस, अरविंद मंगरुळकर, कृष्ण श्री. अर्जुनवाडकर इत्यादी वैयाकरणांनी भूषित केले. या परंपरेला जवळजवळ समांतर अशी जी मराठीच्या इंग्रजी व्याकरणांची परंपरा केरीपासून सुरू झाली तीतही जे. स्टीव्हन्सन, इबेंझर बर्जिस, गणपतराव नवलकर, अप्पाजी काशिनाथ खेर, नारायण गोविंद कालेलकर इत्यादींनी नाव घेण्यासारखे काम केले आहे. या लेखकांपैकी काही

प्रत्यक्ष व्याकरण लिहिणारे, काही समीक्षक अथवा व्याकरणविषयक प्रश्नांचा ऊहापोह करणारे, तर काही या दोन्ही अंगांनी लिहिणारे आहेत. यांव्यतिरिक्त 'लँग्वेज कोर्स' या स्वरुपाची अप्रत्यक्षपणे, कमीअधिक प्रमाणात व्याकरणाच्या कक्षेत मोडणारी एडवर्ड फेअरबँक, एच. एम. लँबर्ट, नरेश कवडी आणि फ्रँकलिन साउथवर्थ इत्यादींची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत तीही इंग्रजी परंपरेत गणावयास हरकत नाही.

दामल्यांच्या ग्रंथाची उपयुक्तता

अशा केरी ते अर्जुनवाडकर या सुमारे पावणेदोन शतकांच्या मराठी व्याकरणाच्या परंपरेत मोरो केशव दामल्यांचे स्थान अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. कालदृष्टीने दामल्यांचे व्याकरण मराठी व्याकरणपरंपरेच्या जन्मशताब्दीच्या जवळपास येते. झालेल्या कामाचा आढावा घ्यावयास शंभर वर्षे हा सोयीचा टप्पा आहे.तसा आढावा दामल्यांनी आपल्या ग्रंथात घेतलाही आहे. हा आढावा अपूर्ण आहे. कारण स्टीव्हन्सन्, बर्जिस या दखल घेण्यासारख्या वैयाकरणांची माहिती दामल्यांना असल्याचे दिसत नाही; क्रमवंत, फडके, घगवे यांचे व्याकरण तर दादोबांच्या काळातच दुर्मिळ आणि विस्मृतप्राय होऊन गेले होते. तथापि दामल्यांना ज्यांची माहिती आहे त्यांची उपेक्षा त्यांनी केलेली नाही. आपल्या पूर्वीच्या व्याकरणग्रंथांतून मांडली गेलेली सर्व सामग्री दामल्यांनी आपल्या ग्रंथात वर्गीकृत करून एकत्र दिली; आणि मराठी व्याकरणातल्या विवाद्य प्रश्नांची सांगोपांग चर्चा करून उपलब्ध प्रमाणांच्या आधाराने निर्णय केले. सारांश हा की, सामग्री, नियम आणि चर्चा, म्हणजेच दामल्यांच्या शब्दांत 'उद्घाटन आणि ऊहापोह' हे सर्व एकत्र मांडणारा ग्रंथ दामल्यांनी लिहिला.

दामल्यांचे पूर्वसूरी

संकलक आणि समीक्षक या नात्यांनी दामल्यांनी मराठी व्याकरणाच्या क्षेत्रात जे कार्य केले आहे त्याचे स्वरूप आणि श्रेय ठरवता येण्यासाठी, दामल्यांच्या काळापर्यंत मराठी व्याकरणाची जी वाटचाल झाली ती संक्षेपत: माहित झाली पाहिजे. एकूण मराठी व्याकरणाच्या इतिहासाची स्थूल रूपरेषा वर दिली आहे. आणि तिचा विस्तार जिज्ञासूंना माझ्या 'मराठी व्याकरणाचा इतिहास' या ग्रंथात पाहता येईल. या ठिकाणी माहिती करून घ्यायची आहे ती अशा ग्रंथांची/ग्रंथकारांची की जे दामल्यांना माहित आहेत आणि ज्यांचा त्यांनी प्रसंगवशात परामर्श केला आहे. दामल्यांनी स्वत: आपल्या ग्रंथात 'उपक्रम' या प्रास्ताविकात पूर्व व्याकरणांची माहिती दिली आहे. ती डोळ्यांपुढे ठेऊन दामले-पूर्व व्याकरणाची वाटचाल समजून घेता येईल.

या वाटचालीची माहिती व्याकरणकार आणि व्याकरणसमीक्षक अशा दोन विभागांत विभागली असून व्याकरणकारांत केरीसंप्रदाय आणि दादोबासंप्रदाय असे दोन उपविभाग सोयीसाठी केले आहेत. राजवाड्यांचे 'श्रीज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण' (१९०९) दामल्यांनी आपल्या पूर्वीच्या व्याकरणग्रंथांत घातलेले असूनही या ठिकाणी गाळले आहे. कारण प्रस्तुत विचार वर्तमान मराठीविषयी आहे, प्राचीन मराठीविषयी नाही, हे एक; आणि दामल्यांनीही या ग्रंथाचा एकवार उल्लेख करण्यापलीकडे परामर्श केलेला नाही, हे दुसरे.

केरीसंप्रदाय : नवलकर

केरीसंप्रदायातल्या, इंग्रजीतून लिहिलेल्या ज्या दोन व्याकरणांचा दामल्यांनी उपयोग केला आहे त्यांतले एक नवलकरांचे. रेव्हरंड गणपतराव नवलकरांनी आपल्या व्याकरणविषयक लेखनाचा आरंभ 'The Analysis and Synthesis of Marathi Sentences' वाक्यवियोग आणि वाक्यसंयोग शास्त्र या

पुस्तकाने केला आहे. मराठी वाक्यांच्या पृथक्करणावर प्रथम लिहिले गेलेले पुस्तक म्हणून आगरकरांच्या 'वाक्यमीमांसे'चा (१८८८) निर्देश करीत असतात. पण 'वाक्यमीमांसे'च्या आधी २२ वर्षे या विषयावर नवलकरांनी लिहिले असून आजही प्रचलित असलेली या विषयात येणारी पुष्कळशी परिभाषाही ('उद्देश्य, विधेय, विस्तार, पूरक, शुद्ध वाक्य, मिश्र वाक्य, संयुक्त वाक्य...') त्यांनीच प्रथम योजलेली आढळते. वाक्यवियोग आणि वाक्यसंयोग हे विषय इंग्रजी व्याकरणाच्या अनुकरणाने मराठी व्याकरणात आले आहेत आणि ते Syntax या व्याकरणविषयाचे भाग आहेत असे नवलकरांनीही म्हटले आहे.(पण मोठ्या व्याकरणात त्यांनी हे विषय घातलेले नाहीत.) 'वाक्यवियोगशास्त्र' हा मुळचा तर्कशास्त्राचा विषय. तो व्याकरणाच्या कक्षेत बसतो की नाही हा कदाचित वादाचा विषय होऊ शकेल. पण 'वाक्यसंयोगशास्त्र' हा व्याकरणाचा विषय का मानायचा याचे समर्पक कारण काहीही सांगता येत नाही. 'रागे भरणे वाईट आहे' याचे रुपांतर 'राग वाईट आहे' (?) हे सांगितल्याने व्याकरणाचे कोणते नवे तत्त्व सांगितले जाते? हा मुद्दा बाजूला ठेवला तरी नवलकरांच्या उदाहरणात आक्षेपार्ह भाग पुष्कळ भेटतो. 'जर राजा लढाईत मेला तर त्याचा भाऊ युद्ध चालवील' या मिश्रवाक्याचे, अर्थांतर न करता, संयुक्त वाक्यात रुपांतर नवलकरांच्या मताने 'राजाला लढाईत मरू द्या आणि मग त्याचा भाऊ युद्ध चालविल' असे होते. मराठी चांगले बोलणारा कोणीही माणूस ही दोन वाक्ये एकाच अभिप्रायाने बोलणार नाही. 'तेथे एक बायको (woman) आली होती', 'तो विद्येने थोरत्व पावला', 'गाया बांधिल्या आहेत', असली नवलकरांची उदाहरणवाक्ये पाहिल्यावर त्यांना परदेशी मिशनऱ्यांची संगत बाधली की काय अशी शंका येऊ लागते.

तथापि नवलकर हा व्युत्पन्न गृहस्थ आहे याचा प्रत्यय त्यांच्या मोठ्या व्याकरणावरून येतो. त्यांच्या व्याकरणातल्या टिपांत बोप, माक्स म्यूलर, व्हिटनी, बीम्स, वररुची यांच्या भाषाशास्त्रीय ग्रंथातली अवतरणे/उल्लेख येतात. यावरून लक्षात येते की मराठीच्या अभ्यासाविषयीचा नवलकरांचा दृष्टिकोन ऐतिहासिक आणि तुलनात्मक, म्हणजे बराचसा व्याकरणाच्या कक्षेबाहेरचा आहे. चिपळूणकरांनी आपल्या व्याकरणनिबंधांत ज्या 'ऐतिहासिक रीती'ची शिफारस केली आणि जिच्या प्रभावाखाली कृष्णशास्त्री गोडबोल्यांचे व्याकरण सिद्ध झाले तिचीच ही लीला आहे. नवलकरांनी आपले व्याकरण प्रथम (१८६८) निनावी प्रकाशित केले. पुढे त्यावर अनुकूल अभिप्राय आलेले पाहून दुसऱ्या आवृत्तीवर (१८८०) त्यांनी आपले नाव घातले. या ग्रंथातला मराठी मजकूर देवनागरीत छापला आहे. ग्रंथाची काळजीपूर्वक आखणी, विषय मांडण्यातली टापटीप आणि ग्रंथकाराचा व्यासंग यांचा प्रत्यय हा ग्रंथ वाचताना वारंवार येतो. या सगळ्याच्या जोडीला आहे या ग्रंथाचे प्रसन्न, देखणे आणि शुद्धप्राय मुद्रण, ग्रंथलेखन-मुद्रणाचा एक उत्कृष्ट नमूना.

खेर

दामल्यांनी उपयोग केला आहे असे दुसरे इंग्रजीत लिहिलेले मराठीचे व्याकरण खेरांचे. खेरांचे व्याकरण मुळात 'A Higher Anglo-Marathi Grammar' या नावाने प्रकाशित झाले होते (१८९५) असे दिसते; दुसऱ्या आवृत्तीवरच्या नावात यातला 'Anglo' हा अंश गळाला आहे (१८९९). हे नाव खेरांनी आपल्याकडून चोरले असल्याची तक्रार रा. भि. जोशांनी केली आहे. (खेरांनी आपल्या व्याकरणाला 'Higher' म्हटल्यामुळे जोशांना निरुपायाने 'Comprehensive' म्हणावे लागले!) हे दोघेही एकमेकांवर, नाव न घेता, आपल्या पुस्तकात टीका करतात. खेरांच्या पुस्तकातला शेवटचा १४० पृष्ठे मजकूर व्याकरणाहून अन्य विषयांवर (Prosody, Figures of Speech...) आहे. अवशिष्ट सुमारे ४०० पृष्ठांतलीही सुमारे १७५ पृष्ठे वाङ्मयेतिहास इत्यादी विषयांना वाहिलेली आहेत. उरलेल्या भागात जो व्याकरणाचा आराखडा आहे तो तसा दामल्यांच्याही व्याकरणात आढळतो. पण हा आराखडा खेरांनीही बेनच्या (Bain)

किंवा अन्य कोणाच्या इंग्रजी व्याकरणावरून उचलला असावा असे मानायला जागा आहे. दादोबांचा आदर्श मरे, कृष्णशास्त्री गोडबोल्यांचा हॉवर्ड, खेरांचा बेन,- मराठी व्याकरणाची परंपरा कशी इंग्रजी व्याकरणपरंपरेला समांतर चालली आहे!

खेरांनी आपल्या व्याकरणाला ५७ पृष्ठांची प्रस्तावना जोडली असून तीत स्वत:ला महत्वाची वाटणारी मते एकत्र दिली आहेत. ग्रंथातली विषयांची मांडणी आणि त्यांचे विवरण प्राय: पुनरुक्ती टाळून आणि तर्कसंगती राखून सुटसुटीत,सुबोध आणि सुश्लिष्ट भाषेत करण्यात खेरांनी पुष्कळ यश मिळवले आहे. या सर्व बाबतीत विरुद्ध टोकाला असलेले, त्यांचे प्रतिस्पर्धी रा. भि. जोशी यांचे, व्याकरण पाहिल्यावर तर खेरांचे श्रेय अधिकच दृष्टीत भरते.

दादोबासंप्रदाय : दादोबा

दादोबांचे (१८१४-१८८२) नाव मराठी वाङ्मयाच्या इतिहासात व्याकरणकार म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांना व्याकरणाची गोडी लागली ती त्यांचे गुरू 'अष्टागर प्रांती'चे बापूशास्त्री मायदेव शुक्ल यांच्यामुळे. 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' हे त्यांचे पुस्तक प्रथम शिळाछाप रूपाने प्रकाशित झाले तेव्हा ते २२ वर्षांचे होते. याच पुस्तकाने त्यांना 'महाराष्ट्र भाषेचे पाणिनी' अशी ख्याती मिळवून दिली. मुळात हा ग्रंथ प्रश्नोत्तररूप होता. पण त्याच सुमाराला याच विषयावर दोन प्रश्नोत्तररूप लहान पुस्तके प्रकाशित झालेली पाहून दादोबांनी याचे रूप फिरवले. १८५० मध्ये या ग्रंथाची दुसरी, खिळाछाप सुधारित आवृत्ती निघाली; तीत 'या ग्रंथाची केवळ नवी रचना करावी लागली.' दादोबांच्या हयातीतली त्याची जी शेवटची सातवी आवृत्ती (१८७९) तीत त्यांनी ५० पृष्ठे नवीन मजकूर घातला. ही व्याकरणाची चातुर्थावस्था. या ग्रंथाच्या पुढच्या आवृत्त्या म्हणजे सातव्या आवृत्तीची पुनर्मुद्रणे. सातव्या आवृत्तीत भर म्हणून घातलेला हा जो ५० पृष्ठांचा मजकूर तो त्यांनी भर म्हणून तयार केलेल्या मजकुराचा केवळ काही भाग होय. बाजूला ठेवलेला मजकूर त्यांनी 'पूरणिका' म्हणून दोन वर्षांनी प्रकाशित केला; तो मुद्रित २१५ पृष्ठांचा आहे. तो जमेला धरला तर दादोबांच्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पृष्ठसंख्या ६११ भरते. या आवृत्तीनंतर वर्षभराने दादोबा निवर्तले. पुनर्मुद्रणाच्या वेळी सरकारने दादोबांच्या वारसांना आणखी सुधारणा करण्याविषयी विचारले असता त्यांनी उत्तर लिहिले : It is only a Dadoba who can correct Dadoba's grammar.'

दादोबांचे व्याकरण मान्यता पावले त्यापूर्वी त्याला अनेक वेळा परीक्षणाच्या दिव्यातून जावे लागले. त्याचे पाहिले परीक्षक मेजर कँडी (१८३८, १८४८) आणि बाळशास्त्री जांभेकर (१८४६). त्यांच्या परीक्षणांत शुद्ध लिहिण्यापासून रूपसिद्धीपर्यंत अगणित मुद्द्यांवर दादोबांना सूचना करण्यात आल्या आहेत. त्यांत विशेष लक्षात येणारी सूचना विभक्तीविषयीची. जांभेकरांना द्वितीया-चतुर्थी यांचे एकीकरण करून विभक्तीसंख्या एकाने कमी करावी असे वाटते. कँडीच्या मताने तीनच विभक्ती पुरते. प्रथमा, सामान्य रूप आणि षष्ठी. मराठी विभक्तींच्या संख्येचा हा वाद आजच्या काळापर्यंत चालू आहे. दादोबांनी या सूचना लक्षात घेऊन आपल्या व्याकरणात पुष्कळ फेरफार केले; काही सुचनांना समर्पक उत्तरे दिली. शासकीय पातळीवरचे हे परीक्षक. सार्वजनिक पातळीवरचे दादोबांचे परीक्षक कृष्णशास्त्री चिपळूणकर. त्यांच्या कार्याचा परिचय पुढे येईल.

कृष्णशास्त्री गोडबोले

१८६३ मध्ये 'दक्षिणा प्राइझ कमिटी'ने 'पुणे पाठशालापत्रका'त एका जाहिरातीच्या द्वारे 'मराठी व्याकरणावर उत्तम प्रतीचा ग्रंथ कोणी तयार केल्यास दक्षिणा प्राइझ कमिटी त्या ग्रंथकर्त्यास उत्कृष्ट प्रतीचे

अनुक्रमणिका

बक्षीस देण्यास सिद्ध आहे’ असे प्रकट केले. प्रकटनाखाली सही कृष्णशास्त्री चिपळूणकरांची आहे. जाहिरातीत ग्रंथाबद्दलच्या अपेक्षांचा तपशील दिला असून तो प्राय: चिपळूणकरांच्या ‘व्याकरणावर निबंधा’त मांडलेल्या ‘ऐतिहासिक रीती’ला अनुसरणाऱ्या व्याकरणाची रूपरेखा या स्वरूपाचा आहे. या जाहिरातीला उत्तर म्हणून कृष्णशास्त्री गोडबोल्यांनी (१८३१-१८८६) ‘मराठी भाषेचें नवीन व्याकरण : संस्कृत व प्राकृत भाषांशी तिचें साम्य आणि प्राकृत भाषेचें संक्षिप्त व्याकरण व कोश ह्यांसहित’ हा ग्रंथ लिहिला. या मराठी ग्रंथाचे मूळ नाव ‘A New Grammar of the Marathi Language…’ असे इंग्रजीत देऊन नंतर मराठीत त्याचे भाषांतर दिले आहे. आपल्याला ग्रंथरचनेत उपयोगी पडलेल्या मराठी, इंग्रजी, फारसी, प्राकृत, हिंदुस्थानी भाषांच्या व्याकरणांवरील आणि अन्य अशा १७ ग्रंथांची यादी गोडबोल्यांनी दुसऱ्या आवृत्तीच्या ‘सूचने’त दिली आहे; तीत दादोबांचे व्याकरण, चिपळूणकरांचे निबंध यांच्याबरोबर बीम्सचे ‘हिंदुस्थानातील अर्वाचीन आर्य भाषांचे साम्य प्रदर्शित व्याकरण’ हेही समाविष्ट आहे. या ग्रंथावर अनुकूल अभिप्राय देणाऱ्या विद्वानांत डाक्तर विल्सन, भांडारकर, चिपळूणकर इत्यादी मंडळी आहेत. चिपळूणकरांनी ग्रंथाचे वर्णन ‘a production of considerable merit’ असे केले आहे. या ग्रंथाने ‘ऐतिहासिक रीती’वर आधारलेले मराठीचे व्याकरण व्हावे हे जे चिपळूणकरांच्या निबंधात प्रकट झालेले त्यांचे स्वप्न ते साकार झाले.

तो काळ, युरोपात भाषाशास्त्राची नव्याने शास्त्रीय घडण होत होती तिचा होता. विल्यम जोन्सने अठराव्या शतकाच्या शेवटच्या चरणात युरोपभारतीय भाषाकुटुंबाविषयीचा तर्क मांडला, तो नंतरच्या बोप (Bopp) इत्यादी पंडितांनी कसोशीने अभ्यास करून सिद्धांत पदवीला नेऊन बसवला. भाषाशास्त्राला विकासाची नवी दिशा मिळाली होती. भाषाशास्त्रज्ञांच्या उत्साहाला उधान आले होते. भाषांच्या ऐतिहासिक अभ्यासाला चालना मिळाली होती. पाश्चात्य आणि भारतीय पंडितांचे इंग्रजी ग्रंथ पाहून मराठी पंडितांनाही इच्छा झाली की मराठी भाषेचेही ऐतिहासिक विवरण झाले पाहिजे. चिपळूणकर हे त्या इच्छेचे एक उद्‌गाते. ‘दक्षिणा प्राईझ कमिटी’च्या वतीने त्यांनी आवाहन केले आणि गोडबोल्यांनी त्याला ओ दिली.

इथपर्यंत सर्व ठीक आहे.पण हे आवाहन करणारे आणि त्याला ओ देणारे यांच्या समजुतीत भाषेच्या ऐतिहासिक आणि वर्णनात्मक अभ्यासांच्या क्षेत्रमर्यादांविषयी जो संभ्रम दिसून येतो तो शास्त्राला उपकारक नाही. मुळात ही ‘ऐतिहासिक रीती’ची कल्पना चिपळूणकरांनी मांडली ती दादोबांच्या व्याकरणाचे परीक्षण करण्याच्या संदर्भात. दादोबांचा उद्देश मराठीचे ऐतिहासिक विवरण करण्याचा नव्हता; तर प्रचलित मराठीचे विवरण करण्याचा होता. त्यात ‘ऐतिहासिक रीती’चा संबंध काय? वस्तुत: हा प्रश्न चिपळूणकरांच्या एका वाचकानेच त्यांच्यापुढे पत्ररूपाने उपस्थित केला होता. त्याला चिपळूणकरांनी दिलेले उत्तर समाधानकारक नाही. चिपळूणकरांनी रुजू केलेल्या या ऐतिहासिक रीतीचा अतिरेक पुढे राजवाड्यांच्या व्याकरणविषयक लेखनात झालेला आढळतो.

आगरकर

आगरकरांचे (१८५६-९५) नाव समाजसुधारणा, स्त्रियांची उन्नती, बुद्धिवादी विचार यांच्या संबंधात जितके प्रसिद्ध आहे तितके व्याकरणाच्या संबंधात नाही. तथापि दादोबादी पूर्ववैयाकरणांच्या ग्रंथात वाक्य आणि त्याचे पृथक्करण यासंबंधीचा विचार ‘यावा तितका आलेला नाही.’ ही उणीव भरून काढण्यासाठी त्यांनी ‘वाक्यमीमांसा’ (पूर्ण नाव : ‘वाक्यमीमांसा आणि वाक्यांचे पृथक्करण’) लिहिली. या ग्रंथात त्यांनी बेनच्या व्याकरणातल्या संबद्ध भागाचा उपयोग करून मराठी वाक्यांचे वर्गीकरण आणि पृथक्करण यांचे

विवेचन (त्यांच्या समजुतीप्रमाणे) 'प्रथमच' केले आहे. यापूर्वी याच विषयावर नवलकरांनी पुस्तक लिहिले आहे याची आगरकरांना माहिती नसावी.

उद्देश्यविधेयात्मक वाक्यपृथक्करण हा विषय मूळ तर्कशास्त्रातला, आणि जिचा नमूना आगरकरांसमोर होता त्या इंग्रजी भाषेतल्या वाक्यांची ठेवण वेगळी. यामुळे तो मराठी वाक्यांना बसता करण्यासाठी आगरकरांना पुष्कळच खटपट लटपट करावी लागली आहे. या गोष्टीला दामले 'व्याकरणाची न्यायशास्त्राशी तडजोड' असे नाव देतात. शास्त्रात तडजोड कसली? आणि तडजोड करते ते शास्त्र कसले? इतका अट्टाहास करून हा विषय व्याकरणात घुसवून लाभ काय? या प्रश्नांची उत्तरे संबंधितांनी दिलेली नाहीत; कारण त्यांना हे प्रश्नच पडले नाहीत. मराठी व्याकरणापुरते या प्रश्नाचे उत्तर 'हा विषय इंग्रजी व्याकरणात आहे' एवढे कुणाला पुरेसे वाटेल; पण या उत्तरला शास्त्रीय मूल्य नाही. आगरकरांचे आणि त्यांना या विषयात अनुसरणाऱ्या मराठी वैयाकरणांचे श्रम वाया गेले आहेत.

रा. भि. जोशी

ज्या योग्यतेच्या व्याकरणग्रंथांचा परामर्श चालू आहे तिचा विचार केला तर जोशांच्या व्याकरणग्रंथांचा या ठिकाणी उल्लेख करण्याची आवश्यकता नाही. पण एक तर 'प्रौढबोध' अशी भारदस्त पगडी या ग्रंथाला घातली आहे; दुसरे म्हणजे गुंजीकरांसारख्या पंडिताने या ग्रंथावर समीक्षालेख लिहिले आहेत. त्यामुळे निरुपायाने त्याचा इथे उल्लेख करावा लागतो आहे. वस्तुतः तर्कदुष्टता, विसंगती, 'ढिसाळपणा, व्याघात, पुन:पुनरुक्ती इत्यादी अगणित ग्रंथदोषांचे एका ठिकाणी भरलेले संमेलन पाहायचे असेल तर जोशांचे 'प्रौढबोध व्याकरण' (१८८९) पाहावे. मराठी व्याकरणावरचे गेल्या शतकातले सगळ्यांत निकृष्ट पुस्तक हा मान याच ग्रंथाला द्यावा लागेल.चिपळूणकरांचे अपुरे राहिलेले कार्य पूर्ण करण्याचा आव आणून शेवटी या गृहस्थाने आपल्या पदरी असा सुमार माल बांधावा याची सुबुद्ध अभ्यासकाला चीड आल्याशिवाय राहत नाही. गुंजीकरांसारख्या मृदुभाषी सज्जनालासुद्धा शेवटी म्हटल्यावाचून राहवले नाही की '...जोशीबुवांच्या व्याकरणाची सर्व घाण झाली आहे.' रामाय तस्मै नम:! रामाय चास्मै नम:!!

असा विद्वत्तेचा पोकळ आव न आणता नियुक्त विषयाचे आटोपशीर, काही मुद्‌यांवर मूलगामीही, विवेचन करणारे 'व्याकरणमंजरी' सारखे (१८९५) विनीतवेष ग्रंथ वाचकाला आनंद देतात, विचारही करायला लावतात. काळे, हळबे या लेखकांनी 'व्याकरणमंजरी'त मराठी व्याकरणातले बहुतेक सर्व समस्याभूत किंवा विचारणीय वाक्यप्रयोग एकत्र करून आपल्या परीने त्यांची उकल केली आहे. त्या सर्वांची सुसंगत उपपत्ती जो लावील त्याने मराठी व्याकरण पार केले म्हणता येईल. दामल्यांनी आपल्या व्याकरणात चार ठिकाणी 'मंजरीकारां'चा उल्लेख केला आहे.

व्याकरणसमीक्षक : चिपळूणकर

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी मुख्यत: दादोबांच्या व्याकरणावर 'शालापत्रक' मासिकात जे २५ निबंध लिहिले (१८६५-१८६८) त्यांचा संग्रह 'मराठी व्याकरणावर निबंध' (१८९३) या नावाने पुढे प्रकाशित झाला. या निबंधांत चिपळूणकरांनी मराठी व्याकरणातल्या लहान मोठ्या अनेक मुद्द्यांची सविस्तार चर्चा केली आहे. भाषा आणि व्याकरण यांच्या संबंधांविषयीची त्यांची दृष्टी शास्त्रशुद्ध आहे : जे 'शब्द व प्रयोग हजारो लोक नेहमी योजतात' आणि ज्यांच्यापासून 'विवक्षित अर्थाचा बोध होऊन हजारो लोकांचा व्यवहार चालतो' त्यांना (दादोबा काही ठिकाणी म्हणतात तसे) 'अप्रतिष्ठित व अशुद्ध म्हणण्यास काय आधार आहे?' 'भाषा विद्वानांनी विचार करून... केली आहे असे नाही. तसे असते तर भाषा हल्लीपेक्षा फार

नियमित झाली असती व तीत हल्ली जे शेकडो संकीर्ण नियम व त्या नियमांस शेकडो अपवाद होऊन व्याकरण कठीण झाले आहे ते तसे न होते.' या भूमिकेवरून त्यांनी संस्कृत शास्त्रग्रंथांची शिस्त पाळून सर्व विषयांवर लिहिले आहे. चिपळूणकरांनी एवढ्या खटाटोपाने हे सर्व निबंध लिहून दादोबांच्या व्याकरणाचा परामर्श केला खरा, पण या निबंधांची दखल दादोबांनी घेतल्याचे त्यांच्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीवरून दिसत नाही. त्यांनी हे निबंध निदान वाचले तरी का अशीही शंका घ्यायला अवसर आहे.

चिपळूणकरांचे व्याकरणावरचे निबंध वाचताना एक गोष्ट सतत जाणवत राहते. ती ही की या माणसाला शास्त्र म्हणजे काय याची फार चांगली जाण आहे. संस्कृत शास्त्रग्रंथांची त्यांना चांगली तालीम मिळाली होती याचा हा परिणाम असला पाहिजे; कारण हाच गुण पुढे गुंजीकर आणि राजवाडे यांच्याही लिखाणात आढळतो.

गुंजीकर

गुंजीकरांचे (१८४३-१९०१) नाव मराठी वाङ्मयाच्या इतिहासात 'विविधज्ञानविस्तार' या युगप्रवर्तक मासिकाचे जनक आणि दीर्घ काळ संपादक म्हणून चिरस्थायी झाले आहे. गुंजीकरांचे मराठी व्याकरणविषयक लेख 'विस्तारा'त १८६७ ते १८९० या साधारणपणे २५ वर्षांच्या काळात वेगवेगळ्या निमित्तांनी आणि शिर्षकांनी प्रकाशित झाले आहेत. त्यांपैकी आठ लेख रा. भि. जोशांच्या 'प्रौढबोध मराठी व्याकरणा'च्या निमित्ताने 'मराठी व्याकरणावर विचार' या शीर्षकाने सुमारे सव्वा वर्षाच्या अवधीत (जून १८८९-सप्टेंबर १८९०) लिहिलेले आहेत. 'सिद्धांतकौमुदी' या भट्टोजी दीक्षितांच्या प्रसिद्ध संस्कृत व्याकरणग्रंथाचे मराठी भाषांतर काशिनाथ पांडुरंग परब यांच्या सहकार्याने 'कौमुदीमहोत्सव' या नावाने क्रमश: प्रकाशित करायला त्यांनी १८७५ मध्ये सुरवात केली. हे भाषांतर अपूर्ण आहे. संस्कृत, प्राकृत आणि मराठी भाषांच्या व्याकरणग्रंथांची गुंजीकरांना व्यापक माहिती असल्याचे त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट होते. कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या नंतर शास्त्रीय विचाराच्या मर्यादांची जाणीव असलेला मराठी व्याकरणाचा सूक्ष्मदृष्टी, प्रज्ञावंत जाणकार म्हणून कोणाचा निर्देश करायचा झाला तर तो गुंजीकरांचाच करावा लागेल.
गुंजीकरांच्या प्रस्तुत लेखांत मराठी व्याकरणाचे बहुतेक विषय आले आहेत खरे, पण विभक्तीविवेचनाअखेरपर्यंतचे विषय जितक्या तपशिलाने आले आहेत तितक्या तपशिलाने पुढचे विषय आलेले नाहीत. म्हणजे मराठी व्याकरणाचा बराच मोठा भाग त्यांच्या लेखांत अस्पष्ट राहिला आहे. तथापि गुंजाकारांच्या व्याकरणलेखांत सर्वत्रच जो एक निर्मळपणा अनुभवाला येतो त्याचे मूळ व्याकरणाचे स्वरूप आणि प्रयोजन यांविषयीच्या त्यांच्या शास्त्रपूत दृष्टीमध्ये सापडेल. 'भाषेचे स्वरूप दाखविण्याला व्याकरण हा एक आरसा आहे. आणि त्या आरशामध्ये जर त्या भाषेचे वास्तविक स्वरूप दिसत नाही तर तो आरसा निरुपयोगी होय.' 'कोणेका वस्तूचे चित्र काढावयाचे, तर ती वस्तू जशी असेल, तसेच बिनचूक ते चित्र उठले पाहिजे. एखाद्याचे नाक वाकडे आहे, तर चित्रात तसे वाकडेच नाक आले पाहिजे; वाईट दिसते म्हणून ते सारखे करणे अप्रशस्त.' इतक्या परखड शब्दांत वैयाकरणाला त्याच्या मर्यादांची जाणीव गुंजीकरांच्या पूर्वी कोणी करून दिलेली आढळत नाही.

दामल्यांना माहित असलेल्या पूर्वसुरींच्या कार्याची थोडक्यात ओळख करून घेतल्यावर आपल्याला दामल्यांचे श्रेय निश्चित करण्याच्या मुद्द्याकडे वळायला प्रत्यवाय नाही. दामल्यांचा ग्रंथ आजपर्यंत मराठी व्याकरणावर लिहिल्या गेलेल्या ग्रंथांत सर्वांहून अधिक विस्ताराचा, म्हणजे डेमी आकाराच्या जवळजवळ एक हजार पृष्ठांचा आहे. या स्वरूपाचे आणि या प्रमाणावर कार्य मराठी व्याकरणावर दामल्यांच्या पूर्वी कोणी केलेले नाही, आणि दामल्यांच्या नंतरही आजपर्यंत झालेले नाही.

अनुक्रमणिका

स्थूल अर्थाने मराठी व्याकरणाचे हे 'महाभारत' आहे. 'यदिहास्ति तदन्यत्र यन्नोहास्ति न तत् क्वचित्' ही महाभारताची प्रौढोक्ती ज्या मर्यादेने महाभारताला त्या मर्यादेने दामल्यांच्या व्याकरणालाही उपपन्न होते.

सर्वेषां कविमुख्यानामुपजीव्यो भविष्यति।
पर्जन्य इवं भूतानामक्षयो भारतद्रुमः ।।

असे खुद्द महाभारतातच म्हटले आहे. त्याप्रमाणे महाभारत हे पुढच्या संस्कृत साहित्याला ज्या प्रमाणात आधारभूत ठरले; त्या प्रमाणात दामल्यांचे व्याकरणही पुढच्या मराठी व्याकरणांना आधारभूत ठरले; ज्यांना दामल्यांची मते मान्य नाहीत त्यांनाही उपयोगी ठरले. कारण दामल्यांचे व्याकरण हा एक प्रचंड संदर्भग्रंथ आहे. इतकी उदाहरणे, इतके शब्द, इतके नमुने व्यवस्थित गटवारीने एकत्र उपलब्ध करून देणे हेही व्याकरणाच्या क्षेत्रात लहानसहान काम नव्हे; दामल्यांनी तर विविध उपपत्तीही एकत्र संकलित करून, चर्चाचिकित्सा करून व्याकरणविषयक प्रश्नांची बारीकसारीक अंगेही दृष्टीपुढे आणली आहेत.

एकंदरीने दामल्यांनी व्याकरणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व कार्य केले आहे. ते अजूनही अद्वितीय राहिले आहे; कारण या स्वरूपाचा, या पल्ल्याचा, या उपयुक्ततेचा (थोडक्यात म्हणजे या आकार-अधिकार-उपकारांचा) ग्रंथ दामल्यांच्या नंतर अजून निर्माण झालेला नाही. यावरून अशा स्वरूपाच्या कार्याचा अवघडपणा पुन्हा एकदा प्रत्ययाला येतो.असा ग्रंथ यापुढे झाला तर त्याची प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रेरणा दामल्यांच्या या ग्रंथातच असल्याचे आढळून येईल.

दामले जन्मशताब्दी

मराठी व्याकरणाच्या परंपरेतले हे दामल्यांचे अजोड कार्य लक्षात घेऊन पुण्यातल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने एक कार्यक्रम आयोजित करून त्यांच्याविषयी कृतज्ञता आणि आदरभावना प्रकट केली. कार्यक्रमाचे दोन अंश होते : (१) दामल्यांच्या कार्याचे विवेचन करणे माझे व्याख्यान (दि. ७-११-१९६८.). हे व्याख्यान 'कर्तरी दामले आणि कर्मणी दामले' या शीर्षकाने महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत (ऑक्टो. -डिसें. १९६८) प्रकाशित झाले आहे. (२) 'संयुक्त क्रियापद' या विषयावर परिसंवाद (दि. २४-११-१९६८). या परिसंवादाचे वृत्त आणि त्यात सहभागी झालेल्या अभ्यासकांची टिपणे पत्रिकेच्या वर उल्लेखिलेल्या अंकात प्रकाशित झाली आहेत. या परिसंवादासाठी मी लिहिलेला उपन्यासलेख 'मराठी व्याकरणात संयुक्त क्रियापदे' या शीर्षकाने अभ्यासकांच्या तयारीसाठी पत्रिकेच्या आधीच्या अंकात (जुलई-स्पटें. १९६८) प्रकाशित झाला आहे. माझ्या उल्लिखित निबंधातले विवेचन नंतरच्या काळातल्या माझ्या ग्रंथांत समाविष्ट झाले आहे.

दामल्यांचा हिशेब

याप्रमाणे संदर्भग्रंथ म्हणून दामल्यांच्या व्याकरणाचे जे श्रेय आहे ते निर्विवाद असले तरी शास्त्रकार म्हणून दामल्यांचे श्रेय काय, हे ठरवणे शिल्लक राहतेच. हे काम आता करावयाचे आहे. एखाद्या शास्त्रावर पूर्वपरंपरा नसताना प्रथमच ग्रंथ लिहिणे हे काम अवघड असते. तो ग्रंथ सदोष असेल, दुसऱ्या ग्रंथाचे अनुकरण असेल, अपूर्ण असेल; पण अशा ग्रंथाचे म्हणून श्रेय नि:संशय असते. चुकीचे असले तरी अशा सुरवातीच्या ग्रंथांतून होणारे सामग्रीसंकलन पुढच्या ग्रंथांना उपकारक होते. दामल्यांना हे श्रेय अर्थातच देता येणार नाही. हे श्रेय केरी आणि वैजनाथ पंडित, क्रमवंत-फडके-घगवे, दादोबा अशा काही थोड्याच वैयाकरणांना देता येईल. दामल्यांच्या पाठीशी शंभर वर्षांची परंपरा आहे. सामग्रीसंकलन हा प्रश्नच

अनुक्रमणिका

त्यांच्यापुढे नव्हता. दादोबांचे मोठे व्याकरण आणि त्याची पूरणिका, कृष्णशास्त्री आणि रावजीशास्त्री गोडबोल्यांची व्याकरणे, आगरकरांची वाक्यमीमांसा,- प्रायः या ग्रंथांतली सामग्री पुनरुक्ती वजा करून एकत्र केली, की दामल्यांच्या व्याकरणातली सामग्री झाली. या सर्व सामग्रीने दामल्यांच्या व्याकरणाली सुमारे सातआठशे पृष्ठे व्यापली असतील; कारण दादोबांचे व्याकरण आणि त्याची पूरणिका यांचीच पृष्ठसंख्या मुळी सहाशेच्या घरात जाते. तेव्हा दामल्यांच्या व्याकरणाचा जवळजवळ तीनचतुर्थांश भाग हा पूर्व वैयाकारणांकडून त्यांना मिळालेला आहे. राहिलेला सुमारे एकचतुर्थांश भाग दामल्यांचा स्वत:चा म्हणता येईल. तो प्रायः चर्चाचिकित्सात्मक आहे. शास्त्रीय ग्रंथाचे मूल्य पृष्ठसंख्येच्या हिशेबाने मोजता येत नाही किंवा वजनावर ठरवता येत नाही, हे मला माहित आहे. दामल्यांच्या व्याकरणाचा पृष्ठसंख्येत हिशेब देण्यामध्ये माझा तसा हेतू नाही. दामल्यांचे श्रेय निश्चित करण्यासाठी नेमके कशावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, ते सांगण्यासाठी हा हिशेब केला आहे.

आता प्रश्न असा की, दामल्यांच्या व्याकरणात खुद्द दामल्यांची अशी जी ही दोनतीनशे पृष्ठे राहतात त्यांत पूर्ववैयाकारणांनी केले नसून दामल्यांनी केले असे नेमके काय आहे? दामल्यांचे व्याकरण स्वत:ला 'शास्त्रीय' म्हणवते. तेव्हा मराठी व्याकरणाला दामल्यांनी शास्त्रीय दृष्टिकोन दिला, असे म्हणता येईल काय? असे म्हणता आले असते तर मला बारे वाटले असते. पण तशी वस्तुस्थिती नाही. हे श्रेय चिपळूणकर आणि गुंजीकर यांच्याकडे जाते. दामल्यांच्या व्याकरणात शास्त्रीय भूमिकेसंबंधाने जे काही आले आहे तो प्रायः या दोघांपैकी कोणाचा तरी अनुवाद आहे. ही भूमिका दामल्यांच्या रक्तात भिनलेली दिसत नाही. म्हणूनच तर एकीकडे ही भूमिका संगत दुसरीकडे ते तिच्याविरुद्ध प्रतिपादन किंवा आचरण करतात.

दामले हे मुख्यतः वादकर्ते

तेव्हा दामल्यांनी नव्याने केली अशी एकच गोष्ट त्यांच्या व्याकरणात उरते. ती म्हणजे त्यांनी मराठी व्याकरणातल्या विविध लहानमोठ्या विषयांवर घातलेले वाद. शास्त्रीय विषयांत पद्धतशीर केलेल्या वादाला फार महत्त्व आहे. यामुळे विवाद्य प्रश्नाच्या उलटसुलट बाजू तपशीलवार पुढे येतात.अशा वादाच्या प्रदीर्घ परंपरेमुळेच संस्कृत शास्त्रग्रंथांना मराठी शास्त्रग्रंथांत दुर्मिळ असलेला एक रेखीवपणा आला आहे. न्यायालयाच्या कामांत वकीलांना जे महत्त्व आहे तेच शास्त्रीय विषयांत वादकर्त्यांना आहे. आता दामल्यांनी जे वाद केले आहेत त्यांतले सर्व मुद्दे, सर्व प्रमाणे, सर्व उपपत्ती, सर्व निष्कर्ष दामल्यांनी नव्यानी मांडले आहेत असेही नाही. यांतलाही पुष्कळसा भाग त्यांना पूर्व वैयाकरणांकडून मिळाला आहे. त्याचा उगम त्यांनी काही ठिकाणी सांगितला तर काही ठिकाणी सांगितला नाही, हे वेगळे. तो सर्व शोधून काढला तर दामल्यांची पाने आणखी कमी होतील. या हिशेबाने मराठी व्याकरणाच्या परंपरेत मोरो केशव दामले हे मुख्यतः संग्राहक आणि वादकर्ते ठरतात. हेही श्रेय काही लहान नाही. व्यवहारतः पाहिले तर व्याकरणासारख्या विषयात शंभर वर्षांच्या परंपरेनंतर हजार पानांचा मजकूर पूर्वीच्यांचे काहीही न घेता सर्वस्वी नवीन लिहिणे हे अशक्यप्राय आहे. दामल्यांनी स्वत:सुद्धा असे अवास्तव उद्दिष्ट आपल्यासमोर ठेवले नव्हते. त्यांची उद्दिष्टे त्यांनी स्वत:च 'प्रस्तावने'त नमूद केल्याप्रमाणे दोन आहेत :

१. खेर आणि आगरकर या दोघांनी बेनच्या इंग्रजीच्या व्याकरणाला आदर्शस्थानी ठेऊन मराठीच्या व्याकरणाची दोन अंगे (पदमीमांसा, वाक्यमीमांसा) विवेचिली. त्यांचा सांधा नीट जुळवणे.

२. होता होईल तो व्याकरणाच्या लहानमोठ्या सर्व मुद्द्यांची यथाशक्ती छाननी' करणे. (पुढे जोडलेली 'ऊहापोहसूची' पाहा. ही स्वत: दामल्यांनीच केली/करवून घेतली आहे)

अनुक्रमणिका

यांपैकी दामल्यांचे पहिले उद्दिष्ट फसले आहे; कारण ते म्हणतात ती वाक्य मीमांसा अर्थात तिच्यातला 'वाक्यपृथक्करण' हा भाग, व्याकरणाचा विषयच होऊ शकत नाही. दुसरे उद्दिष्ट साधले आहे. त्याचे श्रेय दामल्यांपासून कोणीच हिरावून घेऊ शकत नाही.

वाक्यपृथक्करण म्हणजे तडजोड

दामल्यांचे पहिले उद्दिष्ट फसले आहे असे वर विधान केले आहे; त्यामागचा विचार 'दामल्यांचे व्याकरण' या प्रकरणात (पृ. ४८) काही प्रमाणात आला आहे. या विषयाचा विस्तार मी 'मराठी व्याकरण : वाद आणि प्रवाद' (१९८७) या ग्रंथात केला आहे. त्यातला या विषयाच्या आकलनाला आवश्यक तेवढा भाग येथे उद्धृत करीत आहे :

दामले हे तर्कशास्त्राचे प्राध्यापक. उद्देश्य-विधेयात्मक वाक्यपृथक्करण हा विषय तर्कशास्त्राचा, तिथून तो व्याकरणात आला हे त्यांना चांगले माहीत. तर्कशास्त्रात हे काम ज्या पद्धतीने करतात तीहून वेगळ्या पद्धतीने व्याकरणात का करतात हे सांगायची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्याला त्यांनी कारण काय दिले? तडजोड! अरे, तडजोड करायला हा काय नदीच्या पाण्याचा वाद आहे का देशाच्या सरहद्दीचा? वस्तुस्थिती अशी आहे की वाक्याकडे पाहण्याची तर्कशास्त्राची दृष्टी वेगळी, व्याकरणाची वेगळी. तर्कशास्त्र वाक्याकडे पाहते एक विधान म्हणून यथार्थ ज्ञानाचे एक साधन म्हणून. व्याकरण त्याकडे पाहते आख्यात आणि त्याच्याशी अन्वित पदे यांचा समुदाय म्हणून. त्यामुळे 'काट्याच्या अणीवर बसले तीन गाव' यासारखे व्याकरणाला चालणारे वाक्य तर्कशास्त्राला चालत नाही. अशा स्थितीत एका शास्त्रातली व्यवस्था बरी दिसते म्हणून दुसऱ्या शास्त्रात आणून कशी चालेल? तर्कशास्त्राच्या दृष्टीने वाक्यातला कोणताही शब्द उद्देश्याच्या जगी बसवून त्या वाक्याची फेरमांडणी करता येते. दामले व्याकरणात असा फतवा काढतात की अमुक प्रयोगातले अमुक कारक उद्देश्यात घालावे. कशासाठी? हा विषय इंग्रजी व्याकरणात येतो म्हणून? या भूमिकेचे समर्थन हे की तडजोडीने शास्त्रात आत्मनिष्ठता (subjectvity) येते; आणि वस्तुनिष्ठता (objectivity) हा तर शास्त्राचा मूलाधार आहे. तर्कशास्त्रात वाक्यपृथक्करणात आत्मनिष्ठता येत नाही, याचे कारण त्यात उद्देश्य ठरवण्यात शंभर टक्के मोकळीक आहे. वाक्यातले उद्देश्य ते की ज्यावर वक्त्याचा भर आहे- मग तो करता असो, कर्म असो की क्रियापद असो. अमुक धर्तीच्या वाक्यात अमुकच उद्देश्य असे फतवे आगरकर, दामले काढतात तेव्हा या विषयात आत्मनिष्ठता येते. हा विषय तर्कशास्त्रात आहे तसाच व्याकरणात घेतला तर? मग तर वस्तुनिष्ठतेला बाध नाही ना? याला उत्तर असे की मग तसा तो तर्कशास्त्रात आहेच की! पुन्हा व्याकरणात आणून काय लाभ? तर्कशास्त्रात आहे तसा हा विषय व्याकारणात आणायचा झाला तर तेवढाच विषय का? सगळेच तर्कशास्त्र का नको? याला जे उत्तर तेच वाक्यपृथक्करणालाही. ते हे की शास्त्राच्या कक्षा ठरतात त्या विशिष्ट शास्त्राची आपल्या विषयाकडे पाहण्याची भूमिका आणि संदर्भसूत्रे (Terms of reference) यांवरून. उद्देश्यविधेयविचारात वक्त्याच्या इच्छेचे सूत्र आहे; ते व्याकरणात अप्रस्तुत आहे.

आगरकर, दामले सांगत असतील; पण वाक्यपृथक्करणातली तडजोड ही खरी तर तर्कशास्त्र आणि व्याकरण यांच्यामधली तडजोड नव्हे; ती मराठी व्याकरण आणि इंग्रजी व्याकरण यांच्यामधली तडजोड आहे. मराठी व्याकरण हे आजवर इंग्रजी आणि संस्कृत व्याकरणांशी तडजोडीच करीत आले आहे. आणि ही खरी तर तडजोडही नव्हे, नक्कल आहे.

शास्त्राचे संदर्भसूत्र

संदर्भसूत्राची उपेक्षा केली तर शास्त्रातले प्रस्तुत, अप्रस्तुत ठरवता येणार नाही. शास्त्र हे अभ्यासकांना आपल्या विषयातला कायदा समजावून देते. त्यानेच संदर्भसूत्र हा कायदा मोडला तर त्याचे कोण ऐकून घेईल? ध्वनी हाच विषय असला तरी त्याच्या विवेचनाचे पदार्थविज्ञानशास्त्रातले संदर्भसूत्र वेगळे, संगीतशास्त्रातले वेगळे. म्हणून पदार्थविज्ञानशास्त्रात राग, ताल येत नाहीत; संगीतात येतात. पदार्थविज्ञानशास्त्रातला ध्वनी आणि काव्यशास्त्रातला ध्वनी यांचा तर 'नाममात्र' संबंध आहे. भाषेचा अनेक अंगांनी अभ्यास होऊ शकतो. तो करणाऱ्या शस्त्रांचा भाषा या समान विषयाच्या द्वारे एकमेकांशी संबंध नाही असे कसे म्हणता येईल? संबंध साक्षात आहे की परंपरीत आहे हे महत्त्वाचे. घाटाच्या कारणसामग्रीत माती वाहून आणणारे गाढव का गणले जात नाही? कारण ते अन्यथासिद्ध आहे, म्हणजे परंपरासंबद्ध आहे. सध्या भाषेत, दूरान्वित आहे (आणि अपरिहार्यही नाही.). घट घडवणाऱ्या कुंभाराचा बापही घटाशी असाच दूरान्वित आहे. घटाचे कारण कोणते याविषयाचा तर्कशास्त्रातला हा विचार समजला तर व्याकरणाच्या क्षेत्रांसंबंधीचा विचार समजायला जड जाऊ नये.

संयुक्त क्रियापदाचा गोंधळ

वाक्यपृथक्करण या विषयाचे व्याकरणात समर्थन, सांधेजुळणी करण्याची दामल्यांना आवश्यकता तरी वाटली आहे. पण 'संयुक्त क्रियापद' आणि 'पदपरिस्फोट'(parsing) हे विषय अशी काही चर्चा न करताच त्यांनी इंग्रजी व्याकरणाचा नमूना समोर ठेऊन मांडले आहे. त्यातला 'पदपरिस्फोट' हा विषय उघड उघड शालेय स्तरावरच्या स्वाध्यायाच्या स्वरूपाचा आहे; त्याला शास्त्रीय व्याकरणात स्थान असण्याचे कारण नाही. 'संयुक्त क्रियापद' या संकल्पनेची अशास्त्रीयता आणि तिच्या अभावी पर्यायी उपपत्ती अशा दोन्ही दृष्टींनी मी या प्रश्नाची पूर्वोक्त ग्रंथात सविस्तार चर्चा केली आहे. तिचा गाभ्याचा भाग उद्धृत करतो :

संयुक्त क्रियापद ही संकल्पना मांडण्यातला सर्वात मोठा दोष हा की मराठी वाक्यरचनेतल्या सर्वात मूलभूत संकल्पनांना त्यामुळे धक्का बसतो. 'फूल उमलते / फुले उमलतात' यात फूल / फुले हे कर्ते आहेत. 'मिहिर गाणे म्हणतो / मिहिर मित्राला म्हणतो' यात गाणे / मित्राला ही कर्मे आहेत. 'हॅम्लेट (ऑफेलियाला) पत्र लिहितो' यात 'हॅम्लेट' कर्ता, 'पत्र' कर्म. हे ठरवण्यात 'लिहितो' या आख्यात-प्रत्ययान्त पदाचा आधार घेतला जातो. 'हॅम्लेट पत्र लिहितो आहे / लिहित आहे' असे वाक्य आले की ही भूमिका सुटते. यात 'आहे' हे पद आख्यातप्रत्ययान्त असले तरी ते क्रियापद नव्हे, 'लिहित आहे' हे क्रियापद, अर्थात संयुक्त. यात कृदन्तातला धातू मुख्य; तो अर्थात समर्पक. 'आहे' हे पद गौण, सहाय क्रियापद. ते अकर्मक.संयुक्त क्रियापदही सकर्मक. म्हणजे 'आहे' हेही या ठिकाणी समर्पक! 'वडाची साल पिंपळाला' लावतात ती अशी! वाक्याला वाक्यपण येते 'आहे' या पदामुळे; 'लिहित' या पदामुळे नव्हे. हे वाक्यपण पदरात पाडून घेण्यापुरते 'आहे' हे पद जोडीला घ्यायचे, मग त्याला विचारायचे नाही, असा हा संयुक्त क्रियापदाचा प्रकार आहे.

घेतलेल्या उदाहरणांत धातुसाधित आणि आख्यात या दोहोंचा करता (हॅम्लेट) समान तरी आहे. जेव्हा यांचे करते भिन्न येतात तेव्हा संयुक्त क्रियापदवादी मूग गिळून बसतात. उदाहरणार्थ : 'आई मुलांना जेवू घालते', 'मला झोपू दे'. पहिल्या उदाहरणात 'जेव' धातूचा कर्ता 'मुले', 'घाल' धातूचा कर्ता 'आई;' दुसऱ्यात 'झोप' धातूचा कर्ता 'मी', 'दे' धातूचा कर्ता 'तू' (अध्याहृत). यांतल्या पहिल्या उदाहरणाविषयी दामले मौन पाळून आहेत; दुसऱ्यात त्यांच्या मते 'दे' धातूचा कर्ता तोच संयुक्त क्रियापदाचा कर्ता. हा त्यांच्या

मते 'अपवाद.' आपण ठरवलेल्या व्यवस्थेत काही बसेनासे झाले की त्याला 'अपवाद'म्हणावे, मोकळे व्हावे! वस्तुत: अशी उदाहरणे पाहिल्यावर दामल्यांनी या सगळ्याच विषयाचा पुनर्विचार करायला हवा होता. पण 'अपवाद' सांगणे हा मार्ग सोपा. तो त्यांनी धरला. आगरकर संयुक्त क्रियापदाला हरकत घेत नाहीत, याचेही दामल्यांवर दडपण आले असण्याची शक्यता आहे.

संयुक्त क्रियापदवाद्यांचा असा संभ्रम का झाला असावा? आख्यातकर्ता आणि कृदंतकर्ता यांमध्ये त्यांना विवेक करता आला नाही, हे त्यांच्या संभ्रमाचे कारण असावे. 'माळ्याने झाडे लावली' हे वाक्य पाहू. यात संयुक्त क्रियापद नाही; तेव्हा कर्ता (माळ्याने), कर्म (झाडे) आणि क्रियापद (लावली) या घटकांत मतभेदाला अवसर नाही. आता दुसरे वाक्य घेऊ: 'माळ्याने लावलेली झाडे फुलली.' यात पहिल्या वाक्यातले सर्व घटक मूलदृष्टीने उपस्थित आहेत. एक क्रिया अधिक आहे. या नव्या वाक्याचा कर्ता कोण? 'झाडे'. आणि क्रियापद? 'फुलली'. 'माळ्याने लावलेली' हे 'झाडे' याचे विशेषण. यात 'लावलेली' हे जे कृदंत आहे त्याचा - अर्थात 'लाव' धातूचा - कर्ता कोण? 'माळी'. आणि कर्म? 'झाडे'. म्हणजे पहिल्या वाक्यातल्या आख्याताला दुसऱ्यात कृदन्ताचा दर्जा प्राप्त झाल्याबरोबर त्यातला धातू नव्या वाक्याचे स्वरूप ठरवायला असमर्थ ठरतो. पहिल्या वाक्यातले आख्यात आणि दुसऱ्या वाक्यातले कृदंत यांतल्या धातूचे (लाव) कर्ता, कर्म हे घटक तेच राहिले तरी दुसऱ्या वाक्यातल्या नव्या आख्याताशी त्यांना तसाच संबंध प्रस्थापित करता आला नाही.आख्याताच्या दृष्टीने पहिल्या वाक्यातला कर्ता बाजूला राहिला; पहिल्या वाक्यातले कर्म हे कर्ता झाले, त्याचा कृदन्त धातूशी असलेला संबंध कायम राहून. म्हणजे एकच पद वाक्यात एका क्रियेचा कर्ता तर दुसऱ्या क्रियेचे कर्म ठरू शकते.

ही गोष्ट जर नीट लक्षात आली तर 'मी पत्र लिहितो' आणि 'मी पत्र लिहिले आहे' याही वाक्यांतल्या घटकांचा निर्णय व्हावा. पहिल्या वाक्यात 'लिहितो' हे क्रियापद, त्याचा कर्ता 'मी', कर्म 'पत्र'. दुसऱ्या वाक्यात 'आहे' हे क्रियापद; त्याचा कर्ता 'पत्र'. 'लिहिले' हे कृदन्त विशेषण, 'पत्रा'चे; 'मी' हा 'लिह' धातूचा कर्ता. त,ता, ला, णार, वा, वयाचा/आयचा' हे कृत् प्रत्यय अन्ती असलेली कृदन्ते (उदाहरणार्थ : लिहित, लिहिता, लिहिला, लिहिणार, लिहावा, लिहावयाचा/लिहायचा) विशेषणे असतात. ती ज्या 'संयुक्त क्रियापदां'त येतात त्यांची व्यवस्था प्रकृत उदाहरणाप्रमाणे 'संयुक्त क्रियापद' न मानता करता येईल.

वाक्यपृथक्करण आणि संयुक्त क्रियापद यांच्याप्रमाणेच व्याकरणात अप्रस्तुत असणारे आणखी काही विषय आणि घोटाळे दामल्यांनी इंग्रजी व्याकरणाच्या प्रभावामुळे कुळाचाराप्रमाणे आपल्या ग्रंथात चिकित्सा न करता समाविष्ट केले आहेत. त्यांची विस्तृत चर्चा जिज्ञासूंना माझ्या 'मराठी व्याकरण : वाद आणि प्रवाद' या ग्रंथात पाहता येईल.

उपसंहार

दामल्यांच्या व्याकरणाने मराठी व्याकरणाच्या परंपरेवर आपली मुद्रा उठवली ती अजूनही या विषयाच्या शिक्षणात प्रभावी आहे. पण शिक्षण आणि शास्त्र ही भिन्न भिन्न क्षेत्रे आहेत. त्यामुळे पहिल्या दृष्टीने कशीही परिस्थिती असली तरी दुसऱ्या दृष्टीने त्याचे गुणदोषपरीक्षण आणि त्याच्या प्रकाशात मराठी व्याकरणाची नव्याने मांडणी ही झाली पाहिजेत. असे झाले तरच दामल्यांच्या व्याकरणाचे शास्त्रीय परीक्षण कारणी लागले असे होईल. शास्त्रीय विचारात अखेरचे असे काही नसते. जुन्या उपपत्तींचे परीक्षण, त्यांतल्या दोषांची/न्यूनांची भरपाई, नव्या उपपत्तींची रुजवात - याच मार्गाने शास्त्राचा प्रवास होत असतो.

अनुक्रमणिका

अश्रद्ध ही शास्त्रीय विचार शिकण्याची पहिली पायरी आहे. 'अमुक तमुक लेखक सांगतो म्हणून अमुक तमुक गोष्ट ग्राह्य' हा श्रद्धेचा मार्ग आहे. 'का?' असा प्रश्न हा अश्रद्धेचा मार्ग आहे. दामल्यांनी आपल्या ग्रंथाच्या नावात 'शास्त्रीय' हा शब्द घालून आणि अनेक मुद्द्यांवर वाद घालून हाच मार्ग अनुसरला आहे. त्याची जाण ज्या प्रमाणात विद्येच्या क्षेत्रात राहील त्या प्रमाणात मराठी वाङ्मयाला प्रौढता आली असे म्हणता येईल.

अनुक्रमणिका

परिशिष्ट १

दामले यांनी मराठी व्याकरणात
ज्या विषयांचा ऊहापोह केला त्यांची सूची

सुरुवातीचा आकडा 'अंका'चा, म्हणजे आर्टिकलचा.-कृ.श्री.अ.

१. भाषेचे लक्षण.
१२. व्याकरण व भाषा यांचा संबंध.
२२. स्वरसंख्या, बिंदु व विसर्ग यांचे स्वरूप, व्यंजनसंख्या.
५१. अ . अन्त्य अ-चा उच्चार.
५१. आ . शब्दामधील अ.
५६. कोता अ, लांबट अ, स्वराघात (accent), खेरांच्या नियमांचे परीक्षण.
५८. ई . च्, ज्, झ्, ह्यांचा उच्चार; ड चे दोन उच्चार.
१००. शब्दजातींची संख्या.
१०१. नामाची व्याख्या.
१०८. नामजातींतील साधर्म्य-वैधर्म्य.
११५. नामांचे भेद.
११६. सर्वनामव्याख्या.
१४३. सर्वनामांची संख्या, त्यांचे भेद.
१४४. विशेषणाची व्याख्या, त्याची नामाशी तुलना.
१४९. सर्वनामांचा विशेषणांप्रमाणे उपयोग.
१७३. संख्याविशेषणांचे भेद.
१७७. कर्ता शब्दाची व्याख्या, तिचे महत्त्व; रुच, आवड, दिस, वाट, इ. धातूंचे कर्ते.
१८१. कळमळते, सांजावले, इ.
१९७. धातूंचे वर्गीकरण, करवते वगैरे शक्य क्रियापदे.
१९८. क्रियाविशेषणांचे अव्ययत्व.
२१४. दिवसाचा, जलदीने, सकाळी, इत्यादी विभक्त्यंत शब्दांचे क्रियाविशेषणत्व.
२२५. पर्यंत, पासून ह्यांचा उपयोग.
२२५. शुद्धशब्दयोगी अव्ययांची जाती.
२३१. उभयान्वयी अव्ययांचे लक्षण.
२३८. उभयान्वयी अव्ययांचे वर्गीकरण.
२४५. नामांतील मूळ शब्द.
२४९. लिंगांची लक्षणे.
२५०. सामान्य लिंग म्हणजे काय? लिंगनिर्बंध.
२७९. वचनाचे विभक्तीपासून भिन्न विवेचन.
३१२. विभक्तीचे लक्षण, प्रत्ययावरून विभक्ती की अर्थावरून विभक्ती? व्याकरणशास्त्राचे स्वरूप व विभक्तीचे व्याकरणातील स्थान, मराठीत कोणत्या व किती विभक्ती आहेत? षष्ठीचे विभक्तित्व.
३३५. विभक्तिविवरणाचे प्रकार.
३४२. जो, तो ह्यांतील मूळ शब्द.

अनुक्रमणिका

३८३. अख्यातांची संख्या व नावे.
३८४. हकारान्त धातू.
४४७. एकशेष द्वंद्व, समाहार द्वंद्व, सोयरा-धायरा इत्यादी शब्द; हातापायाला इत्यादिकांस समास म्हणावे काय?
४५०. लट्ठालट्ठी, बुक्काबुक्की इत्यादिकांचे समासत्व; घोडतोंड्या, एकडोळ्या इत्यादिकांचे समासत्व.
४८५. अभ्यस्त शब्दांचे वर्गीकरण.
४९८. कारके, विभक्तीचे लक्षण व विभाक्तींची नवे.
४९९. अपूर्णवर्तमान, रीतिवर्तमान वगैरे संज्ञा.
५४०. त्याने मला जाऊ दिले, पुस्तक वाचू दिले, यांतील प्रयोग.
५४१. संयुक्त क्रियापदांची नावे, प्रत्ययांवरून आख्यात की अर्थावरून आख्यात, अख्यातांची संख्या, त्यांची नावे, करण व अकरण रूप.
५४२. संयुक्त क्रियापदे मानण्याची आवश्यकता.
५५२. ‘मी स्नान केलो’ हा प्रयोग.
५५७. कर्मणी प्रयोगाचे प्रकार.
५६६. भावी प्रयोगाचे प्रकार.
५७२. संकीर्ण प्रयोग.
५८२. रांगोळ्या घातल्या, पाने मांडली इ. प्रयोग.
५९३. वैद्याने रोग्यास बरा केला, बरे केले, बरा केले ही रचना.
६०४. करित, देत, घेत ही अव्यये की विशेषणे?
६०७. करिते समयी, जेविते वेळी येथील रचना.
६१८. मी त्यास बोलताना ऐकितो येथील कृदन्त.
६२३. जेवल्याने, दिल्यास इत्यादिकांचा उपयोग व साधनिका.
६२४. मला जावे लागले, त्याला ते काम करावे लागले इत्यादी ठिकाणची रचना.
६२५. तो करावयास गेला, येथी ‘करावयास’ शब्दाचा उपयोग.
६३४. त्याचे लिहून झाले, त्याला बोलून व्यर्थ इत्यादी उदाहरणांतील ऊन-कृदंत; त्याला बोलता उपयोगी नाही येथील ‘बोलता’ शब्दाचा उपयोग.
६४८. वाक्यपृथक्करणाचे महत्त्व, जोशी यांचे मत, त्यांचा अगरकरांवरील आक्षेप, आगरकरांची दूरदृष्टी व योग्यता, उद्देश्य व विधेय ह्यांचा न्यायशास्त्रदृष्ट्या विचार, न्यायशास्त्र व व्याकरण ह्यांतील दृष्टिभेद, न्यायशास्त्र व वाक्यपृथक्करण ह्यांचा संबंध, वाक्यपृथक्करणाचे इंग्रजीतील स्वरूप, त्याचे मराठी भाषेच्या दृष्टीने थोडेसे रुपांतर करण्याची आवश्यकता,मराठीतील निरनिराळ्या प्रकारच्या कर्मणी व भावे प्रयोगांचा वाक्यपृथक्करणाचे दृष्टीने विचार.
७००. त्याला पाहिजे ते करू दे, या वाक्यातील रचनेच्या संबंधाने आगरकरांच्या मताचे खंडन.

अनुक्रमणिका

परिशिष्ट २
मोरो केशव दामले : चरित्रपट

७ नोव्हेंबर १८६८	जन्म : मालगुंड, जिल्हा रत्नागिरी.
१८८२	शिक्षणासाठी वडील बंधूंकडे बडोद्याला प्रयाण.
१८८३	वडील बंधूंच्या आकस्मिक निधनामुळे कोकणात परत.
१८८३ चा सुमार	विवाह.
१८८४...	शिक्षणासाठी नागपूर, उमरावती येथे मुक्काम.
१८८७	मॅट्रिक उत्तीर्ण. वऱ्हाडात संस्कृतात सर्वप्रथम.
१८८७...	फर्गसन कॉलेज, डेक्कन कॉलेज पुणे यांत शिक्षण.
१८९१	बी. ए. ऐच्छिक विषय तर्कशास्त्र.
१८९१...	एम. ए. च्या अभ्यासासाठी दक्षिणा फेलोशिप.
१८९३	एम. ए. तत्त्वज्ञान (मुख्य), इतिहास (दुय्यम).
१८९३-१९०२	माधव कॉलेज, उज्जयिनी येथे प्रोफेसर.
१८९६	न्यायशास्त्र (निगमन). पहिला स्वतंत्र ग्रंथ.
१९०२	न्यायशास्त्र (विगमन).
१९०२-१९०८	माधव हायस्कूल उज्जयिनी येथे मुख्याध्यापक.
१९०८-१९१३	नील सिटी हायस्कूल, नागपूर येथे मुख्याध्यापक.
१९११	शास्त्रीय मराठी व्याकरण.
३० एप्रिल १९१३	रेल्वे अपघातात दामल्यांचा आणि त्यांच्या पत्नीचा मृत्यू; बोरगाव, अकोल्याजवळ.

संदर्भ

१. **केशवसुतांची भावंडे व त्यांचा परिवार**
(दत्तात्रेय मोरेश्वर दामले, सोलापूर १९६५)

२. **शास्त्रीय मराठी व्याकरण**
(मोरो केशव दामले, संपादक : कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर, पुणे १९७०)

३. **सरस्वतीचे लाडके पुत्र**
(दत्तात्रेय मोरेश्वर दामले, सोलापूर १९६६)

४. **मराठी भाषेचे व्याकरणकार आणि व्याकरण प्रबंधकार**
(मोरेश्वर सखाराम मोने, पुणे १९२७)

५. **तिङंतविचार**
(विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, फोंडा १९१२; राजवाडे-लेखसंग्रह, भाग २ पुणे १९३२)

६. **सुबंतविचार**
(विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, पुणे १९१२)

७. **आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण**
(महादेव पांडुरंग सबनीस, मुंबई १९५१)

८. **हीरक महोत्सव स्मृतिग्रंथ**
(नील सिटी हायस्कूल, नागपूर १९५१)

९. **मराठी व्याकरण : वाद आणि प्रवाद**
(कृष्ण श्री. अर्जुनवाडकर, पुणे १९८७)

१०. **मराठी व्याकरणाचा इतिहास**
(कृष्ण श्री. अर्जुनवाडकर, पुणे १९९१)

एखाद-दुसऱ्याच वेळी निर्देशिलेले अवांतर संदर्भग्रंथ (सुमारे पाच-सहा) त्या त्या जागीच केलेल्या पूर्ण निर्देशावरून कळून येण्यासारखे असल्यामुळे या ठिकाणी नोंदलेले नाहीत.

अनुक्रमणिका

महाभारत हे पुढच्या संस्कृत साहित्याला ज्या प्रमाणात आधारभूत ठरले, त्या प्रमाणात दामल्यांचे व्याकरणही पुढच्या मराठी व्याकराणांना आधारभूत ठरले; ज्यांना दामल्यांची मते मान्य नाहीत त्यांनाही उपयोगी ठरले. कारण दामल्यांचे व्याकरण हा एक प्रचंड संदर्भग्रंथ आहे. इतकी उदाहरणे, इतके शब्द, इतके नमुने व्यवस्थित गटवारीने एकत्र उपलब्ध करून देणे हेही व्याकरणाच्या क्षेत्रात लहानसहान काम नव्हे; दामल्यांनी तर विविध उपपत्तीही एकत्र संकलित करून, चार्चाचिकीत्सा करून व्याकरणविषयक प्रश्नांची बारीकसारीक अंगेही दृष्टीपुढे आणली आहेत.

एकंदरीने दामल्यांनी व्याकरणांच्या क्षेत्रात अभूतपूर्व कार्य केले आहे. ते अजूनही अद्वितीय राहिले आहे; कारण या स्वरूपाचा, या पल्ल्याचा, या उपयुक्ततेचा थोडक्यात म्हणजे या आकार-अधिकार-उपकारांचा - ग्रंथ दामल्यांच्या व्याकरणानंतर अजून निर्माण झालेला नाही. यावरून अशा स्वरूपाच्या कार्याचा अवघडपणा पुन्हा एकदा प्रत्ययाला येतो. असा ग्रंथ यांपुढे झाला तर त्याची प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रेरणा दामल्यांच्या या ग्रंथातच असल्याचे आढळून येईल.

अनुक्रमणिका